टीएमएनपी ही संस्था प्रतिभावान (Gifted) मुलांसाठी अशैक्षणिक माध्यमातून विद्या प्रसाराचे कार्य करते. भारतीयांची प्राचीन संस्कृती व सनातन मूल्ये मुलांच्या अंगी रूजावीत या हेतूने संस्था अनेक उपक्रम राबवते. महाभारत, रामायण, पुराणे यातील कथा, त्यावर आधारित प्रश्न-कोडी इत्यादींच्या माध्यमातून अवांतर वाचन, खेळाबरोबरीनेच चांगली संस्कार मूल्ये रूजवली जातात. शोध-बोध गोष्टी भाग एक, ही पुस्तिका याच हेतूने प्रकाशित करीत आहोत. कथा वाचून कथे खालील काही प्रश्नांची उत्तरे ही मुद्दाम पुस्तकात दिलेली नाहीत, त्याचे कारण मुलांनी ती उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करावा. पालक व शिक्षकांची मदत घेऊन ती उत्तरे शोधावीत. चला तर मग गोष्टींमधून शोधाला चालना देऊन बोध मिळवूया.....

ट्रायबल मेन्सा नर्चरिंग प्रोग्राम प्रस्तुत

# शोध-बोध गोष्टी (भाग १)

ट्रायबल मेन्सा नर्चरिंग प्रोग्राम,
पत्ता – मेन्सा इंडिया, विनायक भवन,
५१०, सदाशिव पेठ,
पुणे – ४११०३०.

संकल्पना
**डॉ. नारायण देसाई**

संकलन
**वादिराज लिमये**

© सर्व हक्क सुरक्षित

मुखपृष्ठ सजावट –
**प्रिया स्टुडिओज, पुणे**

प्रकाशन
**ट्रायबल मेन्सा नर्चरिंग प्रोग्राम**

मुद्रण
**डि.जी. कॉपीयर्स, कोथरूड, पुणे**

मूल्य
**ट्रायबल मेन्साला देणगी देऊन वंचित प्रतिभावानांची मदत करा.**

# ध्रुवबाळ

उत्तानपाद राजाला सुरूची आणि सुनीती अशा दोन राण्या होत्या. यातील सुरूची अतिशय सुंदर होती व राजाची आवडती राणी होती तर सुनीती नावडती राणी होती. सुरूचीला उत्तम नावाचा मुलगा होता तर सुनीतीला ध्रुव नावाचा मुलगा होता. सुरूची मत्सरी असल्यामुळे ती उत्तानपाद राजाला, सुनीती आणि ध्रुवाला भेटूही देत नसे.

एकदा आपला मुलगा उत्तमचे लाड करत राजाने त्याला मांडीवर बसवले होते. हे दृश्य बघून तिथे असलेल्या ध्रुवालाही राजाच्या म्हणजे आपल्या वडीलांच्या मांडीवर जाऊन बसावेसे वाटले. पण सुरूचीच्या दबावामुळे राजाने ध्रुवाकडे पाहिले देखील नाही. आपल्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे ध्रुवाच्या लक्षात आले असतानाच तिथे सुरूची आली व त्याला म्हणाली, ''तू राजाचा मोठा मुलगा असलास तरी त्यांनी तुझे लाड करावेत याचा स्वप्नातही विचार करू नकोस. त्यासाठी तुला माझ्याच पोटी जन्म घ्यावा लागेल. त्यामुळे एक काम कर या जन्मी भरपूर तपश्चर्या कर म्हणजे पुढच्या जन्मी तुला माझ्या पोटी जन्म घेता येईल. चल निघ आता इथून.''

पाच वर्षाच्या ध्रुवाला सावत्र आईचे बोल लागले. तो दुःखी झाला. रडत-रडत आपल्या आईकडे सुनीतीकडे जात त्याने घडलेली सर्व हकीकत सांगितली. सुनीतीने त्याला मायेने जवळ घेतले व म्हणाली, ''रडू नकोस बाळ. नारायणाकडे न्याय असतो. तो आपल्याला कधीही दुःखी ठेवत नाही. त्याची प्रार्थना, उपासना केली की तो आपल्याला सर्व काही साध्य होते.'' हे ऐकल्यावर ध्रुवाने जिज्ञासेने विचारले, ''कोण आहे हा नारायण? कुठे भेटेल तो मला?'' त्याच्या या निरागस प्रश्नावर सुनीती हसून म्हणाली, ''बाळा, तो स्वतः भगवंत आहे. अनेक वर्षांच्या खडतर साधनेनंतर, तपश्चर्येनंतर तो भेटतो. ते इतके सोपे नाही.''

ध्रुवाने ही गोष्ट लक्षात ठेवली आणि एक दिवस रात्री सगळे झोपलेले असताना तो राजवाड्यातून बाहेर पडला आणि निबीड अरण्यात नारायणाचा शोध घेण्यासाठी निघून गेला. त्याची तळमळ पाहून त्याला नारदमुनी भेटले. त्यांनी त्याला वासुदेवाचा मंत्र दिला व यमुनाकाठी मधुवनामध्ये तपश्चर्या करण्यास सांगितली.

सुरूवातीला काही दिवस ध्रुवाचे मन बेचैन होते. परंतु लवकरच त्याला ध्यानामधून अपार आनंद मिळू लागला. केवळ वाळलेली पाने, गवत यावर राहून तो साधना करू लागला. कित्येक दिवासांनी एकदाच थोडेसे पाणी पिऊ लागला आणि श्वासही अधून-मधून घेऊ लागला. त्याची एकाग्रता वाढू लागली. शरीराच्या सर्व हालचाली थांबल्या. पायाच्या अंगठ्यावर तो स्वतःचा तोल सांभाळून उभा राहून साधना करू लागला. नारायणाला भेटणे हाच ध्यास घेतलेल्या ध्रुवाची ही तळमळ पाहून भगवान नारायण त्याच्यासमोर प्रगट झाले.

परमेश्वराचे ते दिव्य रूप पाहून तो दिपून गेला. त्याने साष्टांग नमस्कार केला. देवाने प्रसन्नपणे स्मित करून आशीर्वाद देत त्याला प्रेमाने जवळ घेतले व तुला अढळपद मिळेल व तुला सर्वजण ध्रुव नक्षत्र म्हणून ओळखतील असे आशीर्वद दिले. ध्रुवाला परमानंद प्राप्त झाला. योग्यकाळी तो ध्रुवतारा बनला.

mensa india tribal mensa nurturing program ETSN European Talent Support Network

# शोध-बोध गोष्टी क्र.:00१

**प्रश्न :**

१. ध्रुवामध्ये असणारा गुण तुमच्यामध्ये असावा असे तुम्हाला वाटते का?

होय ☐ नाही ☐

२. तुम्हाला कोणाला आदर्श मानायला आवडेल?

सुनिती ☐ सुरूची ☐

३. ध्रुवामध्ये खालीलपैकी कोणते गुण आढळतात?

सहनशक्ती ☐ धूर्तता ☐ इच्छाशक्ती ☐ दृढ-निश्चय ☐ अचलता ☐

४. खालीलपैकी तुम्हाला काय आवडेल?

अढळपद ☐ एखादा वर/शक्ती ☐

५. एखाद्या गोष्टीचे ध्यान करणे म्हणजे काय?

६. तुम्हाला आवडतील असे ह्या गोष्टीवर ५ प्रश्न काढा.

७. तुम्हाला पुढील आयुष्यात कोणत्या गोष्टी अढळ करायच्या आहेत?

८. 'आरण्यात जाऊन तपश्चर्या करणे' म्हणजे काय?

९. 'नारदमुनी भेटणे' म्हणजे काय?

१०. नारायण शब्दाचा अर्थ काय असू शकेल?

दृढनिश्चयाने प्रयत्नशील राहिल्यास काहीही अशक्य नाही.

Anything is possible with persistent hardwork.

# समुद्रमंथन

एकदा दुर्वास ऋषी वैकुंठातून परत येत असताना त्यांना वाटेत इंद्रदेव भेटला. भगवान विष्णूंनी दिलेला हार त्यांनी इंद्राच्या गळ्यात घातला. पण तो आपल्याच धुंदीत चालू लागला. त्याने तो हार त्याचे वाहन असणाऱ्या ऐरावत या हत्तीला घातला. हत्तीने तो हार काढून टाकत पायी तुडवला. हे पाहून दुर्वास ऋषींना राग आला. 'त्यांनी इंद्राला या तुझ्या गर्वाचा, धुंदीचा परिणाम म्हणून तुझे सगळे वैभव नष्ट होऊन देवांचे अमरत्वही जाईल' असा शाप दिला. या शापाचा लगेच परिणाम झाला. इंद्राची सत्ता असलेल्या स्वर्ग व पृथ्वीवरची सर्व धार्मिक कृत्ये बंद झाली होती. देव दुर्बळ झाले असून असुर बलशाली झाले होते. त्यांनी सर्वत्र अशांतता पसरवली. सज्जन, निरपराध माणसांना त्रास द्यायला सुरूवात केली. त्यांचा छळ केला. त्यांना तोंड देण्यात देवताही अपयशी पडत होत्या.

काय करावे हे कळत नसल्यामुळे इंद्र आणि इतर देवता भगवान विष्णूंकडे गेल्या. दुःखी-कष्टी झालेल्या देवतांना श्रीविष्णू म्हणाले, "असुर सध्या ताकदवान झाले आहेत म्हणून तुम्ही त्यांच्याशी समेट करा. क्षीरसागराचे मंथन करण्यात त्यांची मदत मागा. त्यातून जे अमृत निघेल ते पिऊन तुम्ही अमर व्हाल. सर्व औषधी झाडे-झुडपे, वेली समुद्रामध्ये टाका. मंदार पर्वताला रवी बनवा आणि सर्पराज वासुकीला दोर करा. असुरांशी जुळवून घेऊन मंथन करा. ते ज्या अटी ठेवतील त्या मान्य करा. मंथनातून अनेक गोष्टी निघतील. अमृता बरोबरीनेच हलाहल विषही निघेल. त्यामुळे जागरूक राहा, दक्ष राहा, सावध राहा. उगीच आसक्त होऊ नका तसेच घाबरूनही जाऊ नका."

भगवान श्रीविष्णूंच्या सांगण्याप्रमाणे देवतांनी केले व देव-असुरांमध्ये समुद्रमंथन सुरू झाले. समुद्रातून सर्वात प्रथम हलाहल विष निघाले. भगवान शंकरांनी ते प्यायले. ते विष त्यांच्या गळ्यात शोषले गेल्याने त्यांना नीलकंठ असे नाव पडले. त्यानंतर मंथनातून अनेक मौल्यवान गोष्टी बाहेर आल्या ज्या देवतांनी घेतल्या. अखेरीस ज्यासाठी मंथन चालू होते ते अमृत बाहेर आले. तो अमृताचा कलश कोणी घ्यायचा यावरून भांडणे सुरू झाली.

त्याचवेळी यावर उपाय म्हणून भगवान विष्णूंनी मोहिनी अवतार घेतला. त्या मोहिनी अवतारातले ते रूप बघून असुरांना काय करावे कळलेच नाही. या अमृताचे वाटप मी करीन असे म्हणत तो कलश मोहिनीने घेतला. तिने चलाखीने देव व असुर यांना दोन रांगेत विभागले व अमृत वाटायला सुरूवात केली. प्रथम देवतांना अमृत वाटून असुरांना वाटायला जाणर तोपर्यंत कलशातील अमृत संपले होते.

आपण फसवले गेले आहोत हे कळल्यावर असुरांना राग आला व त्यांनी देवतांशी युद्ध सुरू केले. देवता अमर झाल्याने त्यांनी असुरांचा दारूण पराभव केला. देवतांचे ऐश्वर्य त्यांना परत मिळून पुन्हा एकदा देवतांचे राज्य सर्वत्र आले.

**प्रश्न:**

१. तुम्ही कोणाच्या बाजूने असाल?

देव ☐ असुर ☐ कोणीच नाही ☐

२. इंद्रासारखा गर्व करणे योग्य आहे का?

होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

३. दुर्वास ऋषींप्रमाणे आपल्यापेक्षा मोठ्या, ज्ञानी व्यक्तींचा अपमान करणे योग्य आहे का?

होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

४. वरील कथेतून काही खालील रूपकांच्या एकमेकांशी जोड्या लावा.

| | |
|---|---|
| देव | दुःख |
| असुर | शाश्वत आनंद |
| विष | चांगले |
| अमृत | वाईट |

५. समुद्रमंथन ह्याचा अर्थ आपण आत्ताच्या काळात कसा लावू शकतो?

६. गर्वाची कारणे काय काय असू शकतात?

७. तुम्हाला कुठल्या गोष्टीचा गर्व आहे?

८. तुम्ही कोणाचा चुकून किंवा हेतुपूर्वक अपमान केला तर त्याची क्षमा मागाल का?

९. भगवान मोहिनी रूप घेऊन का आले?

१०. अमृततत्त्व म्हणजे काय?

आपल्या चांगुलपणाचा आपल्याला गर्व नसावा.

We should not be proudy of our virtues.

# सीताशोध

क्रूर राक्षसी रावणाने वनवासात असणाऱ्या सीतेचे अपहरण केले होते. तिचा शोध घेत घेत रामचंद्र व लक्ष्मण चालले होते. वाटेत सापडणाऱ्या खुणा, गोष्टी, व्यक्ती इत्यादींचा अंदाज घेत ते मार्गक्रमण करत होते. इतक्यातच त्यांची सुग्रीव या किष्किंधेच्या राजाशी भेट झाली. त्याचे राज्य त्याचा भाऊ, वालीने हिस्कावून घेतले होते. रामचंद्रांच्या मदतीने वालीचा वध करण्यात आला व सुग्रीवाला त्याचे राज्य परत मिळाले. सुग्रीवाने रामचंद्रांच्या सीताशोधाच्या कार्यात त्यांना सर्वतोपरि मदत करण्याचे आश्वासन दिले.

सुग्रीवाचा मंत्री असलेला हनुमंत हा सर्वविद्या पारंगत, बलशाली असा योद्धा होता. समुद्र पार करून लंकेत सीताशोध घेण्यासाठी तोच योग्य असल्याचे सर्वांचे मत झाले व हनुमंताला लंकेत सीताशोधासाठी पाठवण्यात आले.

वाटेत त्याला अनेक संकटांचा सामना करावा लागला. पण अतिशय चलाखीने हनुमंताने त्यातून स्वतःची सुटका करून घेतली व लंकेत प्रवेश केला. लंकेत प्रवेशल्यानंतर सीतेचा शोध घेणेही सोपे नव्हतेच. लंका ही मोठी व अतिशय सुरेख नगरी होती. त्या नगरीची शोभा हनुमंताने पाहिली. अनेक राक्षस, स्त्रिया त्याच्या दृष्टीस पडल्या. एका घरावरून दुसऱ्या घरावर उड्या मारत त्याने संपूर्ण लंका पिंजून काढत सीतेचा शोध घेतला. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. खूप शोध घेऊनही सीत सापडली नसल्याने तो निराश, दुःखी झाला.

तो मनामध्ये म्हणाला, ज्या अर्थी मी इतका शोध घेऊनही सीता माझ्या दृष्टीस पडत नाही त्याअर्थी ती निःसंशय जिवंतच नसावी. त्या दुष्ट रावणाने तिला मारून टाकले नसेल कशावरून? पण आता परत जाऊन सुग्रीवादि वानरांना आणि राम-लक्ष्मणाला काय सांगावे? सीता मृत झाली आहे असेही सांगावे का? का मी माझ्याच प्राणाचा त्याग करावा? का त्या रावणाचा वध करून त्याला रामाकडे न्यावे म्हणजे सीता मिळाली नाही तरी सूड उगवल्यासारखे होईल?
हनुमताने हा विचार केला खरा पण लगेचच त्याच्या मनात दुसरा विचार आला. मी हे असे सांगितल्याने काय घडेल?

सीता मरण पावली आहे असे सांगितले तर राम प्राण सोडतील, राम नाही म्हटल्यावर लक्ष्मण प्राण सोडील. राम-लक्ष्मणांनी प्राण सोडलेले पाहून भरत-शत्रुघ्नही देहत्याग करतील. आपले सगळे पुत्र गेल्याचे पाहून कौसल्या, सुमित्रा, कैकयी याही मरण पावतील. माझ्या या अशा वार्तेने रामाचा संपूर्ण इक्ष्वाकू वंशच नष्ट होईल. त्यामुळे असे सांगणे योग्य होणार नाही. पुरूष जिवंत राहून प्रयत्न करत राहिला तर त्याला पाहिजे ते मिळतेच व त्याचे कल्याण होते असे हरून जात प्राणत्याग करणे पटत नाही. व रामांचा आदेश रावणाला मारणे हा नाही त्यामुळे ते कृत्य करणेही बरोबर होणार नाही. ते काही नाही. मी पुन्हा प्रयत्न करीन आणि सीता दृष्टीस पडत नाही तोपर्यंत मी परत जाणार नाही व सुग्रीवाला तोंड देखील दाखवणार नाही. समोर दिसणाऱ्या अशोकवनात अजून मी सीतेचा शोध घेतलेला नाही. तिथे मी शोध घेईन आणि सीता रामांना अर्पण करीन असा निश्चय करत हनुमंताने अशोकवनाकडे उड्डाण केले.

**प्रश्न:**

१. पूर्ण प्रयत्न न करता कुठल्यातरी निष्कर्षावर येणे तुम्हाला पटते का?

होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

२. प्रयत्न करून यश मिळालं नाही की हनुमानाप्रमाणे तुम्हीही हताश होता का?

होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

३. वरील कथेतून तुम्हाला खालीलपैकी कोणते गुण आढळले?

जुळवून घेणे ☐ दृढनिश्चय ☐ सहनशक्ती ☐ तीव्र इच्छा ☐

Coping up Determination Patience Strong-will

४. हनुमानाप्रमाणे तुमच्यावर अशी एखादी जबाबदारी दिल्यास तुम्ही खालीलपैकी काय कराल?

प्रयत्न करू ☐ प्रयत्न करणे सोडून देऊ ☐

निराशेतच जगत राहू ☐ कुठेतरी लांब पळून जाऊ ☐

५. एखाद्या गोष्टीचा शोध म्हणजे काय?

६. हनुमानामध्ये असणाऱ्या प्रमुख गुणांची सूचि करा.

७. एका कामाची जबाबदारी घेणे म्हणजे काय?

८. 'प्रयत्न' ह्या शब्दाचा अर्थ काय?

९. 'सूड उगविणे' म्हणजे काय?

१०. तुम्ही कोणत्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या आहेत, त्याची यादी करा.

रडत बसण्यापेक्षा प्रयत्नशील राहावे.

One should be diligent than just crying.

# रावणाला दिली समज

अशोकवनामध्ये हनुमानाला सीतेचा शोध लागला. तिच्याशी भेट घेऊन त्याने आपण रामाचे दूत असल्याचे त्याने सांगितले. सीतेचा आधी त्यावर विश्वास बसला नाही पण नंतर त्याने आत्तापर्यंत केलेले कथन ऐकल्यावर हनुमान हा खरोखरीच रामाचा दूत असल्याची तिची खात्री पटली. हनुमानाला सीता आणि रामाची अवस्था ज्ञात होती. सीतेला आत्ताच स्वतःबरोबर रामाकडे घेऊन जाण्याची हनुमनाने विचारणा केली. पण सीतेने त्याला नकार दिला. त्यामुळे 'तू सापडल्याचे रामाला सांगून आम्ही लवकरच सर्व सैन्य घेऊन रावणाचा वध करून तुला परत घेऊन जाऊ' असे आश्वासन हनुमानाने दिले.

सीतेची भेट घेतल्यावर हनुमानाने विचार केला की आपण महत्त्वाचे काम तर पूर्ण केले आहे. पण इथून असेच जाण्याऐवजी शत्रू किती बलाढ्य आहे हे आपल्याला कळले पाहिजे. तसेच आपण किती बलाढ्य आहोत हेही शत्रूला कळले पाहिजे म्हणून त्याने एक युक्ती लढवली.

त्याने त्या अशोकनवाची नासधूस करायला सुरूवात केली. हळूहळू करत त्याने लंकाच उध्वस्त करायला सुरूवात केली. हे कळताच रावणाचे सैन्य हनुमानाला मारायला आले. रावणाच्या सैन्याच्या एक तृतीयांश सैन्य एकट्या हनुमानाने उध्वस्त करून टाकले.

एवढा पराक्रम करून आता आपण कोण आहोत याची कल्पना शत्रुला आली असेल तेव्हा आता समज देण्यासाठी रावणासमोर जायला हवे असा विचार करत तो आपणहून बंदी झाला व त्याला रावणासमोर आणले गेले.

''तू कोण आहेस? कुठून आला आहेस?'' असे हनुमानाला विचारले गेले. ''मी वायुपुत्र हनुमान सुग्रीवाच्या सैन्यातला एक मंत्री असून त्या रामाचा दूत आहे जो तुझे पूर्ण राज्य उध्वस्त करू शकतो. तू सीतेला सोडले नाहीस तर तो तुझ्या मित्रबांधवांसह तुझा निश्चित सर्वनाश करेल. ब्रह्मदेव शंकर आणि इतर देवतांच्या शक्ती रामाच्या बाणांसमोर काहीही नाहीत. त्यामुळे तुझ्याकडे असणारी ताकद ही त्यामानाने खूपच कमी आहे. त्यामुळे पुन्हा एकदा विचार कर रावणा!'' असे धैर्याने उद्गार काढत हनुमानाने न घाबरता रावणाला समज दिली.

**शोध–बोध गोष्टी क्र.:००४**

**प्रश्नः**

१. हनुमानाप्रमाणे तुमच्यात धाडस आहे असे तुम्हाला वाटते का?

होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

२. एखाद्या गोष्टी न घाबरता तुम्ही सामोर जाल का?

होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

३. हनुमानासारखे बोलण्याआधी तशी धमक आपल्यात असावी असे तुम्हाला वाटते का?

होय ☐ नाही ☐ माहित नाहीत ☐

४. वरील कथेतून हनुमानाने खालीलपैकी कोणता गुण शिकवला असे तुम्हाला वाटला?

कोणाशी कसे बोलावे ☐ डावपेच कसा असावा ☐

उगाच मोठे–मोठे कसे बोलावे ☐ न घाबरता संकटाला कसे सामोरे जावे ☐

५. कुठल्याही गोष्टीचा ध्वंस करणे ही चांगली गोष्ट असू शकते, असे तुम्हाला वाटते का? व त्याची कारणे काय असू शकतात?

६. दुसऱ्याच्या मनात आपल्याविषयी विश्वास निर्माण करण्यास कोणत्या गोष्टी करणे आवश्यक आहे?

७. संवाद साधणे म्हणजे काय? त्याचा काय उपयोग?

८. कृतीमधून शक्तीप्रदर्शन होते पण बोलण्याद्वारे आपण आपले सामर्थ्य दाखवू शकतो का?

९. आपण कुठल्याही गोष्टीला का घाबरतो? त्याची कारणे काय असू शकतील?

१०. अपयश पचविणे म्हणजे काय? ते करण्यासाठी कोण कोणते उपाय तुम्हाला सुचविता येतील?

यश हे अंतिम नसते, अपयश दुर्दैवी नसतेः सातत्याने धैर्य बाळगणे महत्त्वाचे असते

Sucess is not final, Failure is not fatal: it is the courage to continue that counts

# तिने कैकयीचे कान फुंकले

राम, लक्ष्मण, भरत शत्रुघ्न या चार भावंडांची लग्न झाली. विवाहानंतर अनेक वर्ष गेली. आता रामाचा राज्याभिषेक व्हायला हवा असे विचार दशरथाच्या मनात येऊ लागले. दशरथाने हा आपला विचार गुरू वसिष्ठ, सुमंत प्रधान आणि प्रमुख प्रजाजनांना सांगितला. तेव्हा त्या सर्वांनीच समंती दिली. झाले! त्याप्रमाणे मुहूर्त ठरला. राज्याभिषेकाची सर्व तयारी करण्यात आली. अयोध्यानगरी सजवण्यात आली. सर्वत्र आनंदाचे वातावरण होते. अनेकांना निमंत्रणे गेली. सगळी सिद्धता झाली. आता श्रीरामांचा राज्याभिषेक होऊन राम राजा होणार याचीच चर्चा सर्वत्र होऊ लागली.

इतक्यातच कैकयीच्या महालात मात्र वेगळीच चर्चा सुरू होती. मंथरा नावाची कैकयीची एक दासी कैकयीला कसली तरी आठवण करून देण्यात गुंतली होती. राम राजा होणे याबद्दल कैकयीला आधी काहीच हरकत नव्हती. पण मंथरेने तिला एका गोष्टीची आठवण करून दिली आणि तिची मति हळू हळू फिरू लागली.

‘‘लग्नाच्या वेळी अश्वपती राजाला दशरथाने कबूल केले होते की तुमच्या मुलीच्या म्हणजे कैकयीच्या मुलालाच मी राजा करीन. दशरथ कालांतराने ते विसरून गेला होता. कौसल्येचा राम राजा होत आहे. तुझा भरत कोपऱ्यातला केर झाला आहे. अशा समयी तू आनंदात कशी काय असू शकतेस. उठ जागी हो कैकयी! हीच ती योग्य वेळ आहे दशरथाकडून त्या वचनाची पूर्ती करून घ्यायची!’’

मंथरेच्या या शब्दांमुळे कैकयीचा मत्सर जागा झाला आणि चवताळून उठली. रागारागाने तिने अंगावरील आपले दागिने फेकून दिले. केस मोकळे केले आणि ती रूसण्याच्या खोलीत जाऊन बसली. समारंभात ती सामील झाली नसल्याचे दशरथाच्या लक्षात आले आणि त्याने तिचा शोध घेतला. तिच्या महालात येऊन त्याने पाहिले तर सगळे अस्ताव्यस्त पडलेले होते व दासींकडून ती कोपगृहात आहे असे त्याला कळले. दशरथ कोपगृहात गेला. त्याने समारंभाला ये म्हणून कैकयीची समजून घातली पण ती काही केल्या ऐकेना.

शेवटी ती म्हणाली, ‘‘एका युद्धात मी तुम्हाला सहाय्य केलं होतं. त्यावेळी आपण मला दोन वर देण्याचं वचन दिल होतं. ते दोन वर मला आज पाहिजेत.’’ दशरथाने ते दोन वर आजच देण्याचे कबूल केले. तेव्हा कैकयी म्हणाली, ‘‘पहिला वर असा द्या की, उद्या रामाला राज्याभिषेक न करता तो माझ्या भरताला करावा आणि दुसरा वर असा द्या की रामाला वल्कले नेसवून चौदा वर्षे वनवासाला पाठवा.’’

कैकयीची ती विलक्षण मागणी ऐकून दशरथाला भयंकर दुःख झाले. त्याला काय बोलावे कळले नाही. तरीही त्याने भरताला युवराज करण्याचे मान्य केले पण रामाला वनवासाला पाठवणे त्याला पटत नव्हते व त्याने त्यास नकार दिला. त्याने कैकयीला तो वर परत घेण्यास सांगितला.

त्यावर ती अजूनच चिडली व ‘‘तुमच्यासारख्या सूर्य वंशातील राजाने दिलेले वचन पाळण्यासाठी प्राण पणाला लावले पाहिजे तर तुम्ही मलाच काय वर परत घेण्यास सांगत आहात?’’ असे म्हणाली.

कैकयीच्या हट्टापुढे दशरथाचा नाईलाज झाला. तो काहीच बोलू शकला नाही. त्याच्या या दु:खाची वार्ता सर्वत्र पसरली. सर्वजण तेथे जमले. शेवटी कैकयीनेच रामाला ''तू वनवासात जावेस अशी दशरथांची आज्ञा आहे'', असे सांगितले व रामाला वनवासात जायला सांगितले.

**प्रश्न:**

१. मंथरेसारख्या व्यक्तींच्या वागण्याबद्दल तुमचं काय मत आहे?
तसंच वागावे ☐ कधीही वागू नये ☐ कधीतरी वागावे ☐

२. तुम्ही असे कोणाच्या सांगण्यावरून स्वत:चे मत बदलाल का?
होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

३. दशरथाप्रमाणे हतबल राहाणे योग्य आहे का?
होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

४. 'तू वनवासात जावेस अशी दशरथांची आज्ञा आहे' हे खोटे बोलणे तुम्हाला योग्य वाटते का?
होय ☐ नाही ☐

५. 'कान फुंकणे' म्हणजे काय?
६. आपल्या अवतीभवती मंथरेचा प्रवेश टाळण्यासाठी आपण कोणत्या उपाययोजना कराल?
७. मंथरेचा विरोध कशाप्रकारे करता येईल?
८. रामाला वनवासाला पाठविणे याचा अर्थ काय?
९. मी कोणत्या परिस्थितीमध्ये कोणाच्याही आयुष्यात मंथरेची भूमिका घेणार नाही, असा निश्चय करता येईल का?
१०. दशरथ व कैकयी यांच्या स्वभावाविषयी काय सांगता येईल?

दुसऱ्याच्या बोलण्याला बळी पडू नये.

Do not be a victime of other's words.

# सुदामा

सांदिपनी ऋषींच्या आश्रमात श्रीकृष्णाबरोबर सुदामा नावाचा एक सहाध्यायी मित्र होता. हा सुदामा अतिशय गरीब होता. त्याला व त्याच्या कुटुंबाला पुरेसे खायलाही मिळत नसे. ते एका लहानशा झोपडी वजा घरात राहत असत. अगंवारचे कपडेही धड नसत. पण अशा परिस्थितीमुळे सुदामा कधीही निराश नव्हता. देवाचे नाव घेत आहे त्यात तो समाधानी होता.

एकदा त्याची बायको त्याला म्हणाली की, ''श्रीकृष्णासारखा सर्वार्थाने श्रेष्ठ मित्र तुम्हाला लाभला आहे. आपल्या या अशा स्थितीबद्दल त्याला कळले तर तो नक्कीच आपल्याला काहीतरी मदत करेल. तेव्हा तुम्ही त्याला भेटून याबद्दल सांगा.'' सुदामाने हे ऐकून न ऐकल्यासारखे केले. पण जेव्हा पुन्हा पुन्हा त्याची पत्नी त्याला हे सांगू लागली तेव्हा निदान या निमित्ताने मित्राची भेट होईल म्हणून तरी आपण जायला हवे असा विचार करत सुदामाने श्रीकृष्णाकडे जायचे ठरवले. आपल्या मित्राला देण्यासाठी त्याने त्याला जमले तेवढे मूठभर पोहे बरोबर घेतले आणि द्वारकेची वाट धरली.

मजल दर मजल करत तो अखेरीस द्वारकेला पोहोचला. श्रीकृष्णाने त्याला लांबूनच ओळखले आणि धावत धावतच त्याच्या स्वागतासाठी आला. आपला जुना मित्र भेटल्याने त्याला आनंद झाला. प्रेमाने अलिंगन देऊन त्याला महालात घेऊन गेला. तेथे त्याला आसनावर बसवले. तो प्रवास करून थकला असेल म्हणून त्याचे पाय धुतले. त्याला न्याहारी दिली. श्रीकृष्ण अशा फाटक्या कपड्यातील माणसाला एवढा मान-सन्मान देत असल्याचे पाहून सर्वांना आश्चर्य वाटले. नंतर श्रीकृष्ण व सुदामा सांदिपनी ऋषींच्या आश्रमातील गमती-जमतींबद्दल बोलू लागले.

श्रीकृष्णाने त्याचा व्यवस्थित पाहुणचार केला. त्याची एखाद्या राजासारखी सर्व व्यवस्था महालातच केली. दुसऱ्या दिवशी आता श्रीकृष्णाचा निरोप घ्यायची वेळ आली.

श्रीकृष्णाने विचारले, ''काय रे पण तू माझ्यासाठी काय आणले आहेस?'' आपण आणलेले पोहे श्रीकृष्णाला द्यायची सुदामाला लाज वाटत होती. श्रीकृष्णाने हे ओळखले असल्यामुळे त्याला मुद्दाम विचारले आणि शेवटी त्याच्या उपरण्यातून पोह्यांची पुरचुंडी बाहेर काढली.

त्यातील ते मूठभर पोहे श्रीकृष्णाने आनंदाने खाल्ले. असे स्वादिष्ट पोहे मी आजवर कधीच खालले नव्हते असे श्रीकृष्ण सुदामाला म्हणाला व दोघांनीही एकमेकांना निरोप दिला.

श्रीकृष्णाने सुदामाला काहीच दिले नव्हते. सुदामानेही काही विचारले नव्हते. सुदामा तसाच घरी गेला. पण घरी येऊन पाहतो तो काय त्याच्या झोपडीच्या जागी एक मोठा महाल बांधलेला होता. त्यात अनेक कारंजी आणि बागा होत्या. दागिन्यांनी मढलेली सुंदर वस्त्रांमधली त्याची बायको त्याने पहिल्यांदा ओळखलीच नाही पण नंतर त्याची ओळख पटली. श्रीकृष्णाने काहीही न बोलता त्याच्यासाठी ही व्यवस्था केली होती. सुदामाने श्रीकृष्णाचे मनोमन आभार मानले आणि पुन्हा देवाचं नाव घेऊ लागला.

**प्रश्न:**

१. श्रीकृष्ण आणि सुदामासारखी मैत्री तुमची आहे का?
होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

२. श्रीकृष्णाने सुदामाला जसे वागवले तसेच वागवले पाहिजे का?
होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

३. परिस्थिती गरीब असली तरी सुदामा निराशेने रडत बसला नव्हता हे तुम्हाला पटते का?
होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

४. एका मित्रामध्ये/मैत्रिणीमध्ये तुम्ही कोणते गुण बघाल?
५. आर्थिक परिस्थिती, शैक्षणिक पात्रता ह्या गोष्टी मैत्रीस लागू पडतात का?
६. सूर्याला मित्र असे का म्हणतात?
७. चौकानातील शब्दांचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करा.
८. माणसाने कशा गोष्टींमध्ये गरीब असले तरी चालेल, पण कोणत्या गोष्टीमध्ये गरीब होणे चालणार नाही?
९. दिलेल्या किंवा मिळालेल्या ऐश्वर्याचा कसा उपयोग करावा, असे तुम्हाला वाटते?
१०. तुम्हाला सुदामा व्हायला आवडेल की श्रीकृष्ण?

गरजेच्या वेळी उपयोगी पडतो तोच खरा मित्र

A friend in need is friend indeed.

# एकशे पाच

पांडवाचे राज्य कौरवांनी कपटाने घेतले होते. त्यामुळे पांडव हे एका वनात राहात होते. तसे असले तरी तिथे त्यांनी तपश्चर्या करून बरीच प्रभावी शस्त्रास्त्रे मिळवली होती. पांडवांना कमी लेखण्याचे सर्व प्रयत्न कौरव करत असत. पांडव सध्या गरीबीत दिवस काढत आहेत तेव्हा मुद्दाम त्यांच्यासमोर जात त्यांना आपले वैभव दाखवून लज्जित करावे असा विचार दुर्योधनाच्या मनात आला. त्या वनात असलेल्या हजारो गायींचे गोठे बघण्याचे निमित्त काढून कौरव आपल्या बायका, दास-दासी, हत्ती-घोडे, सैन्य या वैभवासकट त्या वनात आले.

त्या वनात पांडवांच्या निवासस्थानापासून जवळच्या एका सरोवराकाठी एक क्रीडागृह बांधण्यासाठी दुर्योधनाने आपले काही सेवक पाठवले. सेवक त्या सरोवराकाठी गेले असता सरोवरात जलक्रिडा करणाऱ्या चित्रसेन गंधर्वाच्या रक्षकांनी दुर्योधनाच्या सेवकांना पिटाळून लावले.

ते सेवक दुर्योधनाकडे आले व त्यांनी घडलेला सगळा वृतांत सांगितला. कौरवांना अजूनच चेव आला. आपला पराक्रम पांडवांसह आपल्या बायका-मुलांनाही पाहता यावे म्हणून कौरवांनी गंधर्वांवर चालून जायचे ठरवले. पण गंधर्वांच्या सैन्याला हरवणे इतके सोपे नव्हते. कौरव आणि चित्रसेन गंधर्वांच्या सैनिकांमध्ये जोरदार युद्ध रंगले. गंधर्वाच्या सैनिकांच्या हल्ल्यापुढे कौरव सैन्याचे काहीच चालले नाही. कौरवांचे सैन्य पळून गेले तर काही लपून बसले. याचा फायदा घेऊन चित्रसेन गंधर्वाने कौरव व त्यांच्या बायका मुलांना कैद केले.

हा प्रकार बघून काही कौरव सैनिक पळत पांडवांकडे गेले आणि वाचवण्याची विनंती करू लागले. पण काही पांडवांनी ते अमान्य केले. तेव्हा धर्मराज युधिष्ठीर म्हणाला, ‘‘थांबा, इतर वेळी कौरव हे शंभर आणि आपण पाच असलो तरी परक्या शत्रुविरूद्ध आपण एकशेपाच म्हणून उभे राहिले पाहिजे.’’ असे म्हणत त्याने भीम आणि अर्जुनाला चित्रसेनाकडे कैद असलेल्या कौरवांची व बायका मुलांची मुक्तता करायला सांगितली. मग कर्तव्य म्हणून अर्जुन भीमाने चित्रसेनाकडे जात सर्वांची मुक्तता केली.

**प्रश्नः**

१. धर्मराज युधिष्ठीराचे म्हणणे तुम्हाला पटले का?

होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

२. तुम्ही पांडव असता आणि ज्या कौरवांनी आपल्याला त्रास दिल्या त्यांना वाचवायला तुम्ही गेला असता का?

होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

३. अशा प्रसंग ओढवल्यास आपण काय केले पाहिजे असे तुम्हाला वाटते?

वाचवायला जाऊ नये ☐ त्यांना अजून त्रास द्यावा ☐

वाचवायला जावे ☐ काहीच करू नये ☐

४. आपल्यापेक्षा गरीबीत राहणाऱ्या पांडवांना खिजवणे हा कौरवांचा विचार तुम्हाला पटतो का?

होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

५. तुमच्या मनात कधी असा दुसऱ्याला मुद्दाम खिजवण्याचा विचार आला आहे का?

होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

६. 'कपट' म्हणजे काय व ते केल्याने काय साध्य होते?

७. '१०० कौरव विरुद्ध ५ पांडव' हे रूपक समजले तर कोणता गहन अर्थ आपल्याला मिळू शकतो?

८. 'वैभव' शब्दाचा अर्थ काय?

९. माणसाचे खरे वैभव कोणते?

१०. कर्तव्यदक्षता ही आपण आपल्या विद्यार्थीदशेत कशी दाखवायची?

एकी हेच बळ.

United we stand divided we fall.

# सुवर्णमृग

खर-दूषणा सारख्या शूर बंधूंचा आणि चौदा हजार राक्षसांचा धुव्वा उडविणाऱ्या राम-लक्ष्मणांना आपण मारू व सीतेला पळवून आणू याची रावणाला खात्री नव्हती. त्यामुळे त्याने सीतेला कपटाने पळविण्याचा बेत केला. यासाठी त्याने मायावी रूपे धारण करणाऱ्या मारीच राक्षसाची निवड केली. यासाठी त्याने त्याची भेट घेतली आणि सीतेला पळवून आणण्याची आपली योजना सांगितली. रावणाची मदत न केल्यास तो आपल्याला जीवे मारेल असा विचार करून मारीच त्याला साथ द्यायला तयार झाला.

त्याने मायेने सुवर्णमृगाचे रूप घेतले आणि श्रीरामांच्या कुटीभोवतीच्या भागात फिरू लागला. सुवर्णाची कातडी आणि त्यावर असणारे तारकांसारखे चमचमणारे ठिपके असा तो सुवर्णमृग सीतेने पाहिला आणि पाहताच क्षणी त्याला जिवंत अथवा मृत स्थितीत घेऊन येण्याची श्रीरामांकडे विनंती केली.

ते ऐकून लक्ष्मण म्हणाला, ‘‘दादा अशा तऱ्हेचा मृग कधी पाहण्यातच काय ऐकण्यात सुद्धा आलेला नाही. तेव्हा हा मृग म्हणजे नक्की काहीतरी मायावी प्रकाराचा भाग वाटतो. मृगाचे रूप घेऊन वावरणारा हा राक्षस नसेल कशावरून? त्यामुळे तू त्याचा पाठलाग करत जाऊ नकोस.’’

श्रीरामांना लक्ष्मणाचे म्हणणे पटले होते. त्यांनी सीतेला समजावले देखील पण सीतेचा हट्ट काही केल्या कमी होत नव्हता. तो हट्ट पुरवण्यासाठी अखेर नाईलाजाने श्रीराम त्या सुवर्णमृगाचा पाठलाग करण्यासाठी गेले. कुटीतून बाहेर पडताना श्रीराम लक्ष्मणाला म्हणाले, ‘‘लक्ष्मणा, मी परत येईपर्यंत कुठल्याही परिस्थितीत तू सीतेला एकटीला सोडून येऊ नकोस आणि ही कुटी सोडूनही जाऊ नकोस. तो मृग खरा असेल तर सीतेची इच्छा पूर्ण होईल पण तो मायावी रूपातला राक्षस असला तर माझ्या हातून त्याला मृत्यू येईल.’’

श्रीराम पाठलाग करू लागले असता तो मृग त्यांना हुलकावणी देत बराच दूर गेला. अखेर श्रीरामांनी त्याच्या दिशेने बाण सोडला आणि तो त्याला लागल्याने त्याने मूळ राक्षसाचे रूप घेतले आणि तो रामासारखा आवाज काढत मोठ्यांदा ओरडला, ‘‘लक्ष्मणा धाव! माझा घात झाला!’’ तो आवाज ऐकल्याबरोब्बर घाबरून गेलेली सीता लक्ष्मणाला म्हणाली, ‘‘भाऊजी तुम्हाला मदतीसाठी हाक मारली असता तुम्ही इथून आता गेले पाहिजे!’’

‘‘वहिनी तो आवाज माझ्या दादाचा नसून एका मायावी राक्षसाचा आहे. माझा दादा राक्षसांकडून मारला जाईल असे होणेच शक्य नाही. त्यामुळे हे कपट आहे तुम्ही याकडे लक्ष देऊ नका. मी तुम्हाला सोडून कोठेही जाणार नाही.’’ हे ऐकून सीता संतापली व म्हणाली, ‘‘अरे तुझे दादा संकटात सापडलेले असताना तू असली कसली कारणे देत आहेस? अच्छा! आत्ता माझ्या लक्षात आले. तुला हेच हवे आहे. श्रीरामांचा मृत्यू झाला की मी अनाथ होईन मग तू मला वश करू शकशील. याच दुष्ट हेतूने तू वनवासात आमच्याबरोबर आलास ना?’’ हे ऐकून शुद्ध हेतू असलेल्या व श्रीराम-सीतेला पित्या-मातेसमान मानणाऱ्या लक्ष्मणाला वाईट वाटले. तो एकही शब्द न उच्चारता श्रीरामांच्या मदतीसाठी कुटी सोडून गेला.

रावणाला जे साध्य करायचे होते ते यामुळे सुकर झाले. आता कुटीत सीता सोडून कोणीही नाही हे पाहून रावण साधूचा वेष धारण करून आला. भिक्षा मागण्याचे निमित्त करून त्याने सीतेचे अपहरण केले.

**प्रश्न:**

१. हट्ट करण्याबद्दल तुम्हाला काय वाटते?
   नेहमी करावा ☐ कधीही करू नये ☐
   कधीकधी करावा ☐ वस्तू बघून करावा ☐

२. त्या हट्टामुळे होणारे परिणाम माहित झाल्यावरही हट्ट करत राहणे योग्य आहे का?
   होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

३. एखादा हट्ट पुर्ण करण्यासाठी कोणत्याही थराला जाणे तुम्हाला योग्य वाटते का?
   होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

४. तुम्ही कधी असा हट्ट केला आहे अथवा करता का?
   होय ☐ नाही ☐ कधीच नाही ☐ कधी-कधी ☐

५. सुवर्णमृग ह्याचे विविध अर्थ सांगता येतील का?
६. लक्ष्मणरेषा का पार करायची नसते?
७. आपल्या आयुष्यातील पुढे येणाऱ्या लक्ष्मण रेषांची चर्चा करा.
८. 'मायावी' म्हणजे काय?
९. 'नाती का असतात व त्याचा होणारा परिणाम' ह्यावर चर्चा करा.
१०. 'योजनेचे महत्त्व' ह्यावर चर्चा करा.

चुकीच्या हट्टापायी संकटही ओढवू शकते.
Wrong insistence can cause crisis.

# उपमन्यूची गुरूभक्ती

आयोद धौम्य ऋषींचा उपमन्यू नावाचा एक शिष्य होता. आश्रमातील गाई-गुरांना चरण्यासाठी नेणे ही त्याच्यावरची जबाबदारी तो अगदी चोख बजावायचा. एकदा ऋषींनी त्याची परीक्षा पाहण्याचे ठरवले. ऋषींनी त्याला बोलावून विचारले, ''तू छान धष्ट-पुष्ट आहेस, तू नक्की काय खातोस?'' त्यावर उपमन्यू म्हणाला, ''गुरूदेव मी भिक्षा मागून खातो.''

''अच्छा! उद्यापासून सगळी भिक्षा माझ्याकडे आणून द्यायची आणि मी त्यातून देईन तेवढीच खायची.'' ऋषी म्हणाले. उपमन्यूने मान्य केले आणि दुसऱ्या दिवशीपासून सगळी भिक्षा ऋषींकडे आणून देऊ लागला. ऋषी सर्व भिक्षा खाऊन टाकत असत त्यामुळे उपमन्यूसाठी काहीच खायला उरत नसे. असेच काही दिवस गेले तरीही उपमन्यूवर काहीच परिणाम झाला नाही. त्याला तसेच आधीसारखे बलशाली पाहून ऋषींनी विचारले, ''उपमन्यू तुला खायला काहीच मिळत नसतानाही तू बलशाली कसा?'' त्यावर उपमन्यू म्हणाला, ''गुरूदेव मी सर्व भिक्षा तुम्हाला देऊन नंतर पुन्हा भिक्षा मागयाला जातो आणि त्यातून जे मिळेल ते खातो.'' ऋषी म्हणाले, ''हे बरोबर नाही. असे करून तू इतरांच्या भिक्षेतला वाटा संपवतो आहेस. उद्यापासून तू दुसऱ्यांदा भिक्षा मागणार नाहीस.'' ''जशी आपली आज्ञा गुरूदेव.'' उपमन्यू म्हणाला.

काही दिवस तसेच गेले तरी उपमन्यू आधीसारखाच होता. त्याला ऋषींनी पुन्हा बोलावून विचारले, ''मी सांगितल्याप्रमाणे तू काहीच खात नाहीस तरी तू धष्ट-पुष्ट कसा?'' ''मी गाई जेव्हा चरायला नेतो तेव्हा त्यांचे दूध पिऊन दिवस काढतो.'' उपमन्यू म्हणाला. हे ऐकताच ऋषी म्हणाले, ''तूच ते दूध प्यायलास तर वासरांनी काय प्यायचे. तू त्यांच्या वाट्याचे दूध पितो आहेस. हे चूक आहे. उद्यापासून तुझे दूध पिणेही बंद झाले पाहिजे.'' उपमन्यूने याही आज्ञेचे पालन केले. आपला शिष्य आपल्या परीक्षेत उत्तीर्ण होतो की नाही हे ऋषींना पाहायचे होते म्हणूनच मुद्दाम ऋषी असे कठोर होत होते.

दूध पिणे बंद झाले तरीही उपमन्यूत कोणातचा बदल नव्हता. ऋषींना हे जाणवले त्याने उपमन्यूला विचारले, ''आता तू भिक्षाही मागत नाहीस, दूधही पित नाहीस तरी तुझ्यावर काहीच कसा परिणाम झाला नाही?'' त्यावर उपमन्यू म्हणाला, ''वासरे जेव्हा गाईचे दूध पितात तेव्हा त्यातले काहीच दूध खाली सांडते ते मी पितो.'' ''हेही बरोबर नाही उपमन्यू! असे करणे तू त्वरित थांबव!'' उपमन्यूने तेही मान्य केले. आता उपमन्यूचे पोट भरण्याचे सर्व मार्ग बंद झाले होते. एकदा गाई-गुरूंना चरायला नेलेले असताना त्याला भूक सहन झाली नाही. त्याने भूक भागवण्यासाठी रूईच्या झाडाची पाने खालली. त्यामुळे त्याची दृष्टी जाऊन तो अंध झाला. काही दिसत नसल्याने राना-वनात तसाच भटकत असताना तो एका विहीरीत पडला. खूप काळ झाला तरी उपमन्यू अजून आश्रमात आला कसा नाही याचे गुरूंना आश्चर्य वाटले म्हणून त्यांनी उपमन्यूला शोधायचे ठरवले. आपल्या शिष्याला शोधत 'उपमन्यू, उपमन्यू' अशा हाका मारत ऋषी रानोमाळ भटकू लागले. आपल्या गुरूंची हाक ऐकून उपमन्यूने विहीरीतून त्यांना प्रतिसाद दिला. ऋषींनी त्याला विहीरीतून बाहेर काढले. घडलेली

सर्व हकीकत ऐकल्यावर ऋषींनी अश्विनीकुमार या देवतांच्या वैद्यांना बोलावून उपमन्यूची दृष्टी परत दिली. गुरूंनी सांगितलेल्या आज्ञांचे पालन उपमन्यूने केले याबद्दल ऋषींनीही त्याला गौरवले व आशीर्वाद दिले.

**प्रश्न:**

१. मोठ्या लोकांच्या आज्ञेचे पालन तुम्ही करता का?
नेहमी करतो ☐ कधीच नाही ☐ कधीकधी करतो ☐

२. तुम्हाला सुद्धा न खाण्याची आज्ञा केली तर?
काहीही खाणार नाही ☐ तरीसुद्धा खाऊ ☐
लपून-छपून खाऊ ☐ आज्ञापालन करण्यासाठी जिवंत राहण्याइतकेच खाऊ ☐

३. उपमन्यूसारखी गुरूभक्ती तुमच्यामध्ये असावी असे तुम्हाला वाटते का?
होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

४. ‘गुरू’ या शब्दाचा अर्थ काय?
५. गुरुचे आपल्या आयुष्यामध्ये काय महत्त्व असते?
६. आपल्या कुटुंबात किंवा नातेवाईकांमध्ये कोणी गुरू केला आहे का? केला असेल तर त्यांना त्यांच्या गुरुविषयी माहिती विचारा.
७. पुस्तके, एखादे निसर्गरम्य ठिकाण, एखादा अनुभव गुरुस्थानी असू शकतो का?
८. ऐतिहासिक आणि पौराणिक काळातील पंधरा गुरू-शिष्यांच्या जोड्या लिहा.
९. चौकोनी बॉक्स केलेले शब्द व त्याचे अर्थ लिहिण्याचा प्रयत्न करा.
१०. विवेकानंदांनी रामकृष्णांची परीक्षा घेतली होती ती माहिती गोळा करा.

शिष्याने नेहमी आज्ञाधारक असावे.

A disciple must always be obedient.

# पौंड्रक - नकली कृष्ण

श्रीकृष्णाचा काळातच एकदा एक नकली कृष्ण बनून फिरत होता. चेदिदेशात पौंड्रकवंशात वासुदेव नावाचा एक राजा होता. स्वतःच्या क्षमता जाणून न घेता तो स्वतःला भगवान विष्णूचा अवतार सांगू लागला. 'मी खरा कृष्ण असून तो द्वारकेतला कृष्ण खोटा आहे' असा अपप्राचार त्याने सर्वत्र करायला सुरूवात केली. स्वतःला भगवान विष्णूच समजायला लागल्यामुळे तो विष्णूसारखाच राहू लागला. भगवान विष्णूंसारखे शंख, चक्र, गदा, पद्म ही भगवंतांची आयुध चिन्हे त्याने धारण केली.

पण तो इतक्यावरच थांबला नाही. त्याला असे सांगून स्वतःचे महत्व वाढवायचे होते. आपल्या समकालीन असणाऱ्या श्रीकृष्णाला सगळे मानतात. त्याचे वर्चस्व कमी करून लोकांनी आपल्याला मानावे यासाठी तो काहीही करायला तयार होता.

एकदा त्याने श्रीकृष्णाकडे दूताकरवी निरोप पाठविला की, ''मी भगवान विष्णूंचा अवतार असून तुम्ही तुमचे वासुदेव हे नाव, तसेच चक्र इत्यादी चिन्हे सोडून मला शरण यावे अन्यथा युद्ध अटळ आहे.'' यावर श्रीकृष्णाने उलट निरोप पाठविला की, ''मी सर्व आयुध-चिन्हांसहित उद्याच तुझ्या नगरीत येत आहे तेव्हा तूच सावध राहा.''

दुसऱ्या दिवशी सांगितल्याप्रमाणे श्रीकृष्ण गरुडावर बसून सर्व आयुध-चिन्हांसह पौंड्रकाच्या राजधानीत पोहोचले. पौंड्रकाच्या मदतीसाठी काशिनरेश आपल्या मोठ्या सेनेसह आला होता. दोन्ही सेना कृष्णाच्या समोर उभ्या ठाकल्या. स्वतः पौंड्रक वासुदेव सर्व चिन्हे, गरुडध्वज, श्रीवत्सचिन्ह इत्यादींसह समोर आला.

भगवानांनी एका क्षणात आपल्या धनुष्यातून बाण सोडून शत्रूला घायाळ केले. गदा, चक्र यांनी सर्व सेनेचा नाश केला. पौंड्रकाचा मृत्यू झाल्याचे पाहून काशिनरेश युद्धास सज्ज झाला. पण भगवानांनी धनुष्यातून सोडलेल्या बाणांनी त्याचेही शिर कापून टाकले. व अशाप्रकारे खोट्याचा आणि त्याला खतपाणी घालणाऱ्या अशा दोघांचाही पराजय झाला.

**प्रश्न:**

१. आपण जसे नसतो तसे दाखवणे हे तुम्हाला योग्य वाटते का?
होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

२. आपल्या क्षमता समजून घेऊन वागावे का?
होय ☐ नेहमी वागावे ☐ कधीच वागू नये ☐
त्याहून अधिक आहोत असे कधीकधी दाखवावे ☐
नेहमीच आपण अधिक क्षमतेचे आहोत असेच वागवे ☐

३. इतरांसारखे बाहेरून राहिले म्हणजे आपण त्यांच्यासारखे होतो असे तुम्हाला वाटते का?
होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

४. श्रीकृष्णाचे महत्व कमी होऊन आपले महत्व वाढावे हा पौंड्रक वासुदेवाचा विचार तुम्हाला पटला का?
होय ☐ नाही ☐ कदाचित ☐

५. एखादा खोटेपण करत असेल तर काशीनरेशासारखी त्याला तुम्ही साथ द्याल का?
हो ☐ नेहमी नाही ☐ कधीही देणार नाही ☐

६. प्रत्येकजण हा विशेष आहे तेव्हा कोणीच एकमेकांसारखं होण्याची स्पर्धा करण्याची गरज नाही हे तुम्हाला पटते का?
होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

७. तुम्ही जे नाही आहात तसे कोणासारखे तरी होण्याचा आव आणता का?
होय ☐ नाही ☐ कधीकधी नकळत होते ☐

८. इतरांना खोटं ठरवण्याइतपत स्वतःचं महत्त्व एखाद्या व्यक्तीला का वाटू शकतं? त्या कारणांची यादी करा.

९. चौकोनी बॉक्समध्ये दिलेल्या शब्दांचे अर्थ शोधण्याचा प्रयत्न करा.

१०. तुमच्या आजूबाजूची एखादी व्यक्ती असा खोटेपणा किंवा दिखावा करीत असेल, तर अशावेळी तुम्ही काय कराल?

ढोंग करू नका.

Do not pretend.

# राजा दिलीप आणि नंदिनी गाय

अयोध्येत दिलीप नावाचा एक राजा होता. एकदा तो आणि त्याची राणी सुदक्षिणा अयोध्येहून हिमालयाकडे वसिष्ठ ऋषींकडे जायला निघाले होते. वसिष्ठ ऋषी हे राजाचे कुलगुरू होते.

ऋषींच्या आश्रमात पोहोचल्यावर दोघांनीही वसिष्ठ ऋषींना वंदन केले. ''गुरूदेव लग्नाला बरीच वर्षे होऊनही मुल नाही. त्यामुळे पुढे राज्याचे कसे होणार याची आम्हाला चिंता लागून राहिली आहे.'' राजाराणी म्हणाले. ऋषींनी थोडावेळ डोळे मिटून घेतले आणि सांगितले, ''राजा तू एकदा स्वर्गातल्या कामधेनू गाईकडे दुर्लक्ष केले होतेस. तिचा तुला शाप आहे म्हणूनच तुला मूल-बाळ नाही.''

''होय गुरूदेव. माझ्याकडून नकळत तसे घडले होते. मी मुद्दाम तसे केले नाही. पण आता यावर उपाय काय?'' राजा म्हणाला. ''सांगतो. त्या कामधेनूची मुलगी नंदिनी माझ्या गोठ्यात आहे. तिची सेवा तुम्ही करा. ती जर प्रसन्न झाली तर तिच्या आईने तुला दिलेल्या शापातून ती तुझी मुक्तता करेल.''

ऋषींनी सांगितल्याप्रमाणे दोघांनीही तिथेच आश्रमात राहायचे ठरवले व दुसऱ्या दिवसापसूनच नंदिनीची सेवा करण्यास आरंभ केला. राणी गोठा साफ करत असे तर राजा नंदिनीला चरण्यासाठी घेऊन जात असे. अशी सेवा सलग एकवीस दिवस दोघांनीही मन लावून केली.

बावीसाव्या दिवशी नेहमीप्रमाणे दिलीप नंदिनीला चरण्यासाठी घेऊन गेला. एका वनात ती चरत असताना, राजा मात्र तिथल्या निसर्गसौंदर्यात गढून गेला. त्याला नंदिनी कुठे आहे याचे भान राहिले नाही. नंदिनी चरता चरता एका दरीकडे वळली होती. जवळच असलेला धबधबा पाहण्यात राजा रमला होता इतक्यातच त्याला सिंहागर्जना ऐकू आली आणि तो भानावर आला. त्या गर्जनेच्या दिशेने गेल्यावर राजाला दिसले की नंदिनीच्या पाठीवर एक सिंह बसला आहे. राजाने लगेच खांद्यावरील धनुष्याला बाण लावून सिंहावर उगारला पण अचानक त्याचा हात आखडला. त्याने खूप प्रयत्न केला पण त्याच्याकडून काही बाण सुटेना. हे पाहून तो सिंह मनुष्याच्या वाणीत हसला आणि राजाशी बोलू लागला, ''राजा तू मला मारू शकत नाहीस. मी भगवती पार्वतीचा सेवक या वनाचा रक्षणकर्ता आहे. माझ्यावर कोणत्याही शस्त्राचा परिणाम होत नाही. मी तीन दिवसांपासून उपाशी आहे. या धष्ट-पुष्ट गाईमुळे मला चांगलेच खाणे मिळाले आहे.'' राजा म्हणाला, ''तू मला खा पण तिला सोड. ही माझी गुरूसेवा आहे. हे माझे व्रत आहे. या गाईच्या रक्षणाची माझ्यावर जबाबदारी आहे.'' ''अरे, मग त्यात काय या परिसरात हिच्यासारख्या दिसणाऱ्या अनेक गाई सापडतील त्यातलीच एखादी तुझ्या गुरूंच्या आश्रमात नेऊन बांध.'' तो सिंह म्हणाला. ''नाही, असे खोटे वागणे मला पटत नाही. गुरूंशी असे खोटे वागून मला जगण्यापेक्षा तू मला खाऊन तुझी भूक शमव'' असे म्हणत राजाने नंदिनीला बाजूला करत खरंच आपला देह सिंहाच्या पुढे लोटून दिला. पण सिंहाची झडप राजावर पडली नाही आणि ''राजा उठ,'' एवढेच शब्द ऐकू आले. समोर पाहतो तर सिंह गायब झाला होता. नंदिनी त्याच्याशी मनुष्यवाणीने बोलत होती. ''राजा तो सिंह खरा नव्हता, त्याला मी मायेने तयार

केला होता. तू सेवेला चुकतोस का हे मला पाहायचे होते. पण तू तसे केले नाहीस. मी तुझ्यावर प्रसन्न आहे. आता एक काम कर झाडाच्या पानांपासून एक द्रोण बनव त्यात माझे दूध काढून घे आणि ते प्राशन कर. म्हणजे तुमची संतान प्राप्तीची इच्छा पूर्ण होईल.'' त्यावर राजा म्हणाला, ''हे मी करू शकत नाही देवी नंदिनी. तुझ्या दूधावर पहिला हक्क तुझ्या वासराचा आहे. नंतर माझ्या गुरूंचा आणि नंतर त्यांनी आज्ञा दिली तरच मी ते प्राशन करू शकतो.'' ''राजा तू ह्या दुसऱ्या परिक्षेतही खरा उतरलास. तुझी इच्छा नक्कीच पूर्ण होईल. तू खरोखरीच एक आदर्श शिष्य आणि सेवक आहेस. मी तुझ्यावर प्रसन्न आहे.'' असे म्हणून नंदिनी आणि राजा वसिष्ठ ऋषींच्या आश्रमाच्या दिशेने चालू लागले.

**प्रश्नः**

१. राजासारखी सेवा किंवा एखादे व्रत कोणतीही गोष्ट यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी आवश्यक आहे असे तुम्हाला वाटते का?

होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

२. दिलेली जबाबदारी पार पाडताना प्रसंगी आपल्या प्राणांचीही पर्वा न करणे कितपत योग्य आहे?

योग्य आहे ☐ योग्य नाही ☐

३. तुमच्यावर सोपवलेली जबाबदारी तुम्ही एखादे व्रत घेतल्यासारखी कधी पूर्ण केली आहे का?

होय ☐ नाही ☐

४. या राजाप्रमाणे तुम्ही कोणाकोणाची सेवा करू शकता?

५. तुमच्या कुटुंबामध्ये अशा प्रकारची निस्वार्थी सेवा करणारी, जबाबदारी घेणारी व्यक्ती तुम्ही पाहिली आहे का? त्यांना पाहून त्यातून तुम्हाला प्रेरणा मिळते का?

६. चौकोनी बॉक्समध्ये दिलेल्या शब्दांचे अर्थ शोधून त्या शब्दांच्यासमोर तसे गुणधर्म असणाऱ्या तुमच्याशी संबंधित व्यक्तीचे नाव लिहा. उदा. सेवा – आई.

७. या कथेमध्ये राजाऐवजी तुम्ही असता तर काय केले असते?

हाती घ्याल ते तडीस न्या.

Finish the taken up task.

# धर्मराजाचा न्याय

एकदा धर्मराज युधिष्ठिराच्या दरबारात एक समस्या घेऊन गोपाल नामक एक गृहस्थ आला. राज्यात ज्या काही समस्या असतील त्यावर तोडगा काढण्यात धर्मराज निष्णात होता. सोन्याच्या मोहरांनी भरलेला हांडा त्या गृहस्थाने धर्मराजासमोर ठेवला आणि म्हणाला, ''महाराज माझ्या भावाच्या जमिनीत हा हांडा मला सापडला. मी भूपालकडून जमिनीचा एक तुकडा विकत घेतला. त्यावर मला घर बांधायचे होते तर खोदताना जमिनीत मला हा हांडा सापडला. मी त्याला जाऊन तो परत घेण्यास सांगितला पण त्याने नाकारले.''

धर्मराजाला आश्चर्य वाटले. त्याने भूपालला बोलावून विचारले, ''तू हा हांडा का घेतला नाहीस?''

''महाराज माझे म्हणणे साधे आहे. मी जेव्हा याला जमीन विकली तेव्हा या जमिनीवरचे आणि जमिनीतले सगळेच त्याचे झाले. त्यात हे धन सापडणे हा त्याच्या नशिबाचा भाग आहे. ते नशीब मी कसे घेऊ? तसे करणे मला पाप वाटते. म्हणून मी हा हांडा स्वीकारला नाही.'' भूपाल म्हणाला.

''महाराज पण मनुष्य स्वतःच्या कष्टाने पैसे कमवतो. ते त्याचे खरे धन हे असते. हे असे फ ुकटचे धन मला मिळाले तर ते धन जातेही वाईट मार्गांनी. त्यामुळे माणसाची मती भ्रष्ट होते. व्यसने जडतात आणि त्यातच सर्वनाश ओढवतो. त्यामुळे हे असे आयते धन मला नको. जे माझ्या कष्टाचे आहे तेवढेच मी स्वीकारीन.'' गोपाल म्हणाला.

''बरोब्बर महाराज हा जे म्हणाला ते, मी धन स्वीकारले तर माझ्याही बाबतीत घडेल म्हणूनच हा हांडा मला नको.'' भूपाल म्हणाला.

दोघांचेही बोलणे ऐकून धर्मराज हसला. अशी सज्जन माणसे आपल्या राज्यात आहेत याचे त्याला कौतुक वाटले. पण आता यांच्या समस्येवर उपाय कसा काढावा यावर तो विचार करू लागला आणि थोड्यावेळाने म्हणाला, ''ऐका तुम्ही असे करा की, गोपाल तुला एखादा लग्नाचा मुलगा आहे का?''

''हो आहे महाराज''

''आणि भूपाल तुला एखादी लग्नाची मुलगी आहे का?''

''आहे महाराज''

''मग तू तुझी मुलगी याच्या मुलाला दे आणि त्यांच्या लग्नाच्या खर्चासाठी तुम्ही मिळून हे धन वापरा. त्या जोडप्याचा संसार यातून नीट मांडून द्या! आहे कबूल?''

दोघांनीही ते मान्य केले व धर्मराजाचा न्याय पाहून दरबारातील सर्वांनीच त्याला गौरवले.

**प्रश्न:**

१. भूपाल आणि गोपाल यांचे कष्ट आणि धन याविषयीचे विचार तुम्हाला पटले का?
होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐ थोडेफार ☐

२. तुम्हाला असे आयते धन मिळाले तर..
आम्ही आनंदाने घेऊ ☐ कधीही घेणार नाही ☐
थोडेसे घेऊन बाकीचे परत देऊ ☐

३. धर्मराजाने समस्यावर उपाय सांगितला पण त्याने ते करताना खालीलपैकी काय काय केले असे तुम्हाला वाटते?
समस्या समजून घेतली ☐ ती असणाऱ्या दोघांची बाजू ऐकली ☐
एकाचीच बाजू ऐकून उपाय सांगितला ☐
उपाय वास्तवात आणण्यासाठीची खातरमजा न करता समस्या सोडवली ☐

४. भूपाल आणि गोपाल ह्या शब्दांचे अर्थ आणि ही गोष्ट ह्यामध्ये काही संबंध आहे का? असेल तर तो कोणता?

५. मनुष्याने धनप्राप्ती कशी करावी ह्यावर काय मार्गदर्शन केले गेले आहे?

६. भूपाल व गोपाल हे धर्मराजाकडे न्यायासाठी येतात ह्याचा अर्थ काय?

७. धनाची तुमची व्याख्या काय?

८. तुमच्याकडे असे प्रकरण आले असते तर तुम्ही कुठल्या प्रकारचा न्याय दिला असता?

९. 'प्रत्येक समस्येवर उपाय असतो' ही गोष्ट तुम्हाला मान्य आहे का?

१०. सज्जन माणसाची कोणती लक्षणे ह्या गोष्टीमधून आपल्या लक्षात येतात?

कोणतीही समस्या सोडविताना सत्‌सद्‌विवेकाचा विजय होणे आवश्यक आहे.
Common sense must prevail while solving any problem.

# मत्स्य अवतार

वेद हे विपुल ज्ञान देणारे आहेत. हे जग प्रलय काळात नष्ट होऊन जेव्हा पुन्हा निर्माण होतं तेव्हा वेदांचं ज्ञान नवीन सृष्टीत असावे लागते. अशीच एकदा स्थिती झाली. एकदा ब्रह्मदेवांकडून हयग्रीव नावाच्या दैत्याने वेद चोरले. हा दैत्य समुद्राच्या तळाशी राहत होता. प्रलय जवळ आला होता. प्रलयानंतर पुन्हा सृष्टी निर्माण होते तेव्हा हे वेद या सृष्टीत असणे गरजेचे होते त्यामुळे तिथून त्या दैत्याकडून ते वेद परत मिळवण्याची आवश्यकता निर्माण झाली.

दक्षिणेत सत्यव्रत नावाचा राजा होता. तो भवान विष्णूंचा भक्त होता. केवळ पाणी पिऊन तो त्यांची तपश्चर्या करत असे. एक दिवस नदीत स्नान करीत असताना एक लहान मासा त्याच्या ओंजळीत आला. त्याने तो आपल्या कमंडलूमध्ये ठेवला. पण माशाचा आकार दिवसेंदिवस वाढत चालला होता त्यामुळे त्याला तो कमंडलू पुरेना. म्हणूनच राजाने त्याला भांड्यात ठेवले आणि माशाचा आकार वाढत गेला तसे अधिक मोठ्या पात्रात ठेवू लागला. सरतेशेवटी मासा इतका मोठा झाला की त्याला एका तळ्यात ठेवावे लागले. त्यानंतर त्या माशाने संपूर्ण तळे देखील व्यापले तेव्हा त्याला राजाने समुद्रात नेऊन सोडले. पण हे सगळे पाहून राजा गोंधळून गेला. त्याच्या मनात विचार आला की खरोखर एका विशिष्ट हेतून भगवान विष्णूंनीच हा अवतार घेतला असावा. म्हणून त्याने त्या माशासमोर हात जोडले आणि प्रार्थना केली की, 'आपण मत्स्य रूपात आला आहात का? मला काहीच कल्पना येत नाही. मला कृपया मार्गदर्शन करावे.' ही प्रार्थना ऐकल्यावर त्या माशाच्या रूपातून भगवान बोलू लागले, ''होय. आजपासून सातव्या दिवशी प्रलय येणार आहे. त्यावेळी एक मोठे जहाज तुझ्याकडे येईल. तोपर्यंत तू सर्व वनस्पती, झाडे-झुडपे, बिया, वृक्ष आणि विविध जातींचे प्राणी जमव. त्या सर्वांना घेऊन जहाजात बस. वादळाने जहान हेलकावे खाईल, सर्वत्र अंधार असेल पण तू घाबरू नकोस प्रलयकाल संपेपर्यंत त्या जहाजाला आधार देण्यासाठी मी असीन.''

खरोखरच सातव्या दिवशी प्रलयाला सुरूवात झाली. भयंकर वादळे होऊ लागली, मुसळधार पाऊस सुरू झाला. समुद्राने आपली सीमा सोडली. जिकडे तिकडे नुसते पाणीच झाले. सत्यव्रताने सांगितल्याप्रमाणे केले. प्रलयकाल संपेपर्यंत त्या विशाल झालेल्या मत्स्य रूपातील देवाने त्या जहाजातील सर्वांना आधार दिला. प्रलयकाल संपला आणि तो विशाल मासा समुद्राच्या तळाशी गेला. तिथे असलेल्या हयग्रीव दैत्याचा वध केला आणि त्याच्याकडील वेद परत आणले.

# शोध-बोध गोष्टी क्र.:०१३

**प्रश्न:**

१. हयग्रीव दैत्याने जशी चोरी केली तशी चोरी करणे तुम्हाला पटते का?

होय ☐ नाही ☐ कधीकधी ☐

२. समुद्राच्या तळाशी असलेल्या दैत्याला मारण्यासाठी पाण्यात टिकाव धरू शकेल असेच रूप घेतले. त्यामुळे एखाद्या संकटाला तोंड देण्यासाठी आपण तेवढे सक्षम असले पाहिजे हे तुम्हाला पटते का?

होय ☐ नाही ☐ थोडी क्षमताही पुरेशी ☐

३. सत्यव्रताने देवाने जे सांगितले त्यावर विश्वास ठेवला आणि नुसता विश्वास न ठेवता त्याने जसे सांगितले तसे सगळे वाचवायचे कामही केले. विश्वास आणि दिलेले काम हे दोन्हीही महत्वाचे आहे असे वाटते का?

होय ☐ नाही ☐ केवळ विश्वास पुरेसा ☐

४. एखादी मोठी गोष्टी पारंगत होण्यासाठी त्या गोष्टीच्या तळाशी जावून समजून घ्यावी लागते हे तुम्हाला पटते?

होय ☐ नाही ☐ केवळ वरवर समजून घेतली तरी पुरेसे आहे ☐

५. वेद ह्या शब्दाचा अर्थ काय?

६. 'वेद चोरणे' ह्याचा भावार्थ / गूढार्थ काय?

७. सत्यव्रत व भक्त ह्या शब्दांचे वर्णन करा.

८. अवतार घेणे व जन्म घेणे ह्यामध्ये फरक काय?

९. 'वेद परत आणणे' म्हणजे काय?

१०. हयग्रीव ह्या शब्दाचा अर्थ काय आहे?

ज्ञान जतन केल्यास पुढील पिढ्यांना उपयोगी ठरते.

Preservation of knowledge is useful for generation to come.

# कूर्म अवतार

एकदा दुर्वास ऋषी वैकुंठातून परत येत असताना त्यांना वाटेत इंद्रदेव भेटला. भगवान विष्णूंनी दिलेला हार त्यांनी इंद्राच्या गळ्यात घातला. पण तो आपल्याच धुंदीत चालू लागला. त्याने तो हार त्याचे वाहन असणाऱ्या ऐरावत या हत्तीला घातला. हत्तीने तो हार काढून टाकत पायी तुडवला. हे पाहून दुर्वास ऋषींना राग आला. त्यांनी इंद्राला 'या तुझ्या गर्वाचा, धुंदीचा परिणाम म्हणून तुझे सगळे वैभव नष्ट होऊन देवांचे अमरत्वही जाईल' असा शाप दिला. या शापाचा लगेच परिणाम झाला. इंद्राची सत्ता असलेल्या स्वर्ग व पृथ्वीवरची सर्व धार्मिक कृत्ये बंद झाली होती. देव दुर्बळ झाले असून असुर बलशाली झाले होते. त्यांनी सर्वत्र अशांतता पसरवली. सज्जन, निरपराध माणसांना त्रास द्यायला सुरूवात केली. त्यांचा छळ केला. त्यांना तोंड देण्यात देवताही अपयशी पडत होत्या.

काय करावे हे कळत नसल्यामुळे इंद्र आणि इतर देवता भगवान विष्णूंकडे गेल्या. दुःखी-कष्टी झालेल्या देवतांना श्रीविष्णू म्हणाले, असुर सध्या ताकदवान झाले आहेत म्हणून तुम्ही त्यांच्याशी समेट करा. क्षीरसागराचे मंथन करण्यात त्यांची मदत मागा. त्यातून जे अमृत निघेल ते पिऊन तुम्ही अमर व्हाल. सर्व औषधी झाडे-झुडपे, वेली समुद्रामध्ये टाका. मंदार पर्वताला रवी बनवा आणि सर्पराज वासुकीला दोर करा. असुरांशी जुळवून घेऊन मंथन करा. ते ज्या अटी ठेवतील त्या मान्य करा. मंथनातून अनेक गोष्टी निघतील. अमृता बरोबरीनेच हलाहल विषही निघेल. त्यामुळे जागरूक राहा, दक्ष राहा, सावध राहा. उगीच आसक्त होऊ नका तसेच घाबरूनही जाऊ नका.

भगवान श्रीविष्णूंच्या सांगण्याप्रमाणे देवतांनी केले व देव-असुरांमध्ये समुद्रमंथन सुरू झाले. त्यांनी मंदार पर्वताला रवी बनवली आणि सर्पराज वासुकीला दोरी. देव-असुरांनी मंदार पर्वत उचलून तो समुद्रात ठेवला आणि मंथन सुरू केले. पण मंदार पर्वताला खाली कोणता आधार नसल्याने तो समुद्रात बुडू लागला. मंथन होण्यासाठी मंदार पर्वत टिकणे गरजेचे होते पण तोच बुडायला लागल्याने मंथन करणे अशक्य होते. यावर काय करावे कोणालाच कळेना. तेव्हा भगवान विष्णूंनी कूर्म म्हणजे कासवाचे रूप घेतले आणि समुद्राच्या तळाशी जाऊन तो मंदार पर्वत आपल्या पाठीवर धरला. त्यामुळे मंदार पर्वताला आधार मिळाला आणि मंथन म्हणजे घुसळणे सुरू झाले. देव-असुरांचे कार्य व्यवस्थित पार पडावे म्हणून भगवान विष्णूंनी हा कूर्म अवतार घेतला.

**शोध-बोध गोष्टी क्र.:०१४**

**प्रश्न:**

१. कासवाच्या खालील कोणत्या गोष्टी तुमच्यात असाव्यात असं तुम्हाला वाटतं?
कासवाची गती ☐ कासवाची स्थिरता ☐ कासवाएवढं आयुष्य ☐

२. ताक घुसळल्यामुळे लोणी मिळते तसेच एखादी गोष्ट मिळवण्यासाठी तिचे मंथन होणे म्हणजे सर्व बाजूंनी विचार होणे गरजेचे असते. आणि तो करण्यासाठी आपण कासवासारखे स्थिर असावे लागते हे तुम्हाला पटते का?
होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

३. एखादी गोष्ट पार पडावी म्हणून तुम्ही कोणत्याही प्रकारचा आधार द्याल का?
हो ☐ नेहमी नाही ☐ कधीही देणार नाही ☐ कधीकधी देऊ ☐

४. कासव जास्त काळापर्यंत त्यांचा श्वास रोखून धरू शकतं. पाण्यात राहू शकाणाऱ्या कासवाची सहनशक्तीही जास्त असते. अशी सहनशक्ती तुमच्यात असावी असं तुम्हाला वाटतं का?
होय ☐ नाही ☐ थोडीशी ☐

५. खालील शब्दांचे अर्थ व स्पष्टीकरण द्या.
धुंदी वैभव राग अमृतत्व मंथन

६. समुद्रमंथन हे कशाचे रूपक आहे?

७. समुद्रमंथनातून आलेली १४ रत्ने कोणती?

८. कासवाबद्दल माहिती गोळा करायची आहे तर तुम्ही कोणकोणत्या गोष्टींचा विचार कराल?
क्तूं बवदबमचज उंचण

९. देवळामध्ये कासव जमीनीवर रेखाटलेले असते त्याचे कारण काय?

१०. कूर्म ह्या शब्दाचा अर्थ काय?

कोणत्याही महत्कार्याला स्थिरता जरूरी असते.

Stability is necessary for any big venture.

# नरसिंह अवतार

हिरण्याक्ष आणि हिरण्यकश्यपू हे राक्षस बंधू होते. हिरण्याक्षाचा वध करण्यासाठी भगवान विष्णूंनी वराह अवतार घेतला तर हिरण्यकश्यपूचा वध करण्यासाठी भगवान विष्णूंनी नरसिंहाचा अवतार घेतला.

आपल्या भावाला हिरण्याक्षाला मारल्याचा बदला घ्यायचे हिरण्यकश्यपूने ठरवले. त्यामुळे त्याने भगवान विष्णूंशी मनात वैर धरले. स्वतःला अधिक बलशाली बनवण्यासाठी त्याने कठोर तपश्चर्या सुरू केली. तहान–भूक कसलीच शुद्ध त्याला राहिली नाही. त्याचे शरीर मुंग्यांच्या वारूळांनी आणि जंगली गवताने झाकून गेले. त्याचे तप इतके प्रचंड होते की त्याने ब्रह्मदेवांना प्रसन्न करून घेतले. ब्रह्मदेवांनी त्याला उठवले आणि वर मागण्यास सांगितले.

त्याचे शरीर आता सोन्याप्रमाणे चमकू लागले होते. तो अधिक धष्ट–पुष्ट झाला होता. त्याने ब्रह्मदेवासमोर लोटांगण घालून सांगितले, ''तुम्ही निर्माण केलेल्या या सृष्टीतल्या कोणच्याही हातून मला मरण येता कामा नये, देव असो मनुष्य असो, असुर असो प्राणी असो वा अगदी निर्जीव वस्तू असो. मला दिवसा व रात्री, घराबाहेर अथवा घरामध्ये, आकाशात अथवा पृथ्वीवर मरण येऊ नये. मला कोणत्याही शस्त्राने मरण येऊ नये. मनुष्य, असुर व देवता या तिघांवर माझी पूर्ण सत्ता मिळो.'' ब्रह्मदेवांनी 'तथास्तु' म्हणत त्याला वर दिला.

या वराच्या जोरावर हिरण्यकश्यपूने तिन्ही लोक जिंकले. त्याच्या राज्यात यज्ञ–याग, पूजा या देवासाठी नाही त्याच्यासाठी होऊ लागल्या. त्याने लोकांना त्याची स्वतःची पूजा करण्यास भाग पाडले. जो त्याला देव मानणार नाही त्याचा छळ करायला त्याने सुरूवात केली. लोक त्याच्या या दहशतीला वैतागले. आणि सर्वांनी भगवान विष्णूंकडे त्याला ठार मारण्याची विनंती केली.

हिरण्यकश्यपूचा धाकटा मुलगा प्रल्हाद यालाही त्याने सोडले नाही. आपला मुलगा आपल्याला देव मानायचे सोडून त्या विष्णूचे गोडवे गातो हे त्याला सहन होईना. त्यामुळे त्या मुलाचा त्याने असंख्यप्रकारे छळ केला. हत्तीच्या पायदळी देणे, उंच कड्यावरून ढकलून देणे, विषारी सर्प अंगावर सोडणे, एकांत कोठडीत दिवसेंदिवस अन्न–पाण्याविना ठेवणे, समुद्रात फेकून देणे, आगीत ढकलणे अशा नानाविध प्रकारांमधून प्रल्हादाला जावे लागले. त्यातूनही तो सुखरूप बाहेर आल्याचे पाहून हिरण्यकश्यपूचा पारा चढला. त्याने एकदा शेवटचे त्याला सांगितले, ''प्रल्हादा मीच भगवान आहे. मीच ईश्वर आहे. तुझा विष्णू कोणीही नाही.''

त्यावर प्रल्हाद म्हणाला, ''नाही बाबा, एक श्रीविष्णूच भगवान आहेत. तेच विश्वाचे स्वामी आहेत. संपूर्ण विश्वात तेच भरून राहिले आहेत.''

''अस्सं! मग मूर्खा तुझा विष्णू या खांबातही आहे का?''

''होय त्यातही आहे.''

''हो का? मग आता त्याला माझ्यासमोर प्रगट व्हावेच लागेल.'' असे म्हणत हिरण्यकश्यपूने बेभान होऊन खांबावर गदेने आघात करण्यास प्रारंभ केला. आणि एकाएकी तो खांब दुभंगला. त्याचा आवाज सर्वत्र होऊ लागला. बघता बघता त्या खांबातून सिंहाचे मुख आणि माणसाचे धड

असे महाकाय शरीर बाहेर आले. त्याचे मुख, डोळे, आयाळ तेजस्वी होती. त्याची छाती भरदार व सशक्त होती. त्याचे दात व नखे धारदार व चमकदार होती. तो भगवान विष्णूंचा नरसिंह अवतार होता. भगवंताचे हे असे विशाल रूप बघून तेथे असणारे सर्व दैत्यही पळून गेले. नरसिंहाला मारण्यासाठी हिरण्यकश्यपूने गदा हातात घेतली. त्याबरोबरच नरसिंहाने एक प्रचंड गर्जना केली. अत्यंत सहजपणे त्यांनी त्या दैत्याला उचलले आणि उंबरठ्यावर घेऊन जात आपल्या मांडीवर ठेवले. मग पुन्हा एकदा गर्जना करीत त्यांनी हिरण्यकश्यपूचे पोट व छाती फाडून टाकली.

तेथील पळून चाललेल्या दैत्यांचाही वध केला. क्रोधाने लालेलाल झालेले ते उग्ररूप आता काही केल्या शांत होत नव्हते. तेव्हा लहानग्या प्रह्लादाने नरसिंहांकडे जात त्यांना लोटांगण घातले. तेव्हा शांत होत नरसिंहांनी प्रह्लादाला जवळ घेतले व त्याच्या डोक्यावरून हात फिरवत त्याला आशीर्वाद दिले.

**प्रश्न:**

१. आपणच सर्वश्रेष्ठ आहोत ही भावना योग्य आहे का?

होय ☐ नाही ☐

२. सूड उगवण्यासाठी तपश्चर्या करणे योग्य आहे का?

होय ☐ नाही ☐

३. हिरण्यकश्यपूचे आपल्या मुलाबरोबर वर्तन योग्य होते का?

होय ☐ नाही ☐

४. ब्रह्मदेवाने हिरण्यकश्यपूला दिलेला वर सांभाळून नृसिंहाने हिरण्यकश्यपूचा वध केला असे आपणास वाटते का?

होय ☐ नाही ☐

५. ‘हिरण्यकश्यपू’ म्हणजे काय?

६. ‘हिरण्याक्ष’ म्हणजे काय?

७. ‘भगवान’ या शब्दाचा अर्थ काय आहे?

८. आशीर्वाद म्हणजे काय?

९. तुम्ही मोठ्यांकडून कोणत्या आशीर्वादाची अपेक्षा कराल?

१०. दहशत म्हणजे काय?

कल्पनेनेच एखाद्या कल्पनेशी संघर्ष करावा लागतो.

An idea has to be fought with an idea.

# वामन अवतार

प्रह्लादाचा मुलगा विरोचन आणि त्याचा मुलगा बळी हा पुढे राज्य चालवू लागला. याचे कुळ दैत्य असले तरी प्रह्लादामुळे यांच्यात विष्णूभक्ती भिनली होती. पण असे असले तरी बळीचा इंद्राने अनेकदा युद्धात पराभव केल्याचा त्याला बदला घ्यायचा होता. इंद्राला हरवून तिथे आपली सत्ता असावी हा अहंकार त्याला झाला. इंद्रावर विजय मिळवण्यासाठी त्याने विश्वजित नावाचा यज्ञ आरंभला. त्यातून त्याला रथ, घेडे, धनुष्य, अक्षय बाणांचे भाते आणि एक संरक्षक चिलखत मिळाले. या सर्वांनी त्याने इंद्रावर हल्ला चढवला आणि त्याचे राज्य जिंकून घेत स्वर्गावर राज्य करायला सुरूवात केली. तो तिन्ही लोकांचा राजा झाला. हे यश दिल्याबद्दल त्याने परमेश्वराची कृतज्ञता म्हणून अश्वमेध यज्ञ आरंभला.

इंद्राकडून त्याचे राज्य हिसकावून घेतले होते तेही एक सूडापोटी. असा गर्व झालेल्या बळीने देवासाठी यज्ञ करायचे कितीही ठरवले असले तरी त्याला अद्दल घडवणेही गरजेचे होते. यासाठीच भगवान विष्णूंनी वामन अवतार घेऊन बळीला अद्दल घडवण्याचे ठरवले. त्यांनी आदितीच्या पोटी जन्म घेतला. त्यांचे वामन असे नाव ठेवण्यात आले. थोडे मोठे झाल्यावर त्यांची मुंज करण्यात आली व त्या लहानग्या बटुच्या वेशातच ते बळी राजाकडे गेले.

तेव्हा बळी राजा नर्मदेच्या काठी अश्वमेध यज्ञ करत होता. बळी दैत्य कुळातला राजा असला तरी त्याने ऋषी मुनींचा छळ केला नव्हता. तो नेहमीच सर्वांचा सन्मान करत असे. यज्ञाच्या ठिकाणी लहानग्या बटुला पाहून बळीने त्याचा सन्मान केला व म्हणाला, बटु महाराज तुम्हाला काय हवे ते मागा मी सर्वकाही देण्यास समर्थ आहे.

वामन हसले आणि म्हणाले, ‘‘हे राजन् मला फार काही नको केवळ माझी तीन पावले जागेची जमिन मला दे!’’

बळी वामनाच्या लहान पावलांकडे बघत म्हणाला, ‘‘याहून अधिक काहीतरी मागा, एखादे बेट किंवा सुसज्ज असे घर.’’

‘‘शहाण्या माणसाने आपल्या गरजेपेक्षा अधिक कधीही मागू नये. त्यामुळे माझ्या तीन पावलांएवढी जागा मला पुरेशी आहे!’’ वामन हसत म्हणाला.

बळी हसला आणि म्हणाला, ‘‘ठीक! मग, मोजा तुमच्या तीन पावलांएवढी भूमी.’’

बळीने कमंडलूतले पाणी हातावरून सोडले आणि वामनाला दान देण्याचे वचन दिले.

बळीचे गुरू शुक्राचार्य यांना काहीतरी वेगळे वाटले त्यांनी बळीला थांबवयाचा प्रयत्न केला. ‘‘भगवान विष्णुच वामन बनून आले असल्याचे मला वाटते आहे’’ असे त्यांनी बळीला सांगितले, ‘‘ते आपल्या दोन पावलातच सर्व लोक व्यापतील मग तिसरे पाऊल कोठे ठेवायला सांगणार? अजून वेळ गेलेली नाही. तू वचन मागे घे.’’

पण बळी म्हणाला, ‘‘मी एकदा दिलेला शब्द परत घेऊ शकत नाही. मला नरक मिळो अथवा मृत्यू, मला त्याचे भय नाही. पण दिलेले वचन मोडणे माझ्या तत्वात बसत नाही.’’

"असे करून तू तुझे सारे ऐश्वर्य आणि वैभव गमावून बसशील" शुक्राचार्य म्हणाले.

तरीही बळी ठाम राहिला. त्याने व त्याच्या पत्नीने वामनाचे पाय धुतले. आणि मग तो आश्चर्याने पाहतच राहिला. पाहता पाहता वामन मोठा झाला. त्याने आपल्या पहिल्या पावलाने पृथ्वीच व्यापून टाकली. दुसऱ्या पावलाने स्वर्ग आणि राहिलेले विश्व व्यापले. बळीराजाकडे पाहत तो म्हणाला, "आता तिसरे पाऊल मी कोठे ठेऊ?"

बळीने मस्तक लववून म्हटले, "प्रभू आपली जर इच्छा असेल तर आपण आपले तिसरे पाऊन माझ्या डोक्यावर ठेवा."

वामनाने तिसरे पाऊन बळीच्या मस्तकावर ठेवले व म्हणाले, "जन्म, कर्तृत्व, सत्ता, विद्वत्ता आणि संपत्ती यांच्याविषयी गर्व झाला की मनुष्य त्याचा सर्वनाश ओढवत असतो हे सदैव लक्षात ठेव." भगवान विष्णूंच्या पदस्पर्शाने बळीचे मस्तक पवित्र झाले. त्याच्या चुकीची शिक्षा म्हणून त्याला पातळात ढकलून तिथे द्वारपालक करण्यात आले व तो अमर चिंरजीवी देखील झाला.

**प्रश्न:**

१. बळीकडून काय स्वीकारण्यासारखे आहे असे तुम्हाला वाटते?
दिलेले वचन कोणत्याही परिस्थितीत पाळणे ☐
छोट्या-मोठ्यांचा सन्मान करणे ☐
सूड उगवत राज्य बळकावणे ☐
सगळीकडे आपली सत्ता असल्याचा गर्व ☐
यशाबद्दल देवाची कृतज्ञता ☐

२. शहाण्या माणसाने आपल्या गरजेपेक्षा अधिक कधीही मागू नये हे वामनाचे म्हणणे तुम्हाला पटते का?
होय ☐ नाही ☐ थोडेसे ☐

३. जन्म, कर्तृत्व, सत्ता, विद्वत्ता आणि संपत्ती यांच्याविषयी गर्व झाला की मनुष्य त्याचा सर्वनाश ओढवतो या वाक्याशी तुम्ही सहमत आहात का?
होय ☐ नाही ☐ थोडेसे ☐

४. तुम्हाला तुमच्या गोष्टींचा गर्व आहे असे प्रामाणिकपणे वाटते का?
होय ☐ नाही ☐ थोडासा ☐ माहित नाही ☐

५. पराभवानंतर तुम्ही खालीलपैकी काय कराल?
पराभव मान्य करू ☐ त्याचा सूड उगवू ☐

६. अहंकार कशामुळे होऊ शकतो?

७. गुरू म्हणजे कोण?

८. अवधूत गीतेमध्ये कोणत्या २४ गुरुंचा उल्लेख केला आहे?

अतिरेक, मग तो कोणत्याही गोष्टीचा असो, वाईटच.

Extremity of any deed, is always bad.

# धृतराष्ट्राचा अंधाभिमान

हस्तिनापूर नरेश शंतनु आणि राणी सत्यवती यांना चित्रांगद आणि विचित्रवीर्य नावाचे दोन पुत्र झाले. चित्रांगद आणि विचित्रवीर्य यांच्या बालपणीच शंतनुचा स्वर्गवास झाला होता. त्यामुळे त्यांचे सर्व पालन पोषण भीष्मांनी केले. चित्रांगद मोठा झाल्यावर भीष्मांनी त्याला राज सिंहासनावर बसवले, परंतु काही काळातच गंधर्वांशी युद्ध करताना चित्रांगद मारला गेला. त्यावर भीष्मांनी त्याचा भाऊ विचित्रवीर्य याच्याकडे राज्यकारभार सोपवला. आता भीष्मांना चिंता होती ती विचित्रवीर्य याच्या विवाहाची. त्याच सुमारास काशिराजाच्या तीन कन्या अंबा, अंबिका आणि अंबालिका यांचे स्वयंवर होणार होते. त्या स्वयंवरात घुसून भीष्मांनी एकट्याने तिथल्या सर्व राजांचा पराभव केला आणि तीनही कन्यांचे अपहरण करून त्यांना हस्तिनापुरात घेऊन आले. त्यातील मोठी कन्या अंबा हिने भीष्मांना सांगितले की तिने आपले तन-मन राजा शाल्व याला अर्पण केलेले आहे. तिची गोष्ट ऐकून भीष्मांनी तिला राजा शाल्व याच्याकडे पाठवून दिले आणि अंबिका आणि अंबालिका यांचे विवाह विचित्रवीर्य याच्यासोबत लावून दिले. विचित्रवीर्य आपल्या दोन्ही राण्यांसोबत भोग विलासात रत झाला, परंतु दोन्ही राण्यांपासून त्याला कोणतेही अपत्य झाले नाही, आणि पुढे क्षयरोगाने ग्रस्त होऊन तो मरण पावला. आता कुलाविनाश होण्याच्या भीतीने एक दिवस माता सत्यवतीने भीष्मांना सांगितले, वंशाचा नाश होऊ नये यासाठी माझी आज्ञा आहे की तू या दोन्ही राण्यांपासून पुत्र उत्पन्न कर. तिचे हे बोलणे ऐकून भीष्म म्हणाले, माते, मी माझी प्रतिज्ञा कोणत्याही परिस्थितीत मोडू शकत नाही. हे ऐकून माता सत्यवतीला अपार दुःख झाले. तिने आपला ज्येष्ठ पुत्र वेदव्यास यांचे स्मरण केले. स्मरण करताच  वेदव्यास तिथे उपस्थित झाले. त्यांना पाहून सत्यवती म्हणाली, पुत्रा, तुझे सर्व भाऊ निःसंतानच स्वर्गवासी झाले. त्यामुळे माझ्या वंशाचा अंत होऊ नये यासाठी मी तुला आज्ञा देते की तू नियोग विधीने त्यांच्या पत्नींपासून संतान उत्पन्न कर. वेदाव्यासने तिची आज्ञा मान्य केली. आणि यथावकाली अंबिकाच्या गर्भातून जन्मांध धृतराष्ट्र, अंबालिका हिच्या गर्भातून पंडुरोगाने ग्रस्त पंडू यांचा जन्म झाला.

धृतराष्ट्राचा विवाह गांधारीशी झाला. पती अंध असल्याने गांधारीनेही डोळ्यावर पट्टी बांधून जन्मभर अंध राहायचे ठरवले. पंडू शापामुळे जंगलात निघून गेला. त्यामुळे धृतराष्ट्राला सिंहासन मिळाले. गांधारीने खूप समजावून देखील धृतराष्ट्राने गांधारीचे पिता आणि त्याचा संपूर्ण परिवार यांना आजीवन कारावासात टाकले होते. वयोवृद्ध आणि ज्ञानी असून देखील धृतराष्ट्राच्या मुखातून कधीही न्याय्य गोष्ट बाहेर पडली नाही. पुत्रमोहाने त्याने कधीही गांधारीच्या न्याय्य सांगण्याकडे लक्ष दिले नाही. गांधारीच्या व्यतिरिक्त विदुरदेखील त्याला न्याय्य गोष्टी समजावून सांगून राज्य आणि धर्माच्या हिताच्या गोष्टी सांगत असे, परंतु तो त्याचेही ऐकत नसे. तो नेहमी दुर्योधन आणि शकुनी यांच्याच गोष्टी सत्य मानत असे. त्याला माहिती होते की ते दोघे अधर्म आणि अन्याय करत आहेत, परंतु तो तरीही पुत्राचीच साथ देत असे. आपल्या मुलांचे चुकीचे वागणे पाठीशी घालण्याचा परिणाम म्हणूनच महाभारत युद्ध झाले.

mensa india tribal mensa nurturing program ETSN | European Talent Support Network

# शोध-बोध गोष्टी क्र.:०१७

**प्रश्न:**

१. दिसत असताना डोळ्यावर पट्टी बांधून घेणे तुम्हाला योग्य वाटते का?

होय ☐ नाही ☐

२. ज्ञानी आणि अनुभवी असूनही धृतराष्ट्राकडून न्याय्य वर्तन घडले नाही हे तुम्हाला पटते का?

होय ☐ नाही ☐

३. मोहापायी कोणाचेही गैरवर्तन पाठीशी घालणे योग्य वाटते का?

होय ☐ नाही ☐

४. तुमच्या हिताच्या गोष्टी तुम्हाला सांगितल्यास तुम्ही -

नुसते ऐकाल ☐ दुर्लक्ष कराल ☐ ऐकून त्याप्रमाणे आचरण कराल ☐

ऐकून स्वत:च्या मनाप्रमाणे कराल ☐

५. तुमच्या अहिताच्या गोष्टी सांगणाऱ्यांचे

नुसते ऐकाल ☐ दुर्लक्ष कराल ☐ ऐकून त्याप्रमाणे आचरण कराल ☐

ऐकून स्वत:च्या मनाप्रमाणे कराल ☐

६. महाभारताचे मूळ नाव काय?

७. महाभारतामध्ये १८ ह्या संख्येचे महत्त्व फार आहे. ते काय आहे?

८. एक औक्षणि सैन्य म्हणजे किती?

९. गांधारी, विदूर ह्यांच्या गुणांची सूची करा.

१०. 'धृतराष्ट्र आंधळा होता' ह्याचा अर्थ काय?

कोणत्याही गोष्टीचा अंधाभिमान वाईट.

A baseless pride of anything is bad.

# रंतिदेवाची करूणा

रंतिदेव नावाचा एक उदारहृदयी आणि दानशूर राजा होता. प्रत्येक सजीवामध्ये तो भगवान हरीला पाहत असे. गरीब आणि गरजूंना तो नेहमी दान करत असे. श्रीहरी असलेल्या कितीतरी मुखांमध्ये अजून अन्नाचा घास पडायचा असताना मी नुसताच बसून उपभोग का घेत राहू? दान देण्यासाठी त्याच्याकडे नेहमीच अन्न व वस्त्र भरपूर असे. कोणाच्याही उपयोगी पडताना ती देवाचीच सेवा आहे असे राजाला वाटे. अशाप्रकारे अनेक वर्षे सुख-समृद्धीत गेली. प्रजा आपल्या राजाच्या उदार प्रेमामध्ये न्हाऊन गेली. पण एकदा राज्यात भयानक दुष्काळ पडला. पिके हातची गेली. गुरे-ढोरे मेली आणि स्त्रिया-पुरूष-मुला-बाळांची मोठ्या प्रमाणावर उपासमार होऊ लागली. लोकांच्या झुंडीच्या झुंडी रंतिदेवाच्या राजवाड्यासमोर येऊ लागल्या. रंतिदेव देवाला एकच प्रार्थना करत असे, 'देवा या लोकांचे दुःख दूर करण्याची मला शक्ती दे.' मग तो बाहेर जाई आणि असेल ते सर्वांना वाटून टाकी. तरीही दुष्काळ राहिलाच होता आणि दिवसेंदिवस तो भीषण होत होता.

एक वेळ अशी आली की रंतिदेवाला स्वतःला खायलाही काही उरले नाही. तो आपल्या कुटुंबाचेही पोट भरू शकत नव्हता. कारण प्रजेला खायला दिल्याशिवाय त्याच्या घरातले कोणीही खात नसे. कधी कधी इतरांना अन्न असे पण राजा उपाशी राहत असे. तरीही तो समाधानात होता. पण परिस्थिती खूप बिघडल्यामुळे त्याच्याकडे लोकांना देण्यासाठीही काही राहिले नाही. कोठूनही मदत मिळेना. दुष्काळ तसाच राहिला. कित्येक माणसांना आपले प्राण गमवावे लागले. राजाही अशक्त झाला होता. त्याला हालचाल करणेही अवघड जात होते.

इतक्यातच त्याला कोणीतरी पीठ, दूध आणी तुपात बनविलेली खीर आणून दिली. भूक-तहानेने व्याकूळ राजा ते खाण्यास सुरूवात करणार इतक्यात दारात एक माणूस आला. राजाने त्याचे स्वागत करत थोडीशी खीर त्याला दिली. तो गेल्यावर पुन्हा एकदा खीर खाणार तर एक गरीब माणूस एका कुत्र्याबरोबर राजवाड्यापाशी आला आणि म्हणाला, "महाराज मी आणि माझ्या कुत्र्याने बऱ्याच दिवसात काही खाल्ले नाही. तुमच्याकडे काही खायला असल्यास आम्हाला द्या!" राजाने उरलेली खीर त्याला देऊन टाकली.

आता राजाकडे खायला काहीच शिल्लक नव्हते. थोडेसे राहिलेले पाणी प्यायला जाणार इतक्यात एक माणूस, 'घशाला कोरड पडली आहे कृपया थोडे पाणी प्यायला द्या' असे म्हणत रंतिदेवाकडे आला. राजाने पाण्याचे भांडे त्या माणसाच्या ओठांना लावले. श्रीहरीचेच हे एक रूप म्हणत त्याने त्याचीही सेवा केली. तो गेल्यावर राजा इतकेच म्हणाला, "हे भगवन मला काहीही नको. दुसऱ्यांचे दुःख समजण्याची कुवत मला दे आणि त्यांची सेवा करण्याची शक्ती दे. इतरांच्या दुःख यातनांबाबत मी कधी बेपर्वा बनू नये. त्यांच्या दुःखाचे निवारण करून त्यांना सुखी करण्यासाठी तू मला निमित्त कर."

त्याच्या या प्रार्थनेने भगवान विष्णु त्याच्यावर प्रसन्न झाले. त्याचे सर्व ऐश्वर्य त्याला परत प्राप्त झाले व तो महान योगींपैकी एक झाला व सतत ध्यानमग्न राहू लागला.

**प्रश्न:**

१. रंतिदेवाची दानशूरता आचरणात आणण्यासारखी तुम्हाला वाटते का?
होय ☐ नाही ☐

२. रंतिदेवाने सर्वांवर सारखीच करुणा दाखवली हे योग्य वाटते का?
होय ☐ नाही ☐

३. लोकांचे दु:ख दूर करण्याची मला शक्ती दे ही प्रार्थना योग्य वाटते का?
होय ☐ नाही ☐

४. तुम्ही भुकेने खूप व्याकुळ झालेले असताना कोणी खायला मागायला आल्यास तुम्ही द्याल का?
होय ☐ नाही ☐ थोडेसे देऊ ☐ हाकलून लावू ☐
सगळेच्या सगळे देऊ ☐

५. करुणेची तुमची व्याख्या कोणती?

६. कृती केली म्हणजे करुणा प्रकट केली असे तुम्हाला वाटते का? असल्यास कोणत्या कृती?

७. तुमच्याकडून अशा कृती घडल्या आहेत का?

८. लोकांची दु:खे दूर करण्याची शक्ती तुम्हाला मिळाल्यास तुम्ही काय कराल?

९. रंतिदेवाची कथा कोणत्या ग्रंथात दिली आहे?

१०. रंतिदेव शब्दाचा अर्थ काय?

नेहमी दयाशील असावे.

One must always be compassionate.

# जडभरत

पूर्वी आपल्या सगळ्या जबाबदाऱ्या पार पाडून झाल्यावर वनात निघून जात उर्वरित आयुष्य ध्यान-धारणेत घालवण्याची प्रथा होती. याला वानप्रस्थ म्हणत असत. याचे पालन सर्वजण करत असत मग तो एखादा राज असो, व्यापारी असो अथवा मजूर असो.

राजा भरताने राज्यकारभार आपल्या मुलांच्या हाती सोपवत गंडकी नदीचा तीर गाठला. तिथे एक कुटी बांधून तो त्यात राहू लागला. ध्यानधारणेत मग्न राहून देवाचंच सतत चिंतन करू लागला.

एक दिवस त्याच्या कुटीच्या बाहेर नदीकाठी एक घटना घडली. एक हरिणी कळपापासून दूर नदीकाठी पाणी प्यायला आली होती. इतक्यात तिला सिंहाची डरकाळी ऐकू आल्याने तिने नदीत उडी मारली. तिच्या पोटात असणाऱ्या पाडसाला तिने नदीतच जन्म दिला. कशीबशी ती दुसऱ्या काठावर पोहोचली खरी परंतु तीव्र धक्क्याने आणि अति श्रमांमुळे ती मरण पावली. ते पाडस मात्र प्रवाहात वाहून जात होते. भरत हे सर्व दृश्य कुटीतून बघत होता.

तो झटदिशी उठला आणि त्याने त्या पाडसाला वाचवून आपल्या कुटीत आणले. दिवसेंदिवस त्याची त्या पाडसावर मुलाप्रमाणे माया जडली. त्या पाडसाचे रूपांतर आता एका सुंदर हरणात झाले होते. भरताचे मन परमेश्वराकडे वळण्यापेक्षा त्या हरणाकडे वळले. त्याच्या मनात सतत त्या हरणाचेच विचार असत. ते बाहेर गेले की ते कधी परत येणार याकडे त्याचे डोळे लागून राहिलेले असत.

अशीच काही वर्षे गेली. सर्व संपत्ती, सत्ता साम्राज्य सोडून मन कशात अडकू नये म्हणून जो वनात निघून गेला होता त्याचे मन त्या हरणात अडकले होते. भरताचा अंतकाळ जवळ आला होता. मृत्यूची वाट पाहत असताना ते हरीणही त्याच्या शेजारी बसून अश्रू ढाळीत होते. भरताने प्राण सोडताना शेवटचा विचार देवाऐवजी त्या हरणाचा केला. मरतानाचा शेवटचा जो विचार तो पुढचा जन्म ठरवत असल्यामुळे याचा परिणाम असा झाला की त्याला पुढील जन्म हरणाचा आला. परंतु त्याला पूर्वजन्माचे स्मरण राहिले. तो कधी एकदा या हरणाच्या जन्मातून आपली सुटका होते याचा विचार करू लागला. तो त्याच्या कळपापासून दूर गेला आणि त्याने पुलह-आश्रम गाठला. तिकडे ऋषींची प्रवचने त्याच्या कानावर पडू लागली. आणि एक दिवस तिथेच त्याने हरणाच्या जन्माचा त्याग केला.

यानंतर त्याचा जन्म एका श्रीमंत कुटुंबात झाला. पण गेल्या दोन जन्मांमध्ये भोगावे लागलेले दुःख तो विसरला नव्हता. त्यामुळे तो या जन्मी सगळ्यापासून लांब राहत असे. तो कधीच काही बोलत नसे. सांगितलेली कामे काहीही न बोलता करत असे. लोक त्याला वेडा म्हणत, शिव्या घालत. तरीही तो कधी काहीच बोलत नसे. तो शांत ध्यानमग्न अवस्थेत बसून राहत असे. एकदा असेच बसलेले असताना त्याचा बळी देण्याचाही प्रयत्न झाला पण त्यातूनही तो वाचला. त्याला कसलीच शुद्ध राहत नसे.

एकदा राजा रहूगण पालखीत बसून चालला होता. तिथे जवळ झाडाखाली बसलेल्या भरताला एका भोयाच्या जागी बळजबरीने जुंपण्यात आले. तेव्हा चालताना खाली असलेल्या किडे-मुंग्या,

अळ्यांचा जीव जाऊ नये म्हणून तो जपून पावले टाकत होता. प्रसंगी उड्याही मारत होता. यामुळे पालखीत बसलेल्या राजाला हिसके बसत होते. राजा चिडला आणि त्याने बाहेर डोकावून पाहिले तर त्याला नवीन भोई उड्या मारत असल्याचे दिसले.

तो ओरडला, ''मूर्खा तू दमला असशील आणि तुला जमत नसेल तर पालखीचा दांडा खाली ठेव. उगाच मला हिसके देऊ नकोस.''

त्यावर पहिल्यांदाच भरताच्या तोंडून शब्द आले, ''कोणाला मूर्ख म्हणत आहेस? या शरीराला ना? खुशाल म्हण. ते आज ना उद्या जाणार आहे. जो कायम राहणारा आहे त्या देवाकडे माझे लक्ष लागून राहिले आहे. तो या किड्या-मुंग्यांमध्ये देखील आहे. त्यांना इजा पोहोचू नये म्हणून मी त्यांना वाचवत चालत होतो.''

राजाने हे ऐकले आणि तो पालखीतून खाली उतरला आणि त्याने भरताचे पाय धरले. त्याला गुरू मानून त्याच्याकडून उपदेश घेतला. दोन जन्म आधीच मुक्त होण्यासाठी निघालेला राजा भरत एका छोट्याशा चुकीमुळे दोन जन्म अडकला.

**प्रश्नः**

१. भरताने हरिणाच्या पाडसाला वाचविले हे योग्य केले का?

होय ☐ नाही ☐

२. त्या हरिणाच्या पाडसाला भरताने –

वाचवायला हवे होते ☐ पाळायला हवे होते ☐

जंगलात सोडून द्यायला हवे होते ☐ वाचवायला नको होते ☐

३. सर्व संपत्ती, सत्ता साम्राज्य सोडून मन कशात अडकू नये म्हणून वनात निघून गेल्यावरही मन अडकणे योग्य आहे का?

होय ☐ नाही ☐

४. किडा मुंग्यांनाही इजा पोहोचू नये ही भरताची भावना तुमच्यामध्ये असावी असे तुम्हाला वाटते का?

होय ☐ नाही ☐

५. आपली छोटीशी कृतीदेखील काळजीपूर्वक केली गेली पाहिजे, हे भरताच्या उदाहरणावरून तुम्हाला पटते का?

होय ☐ नाही ☐

६. कोणत्या गोष्टीमध्ये मन गुंतवावे किंवा त्याचे चिंतन करावे असे तुम्हाला वाटते?

७. मरताना शेवटी तुम्ही कसला विचार कराल?

८. तुम्हाला लोकांनी वेडा म्हणून शिव्या घातल्या तर तुम्ही काय कराल?

९. एखादा गुरू मानून त्याचा उपदेश घेणे तुम्हाला गरजेचे वाटते का? असल्यास गुरू कसा असावा?

१०. जडभरताची कथा कोणत्या ग्रंथात आहे?

११. वानप्रस्थ आश्रमासारखे एकूण किती आश्रम आहेत?

१२. एखादी वाईट कृती घडत असताना ती तुम्ही नुसती बघत बसाल की त्याप्रमाणे कृती कराल? आणि का?

आपली छोट्यातील छोटी कृतीदेखील आपण काळजीपूर्वक केली पाहिजे नाहीतर त्याची मोठी किंमत मोजावी लागते. Enjoy but don't indulge.

# पुरंजनाची कथा

कोणे एके काळी पुरंजन नावाचा एक राजा होऊन गेला. स्वतःला राहण्यासाठी एखादे ठिकाण शोधत पुरंजन खूप फिरला. परंतु कोणतेच ठिकाण त्याला पसंत पडले नाही. जेथे सर्व सोयी सुविधा पुरवल्या जातील असे ठिकाण त्याला हवे होते. अखेरीस हिमालयाच्या दक्षिणेकडे एक सुंदर नगर त्याला दिसले. त्या नगरामध्ये मोठे-मोठे राजवाडे होते. सुंदर बागा, थंड स्वच्छ पाण्याची तळी होती. नगराला नऊ द्वारे होती. ते नगर राहण्यासाठी अतिशय योग्य आहे असे पुरंजनाला वाटले आणि तो तिथे राहू लागला. एकदा तिथे दास-दासींसह एक सुंदर युवती आली. ती फिरत असताना तिची पुरंजनाशी भेट झाली. पुरंजनाने तिला मागणी घातली. ती म्हणाली, ‘‘मी या राज्याची राजकुमारी आहे. तू जर या राज्याचा राजा होशील तर मी तुझी राणी बनायला तयार आहे. माझे सर्व दास-दासी तुझे दास-दासी बनतील.’’ पुरंजनाने ते मान्य केले आणि तिच्याशी लग्न केले. आणि तो तिच्यामध्ये पूर्णपणे गुंतून गेला. इतका की, ती हसली की हा हसे. ती रडली की हा रडे. ती जिथे पाहत असेल तिथे हा पाहत असे. ती ज्या वस्तूला स्पर्श करेल त्याला हा स्पर्श करत असे. तो स्वतःचे मत, विचार, विवेक गमावून बसला आणि पूर्णपणे तिच्या स्वाधीन होऊन गुलाम झाला. यामुळेच त्याला त्याचे राज्य गमवावे लागले. युद्धात प्रचंड हानी झाली. पुरंजनाला नगरातून हकलवले गेले. तरीही त्याने तिचा विचार सोडला नव्हता. मरतानाही तो तिच्याच विचारात मेला. त्यामुळे त्याला पुढचा जन्म एका सुंदर स्त्रीचा आला. तिने एका राजाशी लग्न केले. तिचे आपल्या पतीवर प्रेम होते. एके दिवशी तो मरण पावला. तीही रडत रडत त्याच्या पाठोपाठ चितेवर चालली असताना एक ब्राह्मण तिच्यापुढे आला व म्हणाला, ‘‘हे काय मित्रा, काय अवस्था झाली आहे तुझी? अल्पशा सुखांच्या मागे लागून तू चक्रात अडकला आहेस. मागच्या जन्मी एका स्त्रीमध्ये अडकून तू तुझा सर्वनाश ओढवलास आणि या जन्मी पतीप्रेमात अडकलीस. हे काहीच कायमचे टिकणारे नाही हे ध्यानात ठेव. असा जीव देऊ नकोस. जे कायम टिकणारे सत्य आहे त्याला आयुष्याचे ध्येय बनव, जागा हो!’’

**शोध-बोध गोष्टी क्र.:०२०**

प्रश्नः

१. माणसाला स्वतःचे मत, विचार, विवेक असणे गरजेचे आहे का?

होय ☐ नाही ☐ थोडेतरी ☐

२. दुसऱ्याच्या स्वाधीन होऊन गुलाम होणे तुम्हाला योग्य वाटते का?

होय ☐ नाही ☐

३. कोणतीही गोष्ट कायम टिकणारी नाही हे समजून वागणे तुम्हाला पटते का?

होय ☐ नाही ☐ थोडेतरी ☐

४. थोड्याशा सुखांच्या मागे लागल्याने वाट्याला दुःख आल्याचा तुमचा अनुभव आहे का?

होय ☐ नाही ☐

५. एखादे नगर राहण्यासाठी योग्य आहे हे कशावरून ठरवता येईल?

६. तुम्ही स्वतःचे मत, विचार, विवेक गमावून बसलात तर काय होईल असे तुम्हाला वाटते?

७. दुसऱ्याचे गुलाम होणे तुम्हाला पटेल का? तसे झाल्यास काय होते?

८. काय कायम टिकणारे आहे असे तुम्हाला वाटते?

त्यामुळे मुलांनो सर्वच तात्कालिक असते

Everything is temporary.

# परीक्षित राजा

एके दिवशी राजा परीक्षित शिकारीसाठी गेला होता. शिकार ऐन रंगात आल्याने त्याला वेळेचे भान राहिले नाही. बराच वेळ झाल्याने त्याला तहान लागली. कोठे पाणी मिळते का ते पाहण्यासाठी तो फिरू लागला. फिरता फिरता तो एका निबीड अरण्यात आला आणि तिथे असलेल्या शमिक ऋषींच्या आश्रमात येऊन पोहोचला. त्याला तिथे फारसे कुणीही दिसले नाहीत पण एक ऋषी ध्यानस्थ बसलेले दिसले. तो तहानेने इतका व्याकूळ झाला होता की त्याला ऋषी ध्यानस्थ आहेत हेही लक्षात राहिले नाही. त्याने ऋषींना विचारले की, मला पाणी मिळेल का? शमिक ऋषी ध्यानमग्न होते. त्यांना स्वतःच्या देहाचे काहीच भान राहिले नव्हते त्यामुळे हे त्यांना ऐकू जाणे अशक्य होते. पण राजाने तरीदेखील विचारले. काहीच उत्तर येत नसल्यामुळे राजाने असा समज केला की हे ऋषी ढोंग करत आहेत. हे ढोंग आहे का ध्यान हे आता तपासायलाच हवे असे म्हणत त्याने एक मेलेला साप घेऊन तो ध्यानस्थ बसलेल्या शमिक ऋषींच्या गळ्याभोवती गुंडाळला. आश्रमापासून जवळच असलेल्या झऱ्यातून पाणी आणण्यासाठी शमिक ऋषींचा मुलगा शृंगी गेला होता. त्याला हा प्रकार समजला. परीक्षित तिथून निघून जात असताना त्याला शृंगी चिडून म्हणाला, ‘‘राजा तू केलेल्या या अपमानाचा परिणाम म्हणून आजपासून सातव्या दिवशी तुला तक्षक नावाचा सर्प दंश करेल आणि त्यामुळे तुझा मृत्यू होईल असा मी तुला शाप देतो.’’

थोड्यावेळाने शमिक ऋषी ध्यानातून बाहेर आले व त्यांनी डोळे उघडले. जवळच बसलेल्या शृंगीकडे बघत त्यांनी विचारले, ‘‘तू रडत का आहेस?’’ तेव्हा त्याने घडलेली सर्व हकीकत सांगितली. त्यावर शमिक ऋषी म्हणाले, ‘‘तू हे बरोबर केले नाहीस बाळ. इतके कठोर होऊ नये. राजे लोक निराळे असतात. त्यांच्यावर राज्याचा भार असल्याने त्यांना व्यवधाने असतात. शिवाय परीक्षितसारखा चांगला राजा लाभणे हे राज्यासाठी गरजेचे आहे. असो. हे देवा माझ्या मुलाला क्षमा कर. आता सर्वकाही तुझ्या हातात आहे.’’

राजवाड्यात परतल्यावर परीक्षिताला आपल्या वागण्याचा पश्चात्ताप झाला. आपण केलेल्या कृतीला आपले मरण हीच योग्य शिक्षा आहे असे म्हणत त्याने जन्मेजयाला बोलावून त्याच्याकडे राज्यकारभार सोपावला. तसेही आज ना उद्या मरण येणार आहेच. आता राहिलेले दिवस भगवंताच्या ऋषींच्या स्मरणात, चिंतनात, सहवासात घालवून मरणाला सामोरे जाणेच इष्ट असा विचार करत त्याने राजवाडा सोडला. त्यानंतर त्याची वेदव्यासांचे पुत्र शुकमुनी यांच्याशी भेट झाली व त्यांनी त्याला ज्ञानाचा उपदेश केला.

**प्रश्न:**

१. खरी परिस्थिती लक्षात न घेता, परीक्षित राजाने आपणहून जो समज करून घेतला तो योग्य होता का?

होय ☐ नाही ☐

२. ढोंग आहे का ध्यान हे पाहण्यासाठी राजाने केलेली कृती तुम्हाला योग्य वाटते का?

होय ☐ नाही ☐ इतर मार्गाने कळले असते ☐

राजाने निघून जायला हवे होते ☐

३. तुम्ही शृंगीसारखी रागाच्या भरात एखादी कृती करून मोकळे होता का?

होय ☐ नाही ☐ कधीकधी ☐

४. अशा रागाच्या भरात केलेल्या कृतीचा तुम्हाला नंतर पश्चात्ताप वाटतो का?

होय ☐ नेहमी ☐ कधीही नाही ☐ विसरून जातो ☐

दुर्लक्ष करतो ☐ कधीकधी ☐

५. शमिक ऋषींचे आपल्या मुलाला समजावणे तुम्हाला योग्य वाटते का?

होय ☐ नाही ☐

६. कोणत्याही गोष्टीचा शेवट मान्य करणे तुम्हाला गरजेचे वाटते का?

होय ☐ नाही ☐

७. कोणाची टिंगल करावी असे तुम्हाला वाटते का? असे का वाटते?

८. रागाच्या भरात शाप देण्याने काय होईल असे तुम्हाला वाटते? तुम्ही त्याचे समर्थन करता का?

९. एखाद्या कृतीचा पश्चात्ताप होणे योग्य आहे का? त्यातून काय कळते?

१०. कोणत्या गोष्टीच्या चिंतनात, सहवासात राहायला तुम्हाला आवडेल?

परीक्षित राजाने त्याचा शेवट मान्य केला, तो स्वीकारला आणि राहिलेल्या दिवसात दु:खी न राहता आनंदाने मरणाला सामोरा गेला.

Death is certain hence accept it and be happy.

# कृष्णावरील चोरीचा आळ

द्वारका शहरात सत्राजित नावाचा एक सरदार होता. सत्राजिताने सूर्यनारायणाची भक्ती केली. त्याच्या भक्तीवर प्रसन्न होऊन त्याने सत्राजिताला स्यमंतक नावाचा मणी दिला. स्यमंतक मणी सुंदर तर होताच पण रोज थोडे फार सोने देत असे. सत्राजिताने एकदा हा स्यमंतक मणी श्रीकृष्णाला दाखविला. तेव्हा त्याने तो मणी मागितला. पण सत्राजिताने तो मणी श्रीकृष्णाला दिला नाही. एक दिवस सत्राजितचा भाऊ प्रसेन तो मणी गळ्यात घालून शिकारीस गेला आणि परतच आला नाही. तेव्हा त्या मण्याच्या लोभाने श्रीकृष्णाने प्रसेनाला ठार मारले असा आळ सत्राजिताने घेतला. श्रीकृष्णाने प्रसेनला शोधण्याचे ठरविले. शोधता शोधता त्याला एका गुहेत प्रसेनचे प्रेत सापडले. पण त्याच्या गळ्यात मणी नव्हता. थोडे पुढे गेल्यावर एक मेलेला सिंह आढळला तर तिथून जवळच एका मुलाच्या गळ्यात तो मणी श्रीकृष्णाने पाहिला. त्या मुलाचे नाव जांबवान होते. जांबवानाने सांगितले, ‘प्रसेनाला सिंहाने ठार मारले, सिंहाला मी ठार मारले त्यामुळे तो मणी माझा झाला आहे. मी तो तुला देणार नाही.’ दोघांच्यात युद्ध रंगले. श्रीकृष्णाने जांबवानाला हरवले. जांबवानाने मणी कृष्णाच्या स्वाधीन केला.

श्रीकृष्णाने तो मणी सत्राजिताला परत दिला व घडलेली सर्व हकीकत सांगितली. आपण उगाच कृष्णावर आळ घेतल्याचे सत्राजिताला वाईट वाटले व तो श्रीकृष्णाला शरण आला. त्याचे उतराई होण्यासाठी त्याने आपली मुलगी सत्यभामा हिचा श्रीकृष्णाशी विवाह लावून दिला.

**प्रश्न:**

१. एखाद्यावर आळ घेणे तुम्हाला योग्य वाटते का?

होय ☐ नाही ☐ कधीकधी ☐

२. संशयातून आळ घेतला म्हणजे तीच सत्यपरिस्थिती आहे असे समजता येईल का??

होय ☐ नाही ☐ कधीकधी ☐

३. तुमच्यावर आळ घेतला गेला तर -

तो खोटा आहे हे सिद्ध करू ☐ गप्प बसू ☐ आळ मान्य करू ☐

४. सत्राजिताने आळ खोटा आहे हे मान्य करून श्रीकृष्णाची माफी मागितली हे तुम्हाला योग्य वाटते का?

होय ☐ नाही ☐

५. तुम्हाला कधी कोणावर आळ घेतल्याचा पश्चात्ताप झाला आहे का?

होय ☐ नाही ☐ काही वेळा ☐

६. सूर्यनारायण म्हणजेच सूर्याकडून शिकता येतील अशा गोष्टींची यादी करा.

७. तुमच्याकडे एखादी गोष्ट मागितल्यावर ती न देणे याचे समर्थन तुम्ही कसे कराल?

८. एखाद्या गोष्टीवरील हक्क कसा ठरवता येतो असे तुम्हाला वाटते?

९. दुसऱ्यावर आळ घेण्याआधी काय करावे असे तुम्हाला वाटते?

आधाराशिवाय कधीही कोणावर आरोप करू नयेत आणि
ते खोटे आहेत हे कळल्यावर माफी मागावी.

Do not accuse without knowing the reality.

# कृष्णशिष्टाई

द्यूत खेळण्याच्या सवयीमुळे पांडवांना राज्य गमवावे लागले होते. राज्य परत मिळवण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू होते. युद्ध टाळण्यासाठी पांडवांनी चर्चेचा मार्ग निवडला पण त्याचा उपयोग झाला नाही. पांडवांनी केवळ पाच गावे मागितली होती पण 'तीच काय एका सुईच्या टोकावर राहिल एवढी मातीही आम्ही देणार नाही' अशी भाषा कौरवांकडून केली जात होती. त्यानंतर युद्ध अटळ आहे हे सर्वांनी समजून घेतले. पण श्रीकृष्णाने ही समस्या सामोपचाराने सोडवण्याचा एक शेवटचा प्रामाणिक प्रयत्न करण्याचे ठरवले. 'पांडवांनी श्रीकृष्णला शिष्टाई करायला पाठवले असते तर युद्ध टळले असते' असे म्हणायचा अवसर कौरव पक्षातील भीष्म, द्रोण अशा ज्येष्ठ मंडळींना मिळू नये म्हणूनच कृष्ण हा अखेरचा प्रयत्न करत होता.

त्यावर युधिष्ठीर म्हणाला, ''तू जाऊ नकोस कृष्णा. तू आमचा दूत बनून गेलास तर ते तुझा अपमान करतील अगदी तुला ठारही मारायला मागे पुढे पाहणार नाहीत. तूच नसलास तर त्रिभुवनाचे राज्य मिळाले तरी ते आम्हाला नको.''

श्रीकृष्ण म्हणाला, ''त्याची चिंता करू नकोस. माझ्या सुरक्षेची व्यवस्था मी आधीच करून ठेवीन.'' त्याप्रमाणे सगळी व्यवस्था करत श्रीकृष्णाने हस्तिनापुर गाठले. दुपारचे भोजन झाल्यावर तो राजसभेत गेला. कृष्ण येणार म्हणून अनेक राजे आणि ऋषीमुनीही राजसभेत आल्याने राजसभा भरून गेली होती. त्यांचा आदर सन्मान करत व स्वीकारीत धृतराष्ट्राजवळच ठेवलेल्या त्याच्या आसनावर कृष्ण बसला व म्हणाला, ''धृतराष्ट्र महाराज मी आज पांडवांचा दूत म्हणून आलो असलो तरी, तुम्हीही माझेच असल्याने मी तुमचेही हित लक्षात घेऊन बोलणार आहे. कौरवांनी कपटाने पांडवांकडून राज्य जिंकून घेतले. द्यूताच्या अटींप्रमाणे पांडव आता तेरा वर्षांच्या वनवासातून व अज्ञातवासातून बाहेर आले आहेत. अशावेळी त्यांना त्यांचे राज्य परत करायला नको का? तरीही सामोपचाराची भाषा मला तुमच्या पक्षाकडून दिसत नाही. त्यांनी पाच गावे मागितलेली असताना तीही नाकारणे यावरून तुम्हाला युद्धच हवे आहे असे दिसते. तुमच्या मुलांचे हे सर्व वर्तन तुम्हाला पटते का?''

यावर धृतराष्ट्र म्हणाला, ''ते माझे ऐकत नाहीत.''

''पण राजसत्ता तर तुमच्याच हाती आहे ना? या अशा कपटी मुलांना तुम्ही जेरबंद केले पाहिजे.''

हे ऐकून दुर्योधन, दुःशासन आणि शकुनीला राग आला. त्याने राजसभा सोडली आणि ते कृष्णाला ठार मारण्याचा कट रचू लागले. यासाठी कृष्णाने आधीच व्यवस्था केली होती.

धृतराष्ट्र आणि कौरव पक्ष काहीच ऐकत नाहीत हे पाहून शेवटी श्रीकृष्ण म्हणाला, ''ठीक आहे, मी तुम्हाला सहा दिवसांचा अवधी देतो तोपर्यंत काय तो निरोप पांडवांकडे पाठवा. अन्यथा सातव्या दिवशी युद्धाचे अग्निकुंड पेटलेले असेल आणि त्यात एकेका कौरवाची आहुती पडू लागेल हे ध्यानात ठेवा.''

**प्रश्नः**

१. कोणतीही समस्या कशाप्रकारे सोडविली पाहिजे असे तुम्हाला वाटते?
सामंजस्याने ☐ शांततेने ☐ हिंसेने ☐

२. कौरवांनी पांडवांची मागणी नाकारली हे तुम्हाला पटते का?
होय ☐ नाही ☐

३. कपटाने वागणे तुम्हाला योग्य वाटते का?
होय ☐ नाही ☐

४. एखाद्या समस्येचा परिणाम मोठी हानी पोहोचवणारा असेल तर ती हानी टाळण्याचा एक प्रयत्न करणे तुम्हाला पटते का?
होय ☐ नाही ☐

५. धृतराष्ट्राने आपल्या दुष्ट मुलांबरोबर काय करायला हवे होते असे तुम्हाला वाटते?
जेरबंद करणे ☐ त्यांना पाठीशी घालणे ☐ त्यांना समजावणे ☐
दुर्लक्ष करणे ☐

६. चांगल्या मार्गाने समस्या सोडविण्यास आलेल्याला मारणे तुम्हाला योग्य वाटते का?
होय ☐ नाही ☐

७. चांगल्या मार्गाने सांगूनही जेव्हा समस्या सुटत नाही तेव्हा हिंसेचा मार्ग अवलंबावा लागतो हे तुम्हाला पटते का?
होय ☐ नाही ☐

८. कौरवांच्या भूमिकेचे समर्थन तुम्ही करता का? आणि का?

९. सामोपचार म्हणजे काय असे तुम्हाला वाटते?

१०. दुसऱ्याला ठार मारण्याचा कट रचणे याचे समर्थन तुम्ही करता का?

११. कृष्णशिष्टाई विषयी आणखी माहिती मिळवा.

१२. कृष्णशिष्टाईची कथा कोणत्या ग्रंथामध्ये आढळते??

कृष्णशिष्टाई हाही एक गुण आहे. एखादी समस्या सोडविण्यासाठी प्रथम सामोपचाराचा प्रयत्न केला पाहिजे.

Try to solve the problem with a dialogue initially.

# हा सूर्य आणि हा जयद्रथ

कौरव आणि पांडवांच्या युद्धातले तेरा दिवस संपले. अर्जुनाने शपथ घेतलेल्या वीरांना त्याने ठार केले होते. पण पांडवांच्या शिबीरात दुःखाची कळा पसरल्याचे अर्जुनाच्या लक्षात आले. अभिमन्यूच्या मरणाचे वृत्त समजण्यास त्याला वेळ लागला नाही. अनेक कौरव योद्ध्यांनी त्याला मिळून कपटाने मारल्याचे त्याला समजले. तेव्हा अर्जुन दुःखाने भरून गेला आणि रागाने संतापला. जयद्रथाने विकल अशा अभिमन्यूच्या मस्तकावर लाथ मारल्याचे त्याला समजले आणि त्याबरोबर अर्जुन म्हणाला, ''मी उद्या सूर्य अस्ताला जाण्यापूर्वीच जयद्रथाला ठार करीन, जर असं झालं नाही तर मी स्वतःला अग्नीत जाळून घेईन.''

दुसरा दिवस उजाडला. अर्जुनाच्या ह्या प्रतिज्ञेवर श्रीकृष्ण म्हणाला, ''अर्जुना तू फार उतावळेपणा केलास. तुझ्या भावांचे मत जाणून घेतले नाहीस आणि प्रतिज्ञा करून मोकळा झालास. शकट नावाचे व्यूह रचून ते जयद्रथाला वाचवणार आहेत. जयद्रथ तुझ्या हाती लागणे अवघड आहे.''

त्यावर अर्जुन म्हणाला, ''अरे पण तू आहेस ना माझ्याबरोबर, मग कसली चिंता?''

अर्जुन रणांगणात आला. अर्जुनाने आपला देवदत्त शंख फुंकला. समोर दुःशासन गजसैन्य घेऊन उभा होता. अर्जुनाने बाणांनी हत्तींची गंडस्थळे फोडून टाकली व दुःशासनाचा पराभव केला. अर्जुनाचा रथ आता कौरव सेनेत घुसला. इतक्यात भोजराजाचे तीन मुलगे सेना घेऊन धावले. त्यांचाही अर्जुनाने निःपात केला. अवंतीचे विंद व अनुविंद हे राजे धावले त्यांचीही मस्तके अर्जुनाने धडापासून वेगळी केली. आता अर्जुन जयद्रथाच्या दिशेने निघाला. तीन प्रहर दिवस निघून गेला होता. सूर्यास्त होण्यासाठी काहीसाच अवधी शिल्लक होता. या शेवटच्या प्रहरात जयद्रथ सापडला नाही तर अर्जुनाला प्राण द्यावे लागतील त्यामुळे कृष्ण काय करायचे हे ठरवत होता. तेवढ्यात त्याने एक शक्कल लढवली. श्रीकृष्णाने सुदर्शन चक्र सूर्याआड घातले आणि त्यामुळे सूर्यास्ताचा भास झाला.

कृष्ण म्हणाला, ''अर्जुना तुझी प्रतिज्ञा मोडली. तो बघ सूर्यास्त झाला.'' अर्जुनाने धनुष्य खाली ठेवले. आणि अग्निकुंड रचायला सुरूवात केली. पांडवांच्या सैन्यात दुःखाची छाय पसरली तर कौरवांना आनंद होत होता. अर्जुन अग्नीत उडी घेणार हे पाहण्यासाठी कौरवही जमले. अर्जुनाने कृष्णाला नमस्कार केला आणि अग्नीकुंडाला प्रदक्षिणा केली. हे सगळे जयद्रथ निरखून पाहत होता. जयद्रथ आल्याचे कृष्णाने पाहिले आणि म्हणाला,

''अर्जुना अरे धनुष्यबाणाशिवाय प्रदक्षिणांचा काय उपयोग? धनुष्यबाण सुद्धा अग्नीत टाक म्हणजे तू खरा योद्धा!'' असे म्हणता म्हणता त्याने सूर्याआडचे सुदर्शन चक्र परत घेतले व लगेचच म्हणाला, ''अर्जुना हा पहा सूर्य आणि हा जयद्रथ! कर आपली प्रतिज्ञा पूर्ण!''

सूर्य दिसताच अर्जुनाने बाणाने जयद्रथाचे शीर उडवून दिले. अर्जुनाची प्रतिज्ञा पूर्ण झाली.

**प्रश्न:**

१. युद्धाचे नियम मोडून अभिमन्यूला ठार मारणे तुम्हाला योग्य वाटते का?

होय ☐ नाही ☐

२. अर्जुनाने संतापाच्या भरात घेतलेल्या प्रतिज्ञेचे तुम्ही समर्थन करता का?

होय ☐ नाही ☐

३. आपण प्रतिज्ञा करून ती पूर्ण करण्याची जबाबदारी देवावर सोडावी याचे समर्थन तुम्ही कराल का?

नेहमी तसेच करावे ☐ असे अजिबात करू नये ☐

केवळ प्रतिज्ञा करावी ☐ प्रतिज्ञाच करू नये ☐

४. कपटाने वागणाऱ्यांसाठी श्रीकृष्णाने जशास तसे दिलेले उत्तर तुम्हाला पटते का?

होय ☐ नाही ☐

५. महाभारताचे युद्ध एकूण किती दिवस चालले?

६. अभिमन्यू व अर्जुनाचे नाते काय?

७. अभिमन्यूच्या आईचे नाव काय?

८. अभिमन्यूला मारण्यासाठी कोणता व्यूह रचला गेला?

९. महाभारतकालीन युद्धाच्या नियमांची यादी करा.

१०. रागाच्या भरात केलेल्या प्रतिज्ञेचे तुम्ही समर्थन कराला का? आणि का?

आपण संतापाच्या भरात प्रतिज्ञा करून जातो पण ती पूर्ण करण्याची क्षमता आपल्यात असायला हवी.

Do not take vow for things beyond your capacity

# द्यूत खेळायची सवय

धर्मराज युधिष्ठिराला द्यूत हा सारीपाटासारखा सोंगट्यांचा खेळ खेळण्याची सवय होती.

कौरवांना हे पक्के माहित होते. याचा त्यांनी फायदा करून घेतला. शकुनी आणि दुर्योधनाने धृतराष्ट्राला सांगून पांडवांना द्यूत खेळायला बोलावण्यास सांगितले. सगळे पांडव हस्तिनापूरला आले. या द्यूताच्या खेळापायी धर्मराज युधिष्ठीराने आपले राज्य, भाऊ, बायको सर्व हरले. द्रौपदीची विटंबना झाली. धृतराष्ट्राने त्यांना इंद्रप्रस्थाला जाण्याची मोकळीक दिली. याचे कारण त्यांना पुन्हा एकदा द्यूत खेळायला बोलावता येईल हेच होते.

असे होऊनही धर्मराज कौरवांनी बोलावल्यावर अजून एकदा द्यूत खेळण्यास तयार झाला. द्रौपदी, भीमाला राग आला. गांधारी, भीष्म, द्रोण इत्यादिंना वाईट वाटत होते. द्यूतात हरवून पांडवांची वाताहत करणे हाच शकुनी आणि दुर्योधनाचा डाव होता. आणि तो सफल झाला.

पांडव पुन्हा हस्तिनापूरात आले आणी द्यूताला सुरूवात झाली. धृतराष्ट्र सिंहासनावर येऊन बसला. सारीपाट मांडला गेला. एकीकडे कौरव आणि दुसरीकडे पांडव बसले. शकुनी सांगू लागला, ‘‘जो डाव हरेल त्याने बारा वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास पत्करावा. आणि अज्ञातवास अज्ञात न राहता कोणी ओळखलं तर पुन्हा बारा वर्षे वनवासाला जावं लागेल.’’

धर्म ठीक म्हणाला.

‘‘आणखी एक, धर्मा जर तू डाव हरलास तर तुला राज्य सोडावं लागेल. शिवाय तुझे चार भाऊ व द्रौपदी यांसह तुला वनवासाला जावं लागेल.’’ शकुनी म्हणाला.

हे देखील धर्मराजाने मान्य केले.

खेळ सुरू झाला आणि धर्म हरला आणि द्रौपदीसह पाच पांडव १२ वर्षे वनवासाला जायला निघाले.

धृतराष्ट्रानेही आपल्या मुलांना लाडावून ठेवले होतेच. तो काही न्यायी वागला नव्हता. पांडवांना अर्धे राज्य दिल्याचे त्याला वाईटच वाटत होते. पांडवांचा नावलौकीक व मोठेपणा कौरवांना नेहमीच खुपत आला होता. धर्मराजाला द्यूताचा नाद असल्याने तो त्यांच्या जाळ्यात अडकला आणि फसला गेला. पुनः पुन्हा द्यूत खेळण्याची सवय असल्यामुळेच धर्मराजाला ही अद्दल घडली.

**प्रश्नः**

१. माणसाला वाईट सवयी असणे तुम्हाला पटते का?

होय ☐ नाही ☐

२. त्या वाईट सवयींच्या परिणामांपासून शिकून त्या सवयी सोडाव्या का?

होय ☐ नाही ☐

३. दुसऱ्याच्या वाईट सवयीचा आपण फायदा घेतला पाहिजे असे तुम्हाला वाटते का?

होय ☐ नाही ☐

४. आपल्या वाईट सवयीची शिक्षा इतरांना भोगायला लागणे हे तुम्हाला योग्य वाटते का?

होय ☐ नाही ☐

५. एखादी चूक पुन्हा पुन्हा करण्याचे समर्थन तुम्ही कराला का? आणि का?

६. एखाद्याचा नावलौकिक व मोठेपणा खुपणे याविषयी तुमचे मत काय?

७. एखादी सवय चांगली की वाईट हे तुम्ही कशावरून ठरवाल?

८. हस्तिनापूर आणि इंद्रप्रस्थ येथे कोणाचे राज्य होते?

९. तुम्हाला तुमच्या आई-वडिलांनी लाडावून ठेवल्यास त्याचे परिणाम काय होतील असे तुम्हाला वाटते?

कोणतीही वाईट सवय तुमचा तर सर्वनाश करतेच पण त्याचे वाईट परिणाम इतरांना भोगावे लागतात. म्हणून वेळीच ती वाईट सवय सोडून देणे इष्ट.

Any bad habit can destroy you and others so restrain from it.

# अहल्येचा उद्धार

विश्वामित्रांच्या मार्गदर्शनाखाली राम-लक्ष्मणांनी अनेक पराक्रम केले. अनेक प्रदेशी हिंडून ते एका उजाड आश्रमात आले. त्यातील यज्ञशाळेत जणू दगडाची मूर्तीच वाटावी अशी एक स्त्री गुडघ्यात मस्तक खूपसून निश्चल बसली होती. निष्पर्ण वृक्षांनी व सुकून गेलेल्या लतावेलींनी भरलेल्या त्या आश्रमाबद्दल श्रीरामांनी चौकशी केली असता विश्वामित्र म्हणाले, ''हा आश्रम गौतम ऋषींचा असून ती तिथे पाषाणाप्रमाणे बसलेली स्त्री, त्यांची पत्नी अहल्या आहे. तिचा आपल्याशी विवाह व्हावा असे इंद्राला वाटले इतकी ती असामान्य सुंदर होती. पण तिचा विवाह गौतम ऋषींशी झाला. तरीही इंद्र त्याची अभिलाषा बाळगून होता.

एके दिवशी इंद्राने मायावी शक्तीने गौतमांसारखे रूप धारण केले. आणि आश्रमात गौतम नाहीत हे पाहून तो अहल्येशी सलगीने वागू लागला. आपला संयमी पती आपल्याशी असा वागणार नाही असे अहल्येला वाटले व तिने तो इंद्र असल्याचे ओळखले देखील पण प्रत्यक्ष इंद्रही आपल्या सौंदर्याला बळी पडला या अभिमानाच्या धुंदीत ती त्याला वश झाली. त्याचा हेतू साध्य झाला होता व तो लगबगीने आश्रमाबाहेर पडला. इतक्यातच गौतम ऋषी आले. त्यांना घडलेला प्रकार जाणला. त्यांनी इंद्राला तसेच अहल्येला शाप दिला. 'ज्या सौंदर्याचा तुला अभिमान झाला आणि तू इंद्राला वश झालीस तेच सौंदर्य जाऊन तू एखाद्या पाषाणाप्रमाणे निस्तेज होऊन राहशील' असा गौतम ऋषींनी अहल्येला शाप दिला. त्या शापामुळे अहल्या अशी इथे बसून आहे. यावर तिने उःशाप मागितला असता गौतम ऋषी म्हणाले, 'काही काळ लोटल्यावर एक श्रेष्ठ पुरूष या आश्रमाला भेट देईल, तेव्हा त्याचा चरणस्पर्श झाल्याने तुझा उद्धार होईल.' रामा तूच तो श्रेष्ठ पुरूष असून अहल्येची शापातून मुक्तता कर.'' श्रीरामांनी चरणस्पर्श केला आणि काय आश्चर्य तिचे सौंदर्य पुन्हा तेजाने उजळू लागले. मरगळ जाऊन तिच्यात चैतन्य संचारले.

शोध–बोध गोष्टी क्र.:०२६

**प्रश्न:**

१. इच्छा करणे याबद्दल तुम्हाला काय वाटते?
नेहमी इच्छा करावी ☐ केव्हाही इच्छा करू नये ☐
चांगल्याच इच्छा कराव्या ☐ वाईटच इच्छा कराव्या ☐

२. एखाद्या इच्छेसाठी वाईट मार्ग निवडले की त्याचे परिणाम वाईटच होतात हे तुम्हाला पटते का?
होय ☐ नाही ☐

३. आपल्याकडील सौंदर्य, संपत्ती, बुद्धीमत्ता, शक्ती इत्यादीचा अहंकार असणे योग्य आहे का?
होय ☐ नाही ☐

४. आपल्या चुकीची शिक्षा आपण भोगायला हवी असे तुम्हाला वाटते का?
होय ☐ नाही ☐

५. आपल्या हातून चूक घडू शकते हे माहीत असूनही ती चूक करणे तुम्हाला पटते का?
होय ☐ नाही ☐

६. अभिमान व गर्व यामध्ये फरक आहे असे तुम्हाला वाटते का?

७. कोणत्या गोष्टींचा अभिमान आणि कोणत्या गोष्टींचा गर्व असावा असे तुम्हाला वाटते? आणि का?

८. रामायणातील काडांची संख्या व नावे सांगा.

९. अहल्येची कथा कोणत्या कांडात येते?

स्वतःच्या अभिमानात गढून केलेल्या चुकीची फार मोठी किंमत मोजावी लागते.

You have to pay a heavy price for mistakes committed in false pride.

# भरत

कैकयीने दशरथाकडून वचन घेत रामांना वनवासात पाठवले आणि भरताला राजा करण्याचे ठरविले. हे अयोध्येत घडत असताना भरत आणि शत्रुघ्न केकय देशात होते. तिथून परत अयोध्येत येताच त्यांना राम वनवासाला गेल्याची वार्ता कळली. भरताचा संताप अनावर झाला. भरत आल्याचे कळल्यावर कैकयीने मोठ्या आनंदाने त्याला राजसिंहासनाजवळ नेत आता हे तुझेच आहे असे सांगितले मात्र भरत क्रोध अनावर झाला होता. तो आपल्या आई कैकयीवर प्रचंड चिडला. त्याच्या इच्छेविरूद्ध आईने केलेले हे कृत्य आणि त्यामुळे गेलेला वडिलांचा बळी तसेच अयोध्यावासीयांचे दुःख भरत विसरणे शक्य नव्हता. ''तुला आई तरी कसे म्हणावे, तू आई नसून एक वैरिणी आहेस. तू जीव दे तेच उत्तम होईल.'' असे म्हणत भरताने कैकयीला सुनावले.

भरत थोडा शांत झाल्यावर त्याने ठरवले की, प्रभू रामचंद्रांना परत अयोध्येत घेऊन यायचे.

त्यानुसार त्याने बरोबर सेना घेतली आणि तो रामचंद्र ज्या दिशेने गेले त्याचा शोध घेत त्यांना बोलवण्यासाठी गेला.

इकडे वनात राम-सीता-लक्ष्मण संचार करत असताना, लक्ष्मणाला सैन्य येत असल्याची चाहूल लागली. त्याने लागलीच रामाला सांगितले, ''दादा सैन्य येत असल्याचे मला वाटत आहे. हे सैन्य भरताचेच असावे. तू जिवंतही राहता कामा नयेस म्हणजे वनवासातून परत येऊन तू राज्य मागणार नाहीस असा विचार करून त्याने हा डाव रचलेला असावा.''

लक्ष्मणाचे बोलणे रामाने ऐकून घेतले व असा काही विचार न करण्यास सांगितले.

थोड्यावेळात भरत रामांकडे आला. त्यांच्या चरणांशी लोटांगण घेत रडला. परत अयोध्येत यायची विनवणी करू लागला. पण रामचंद्र काही ऐकेनात. तूच अयोध्येचा राजा हो आणि प्रजेचं व्यवस्थित पालन कर असे सांगितले. रामांसमोर तो कैकयीला नको ते बोलला ते ऐकून श्रीराम म्हणाले, ''भरता हे योग्य नाही. ती तुझी माता आहे. तू तिला असे यापुढे बोलाणार नाहीस असे मला वचन दे.'' भरताने मान्य केले. तरीही अनेकदा त्याने रामांना परत येण्याची विनंती केली पण राम ऐकेनात. शेवटी भरताने त्यांना विनंती केली की तुमच्यासाठी या पादुका आणल्या होत्या याचा स्वीकार करा. या मी पुन्हा घेऊन जात यांची स्थापन करीन. पण सिंहासनावर काही मी बसणार नाही.

भरताच्या या निस्पृहतेवर रामचंद्र प्रसन्न झाले. त्यांनी त्या पादुका त्याला दिल्या व चौदा वर्षे वनवास झाल्यावर अयोध्येत परत येण्याचे आश्वासन दिले.

भरताने अयोध्येतही पाऊल ठेवले नाही. राम अयोध्येत परत येत नाहीत तोपर्यंत मी अयोध्येत पाऊल ठेवणार नाही अशीही प्रतिज्ञा त्याने घेतली होती. परत गेल्यावर त्या पादुकांची अयोध्ये जवळील नंदीग्रामात त्याने स्थापना केली. इतकेच नव्हे तर रामचंद्र जसे वनवासात राहत होते तसाच तो राहू लागला. कोणत्याही सुख-सोयी आणि ऐश्वर्याचा त्याने उपभोग घेतला नाही. आणि रामांचा सेवक म्हणून राज्य सांभाळले.

mensa india | tribal mensa nurturing program | ETSN European Talent Support Network

**शोध–बोध गोष्टी क्र.:०२७**

**प्रश्न:**

१. भरत आपल्या आईला जे बोलला ते तुम्हाला योग्य वाटते का?

होय ☐ नाही ☐

२. भरताने राजा होण्याचे नाकारून रामाला परत बोलावले हा भरतामधील गुण तुम्हाला पटतो का?

होय ☐ नाही ☐

३. लक्ष्मणाने भरतावर संशय घेतला हे लक्ष्मणाचे वर्तन तुम्हाला योग्य वाटते का?

होय ☐ नाही ☐

४. कैकयीविषयी रामांनी भरताजवळ मांडलेल्या आपल्या मताप्रमाणे आपले वर्तन असावे असे तुम्हाला वाटते का?

होय ☐ नाही ☐

५. भरतानेही श्रीरामांसारखाच वनवास स्वीकारला, या कृतीचे तुम्ही समर्थन करता का?

होय ☐ नाही ☐

६. दुसऱ्यासाठी झोकून देणे हा भरताचा गुण तुमच्यात असावा असे वाटते का?

होय ☐ नाही ☐

७. एखाद्या व्यक्तीची निस्पृहतेने सेवा करावी असे तुम्हाला वाटते? आणि का?

८. आपली आई कशीही असली तरी तिला वाईट बोलण्याचे तुम्ही समर्थन कराला का? आणि का?

९. तुम्हाला कोणासारखे वागायला आवडेल, राम की भरत? आणि का?

१०. भरत अयोध्येबाहेर कोठे राहिला होता?

योग्य व्यक्तीची निस्पृहतेने सेवा करा

Perform selfless duty for the deserving person.

# रावण

ब्रह्मदेवांचा मुलगा पुलस्त्य ऋषींना विश्रवस नावाचा पुत्र झाला. या विश्रवसांपासूनच कुबेराचा जन्म झाला. कुबेर लंकेचा अधिपती होता. तसेच पुष्पक विमानही त्याच्याजवळच होते. पण विश्रवस ऋषींबद्दल असलेल्या वासनेमुळे केकसीच्या पोटी दैत्य जन्माला आले.

ते म्हणजेच रावण आणि कुंभकर्ण! तर मालिनी या त्यांच्या पत्नीपासून विभीषण जन्मास आला. आणि राका या तिसऱ्या पत्नीपासून शूर्पणखा आणि खर, दूषण जन्मास आले.

तेव्हा कुबेर या आपल्या सावत्र भावाकडून रावणाने लंका बळकावली आणि पुष्पक विमानही काढून घेतले. रावण पहिल्यापासून मत्सराने ग्रासलेला आणि नीच वृत्तीचा होता. त्याने ब्रह्मदेवांकडून वर प्राप्त करून घेतले ते केवळ स्वार्थसाठी!

शूर्पणखा ही रावणाची सावत्र बहीण असली तरी तिची रावणाशी जवळीक होती. रावणाने जेव्हा कठोर तपश्चर्या केली तेव्हा त्याच्या सेवेसाठी शूर्पणखाच त्याच्याजवळ होती. तिच्या नवऱ्याचे नाव विद्युतजिव्हा होते.

एकदा राक्षसांमध्येच युद्ध रंगले होते. युद्ध खूप काळ चालले. युद्धात विद्युतजिव्हा आणि रावण एकाच बाजूने लढत होते. राक्षसांच्या सेना विशाल असल्याने तुंबळ युद्ध रंगले होते. पण त्याच युद्धात रावणाने नजरचुकीने विद्युतजिव्हा या शूर्पणखेच्या नवऱ्याला ठार मारले.

शूर्पणखेला अतीव दुःख झाले. तिचे सांत्वन करून रावणाने तिला आवडणाऱ्या दुसऱ्या पुरूषाशी लग्न करण्याची परवानगी दिली. यासाठी त्याने खर आणि दूषण या भावांना तिला मदत करायला सांगितले होते. त्याच दरम्यान ती दंडकारण्यात आली आणि तिची रामांशी भेट झाली त्यामुळे पुढील रामायण घडले पण त्याचे मूळ रावणच होता!

**प्रश्न:**

१. एखाद्याने कष्टाने मिळविलेली वस्तू त्याच्यापासून हिसकावून किंवा बळकावून घेणे तुम्हाला योग्य वाटते का?

होय ☐ नाही ☐

२. मत्सराने ग्रासलेल्या आणि वृत्तीने नीच असलेल्या रावणाचे तुम्ही समर्थन करता का?

होय ☐ नाही ☐

३. प्रचंड शक्ती असूनही जर आपले डोके ठिकाणावर नसेल तर त्या शक्तीचा काहीही फायदा नाही, हे तुम्हाला पटले का?

होय ☐ नाही ☐

४. आपल्या स्वार्थासाठी इतरांचे आयुष्य उध्वस्त करणे हे माणसाचे ध्येय असणे तुम्हाला योग्य वाटते का?

होय ☐ नाही ☐

५. रावणाच्या वडिलांचे नाव काय होते?

६. रावण आणि ब्रह्मदेवाचे नाते काय होते?

७. रावणाच्या भावंडांची नावे सांगा.

८. रावणाला किती पुत्र होते व त्यांची नावे काय?

९. स्वार्थासाठी वर प्राप्त करून घेणे याविषयी तुमचे मत मांडा.

१०. वृत्तीने नीच असलेल्या प्रकांडपंडित रावणाचे तुम्ही समर्थन कराला का?

तुमच्यामध्ये प्रचंड शक्ती असली तरी डोके ठिकाणावर हवे.

Mere muscle power is of no use if you don't use brain.

# संजय

महाभारतातील अनेक महत्त्वाच्या पात्रांपैकी एक म्हणजे संजय होय. संजय कौरव पक्षात जरी असला तरी त्याला कौरवांचे म्हणणे पटत नसे व तो कायम पांडवांच्याच बाजूचा होता. संजयाच्या वडिलांचे नाव गावल्यगण होते. त्यांनी भगवान वेदव्यासांकडून कडून वेद–विद्यांचा गहन अभ्यास केला. त्यानंतर ते धृतराष्ट्राच्या राज्यसभेत सन्मानित मंत्री बनले होते.

त्यामुळे सहाजिकच संजयही कौरव पक्षात होता. कौरव पक्षाचा दूत म्हणून त्याने काम केले. पण तो कायमच न्यायाच्या बाजूने उभा राहिला होता. दूत बनून संदेश पोहोचवणे हे केवळ त्याचे कर्तव्य म्हणून त्याने केले. म्हणूनच की काय पण स्वतः भगवान वेदव्यासांनी त्याला दिव्यदृष्टी दिली ज्यामुळे त्याला १८ दिवस चाललेल्या महाभारत युद्धाचे वर्णन जसेच्या तसे धृतराष्ट्राला सांगता आले. इतकेच नव्हे तर भगवद्गीतेचा उपदेश अर्जुनाबरोबरीने संजयानेही ऐकला व देवतांनाही दुर्लभ असे विश्वरूप आणि चतुर्भुज रूपाचे दर्शनही त्याला घडले. संजय आपल्या स्पष्टवक्तेपणासाठी प्रसिद्ध होता. तो धृतराष्ट्राला नेहमी योग्य सल्ला देत असे. एकीकडे जिथे तो शकुनीच्या कुटील कारस्थानांबद्दल त्याला सावध करत असे तिथेच दुसरीकडे दुर्योधानाकडून पांडवांशी होणाऱ्या असहिष्णू वागणुकीबद्दल देखील धृतराष्ट्राला अवगत करून सावध करत राहत असे. तो धृतराष्ट्राचा संदेशवाहक होता.

संजयला दिव्यदृष्टी प्राप्त होती, तेव्हा त्याला युद्धक्षेत्रावरील सर्व दृश्य महालात बसून दिसत असत. अंध धृतराष्ट्राने महाभारत युद्धाची प्रत्येक घटना संजयच्या वाणीने ऐकली होती. धृतराष्ट्राला युद्धाचे अगदी जसेच्या तसे सजीव वर्णन करण्यासाठीच व्यास मुनींनी संजयला दिव्य दृष्टी प्रदान केली होती. महाभारत युद्धाच्या नंतर अनेक वर्ष संजय युधिष्ठिराच्या राज्यातच राहिला. त्यानंतर धृतराष्ट्र, गांधारी आणि कुंतीसोबत त्याने देखील संन्यास घेतला. पुढे धृतराष्ट्राच्या मृत्युनंतर तो हिमालयात निघून गेला जिथून पुन्हा कधीही परतून आला नाही.

प्रश्नः

१. परिस्थितीने वाईटाच्या बाजूने असलो तरी आपण न्यायाशी प्रामाणिक राहू शकतो, याचे तुम्ही समर्थन करता का?

होय ☐ नाही ☐

२. माणसाने स्पष्टवक्ता असावे असे तुम्हाला वाटते का?

होय ☐ नाही ☐ कधीकधी ☐

३. संजयासारखी दिव्यदृष्टी तुम्हाला देऊन युद्धाचे वर्णन करायला सांगितले असते तर तुम्ही काय केले असते?

जसेच्यातसे सांगितले असते ☐ स्वतःच्या मनाचेच सांगितले असते ☐

मनातले थोडे त्यात घातले असते ☐ काहीच सांगितले नसते ☐

चांगले तेवढेच सांगितले असते ☐ वाईट तेवढेच सांगितले असते ☐

४. न्यायाच्या बाजूने असणे म्हणजे काय असे तुम्हाला वाटते?

५. वेदव्यासांनी संजयाआधी कोणास दिव्यदृष्टी देण्याची विचारणा केली होती?

६. स्पष्टवक्तेपणा हा गुण असणे तुम्हाला योग्य वाटते का? आणि का?

७. संजयाप्रमाणेच असणाऱ्या कौरवपक्षातील मंत्र्याचे नाव काय?

८. तुम्हाला दिव्यदृष्टी मिळाल्यास तुम्हाला काय बघायला आवडेल?

९. एखादा सल्ला योग्य की अयोग्य हे कशावरून ठरते असे तुम्हाला वाटते?

१०. संजयाप्रमाणे सध्याच्या काळात असलेल्या प्रसारमाध्यमांची नावे सांगा.

आपल्याला समजलेले जसेच्यातसे सांगावे.

Decoding information.

# श्रीराम अवतार

श्रीरामांचा जन्म होण्याआधी रावण आणि कुंभकर्ण या दोन भावांनी पृथ्वीवर हैदोस घातला होता. ते राक्षस धर्म व निती यांना तुच्छ मानीत व चैनीचे आयुष्य जगणे हेच आपल्या जीवनाचे उद्दिष्ट मानत. तपस्वी ऋषीमुनींचे आश्रम जाळणे, त्यांनी सुरू केलेल्या यज्ञात मानवी रक्त व मांसखंड टाकून ते यज्ञ बंद पाडणे, इतरांच्या तरूण मुलींना व बायकांना पळवून नेणे या गोष्टी करण्यात ते धन्यता मानत. असे अत्याचार थांबवण्यासाठी श्रीरामांनी भूतलावर अवतार घेतला. त्यासाठी त्यांनी विशेषतः आपण मनुष्य आहोत असे भासवले व वानर सेनेची सहाय्यता घेतली यामागे एक महत्त्वाचे कारण होते.

ते कारण म्हणजे रावण आणि कुंभकर्णांनी अनेक वर्षे तपश्चर्या करून ब्रह्मदेवांना प्रसन्न करून घेतले होते व त्यांच्याकडून विशिष्ट असा वर मागून घेतला होता. नर म्हणजे माणूस आणि वानर हे सोडून तुम्हाला कोणीही हरवू शकणार नाही. त्यामुळेच या दोन भावंडांनी देवतांना त्रास देणे सुरू केले होते आणि या दोघांना भावंडांना मारू शकेल असा माणूस श्रीरामांआधी नव्हता. रावणाचे वालीशी, सुग्रीवाच्या भावाशी युद्ध झाले होते. तेव्हा वालीच्या सामर्थ्यापुढे रावणाचे काहीही न चालून त्याने तिथून पळ काढला होता. अश्यावेळी नर आणि वानर अशांची सेना एकत्र करून श्रीरामांनी रावण आणि कुंभकर्ण या राक्षसीवृत्तींचा बिमोड केला.

ते अवतार घ्यायचे मूळ कारण असले तरी त्या संपूर्ण अवतार काळात त्यांनी अनेक जीवन मूल्ये रूजवली. कधीच कुणाला आपल्या बोलण्याने व वागण्याने दुखवू नये याचा त्यांनी प्रसार केला. वाईटामध्येही काहीतरी चांगले लपलेले असते ते घ्यायचा प्रयत्नही आपण केला पाहिजे हा महान संदेश श्रीरामांनी दिला. प्रत्येकावर आलेली चांगली-वाईट परिस्थिती आपल्याच कर्मांमुळे आली असल्याने ती आपलीच जबाबदारी आहे असे मानून त्या परिस्थितीतून जावे हे आयुष्याचं सारही श्रीरामांनी त्यांच्या अवतारातून सांगितलं आणि दाखवून देखील दिलं. एक आदर्शवत जीवन श्रीरामांकडूनच शिकायला हवे.

**प्रश्नः**

१. तुम्हाला राक्षसांच्या राज्यात जायला आवडेल का?

होय ☐ नाही ☐

२. कधीच कोणाला आपल्या बोलण्याने आणि वागण्याने दुखवू नये याचे तुम्ही समर्थन करता का?

होय ☐ नाही ☐

३. वाईटामध्ये काहीतरी चांगले लपलेले असते ते आपण घ्यावे हे तुम्हाला पटते का?

होय ☐ नाही ☐

४. आपल्यावर आलेल्या चांगल्या वाईट परिस्थितीला आपणच जबाबदार असतो हे तुम्हाला पटते का?

होय ☐ नाही ☐

५. अवतार या शब्दाचा अर्थ काय?

६. अवतारांचे प्रकार किती?

७. राम आणि रावण या शब्दांचे अर्थ काय?

८. आपल्यावर आलेली चांगली/वाईट परिस्थिती आपल्याच कर्मामुळे आलेली असते असे तुम्हाला वाटते का? आणि का?

९. धर्म शब्दाचा अर्थ काय?

१०. तत्वनिष्ठ वर्तनाची तुमची व्याख्या सांगा.

तत्वनिष्ठ राहावे.

Be principled.

# जरासंधाचा वध

युधिष्ठिराने राजसूय यज्ञ करायचे ठरवले. त्याबाबत त्याने श्रीकृष्णांना सांगितले तेव्हा ते म्हणाले, युधिष्ठिरा तुझ्या हातून राजसूय यज्ञ व्हावा अशी माझीही इच्छा आहे. पण त्यात मुख्य अडसर हा महाक्रमी व क्रूर अशा जरासंध या मगध देशाच्या राजाचा आहे. त्या दुष्टाने देवासमोर शंभर राजे बळी देण्याचा संकल्प सोडला आहे. आत्तापर्यंत त्याने ८६ राजांना जिंकून कारागृहात डांबून ठेवले आहे. अजून १४ राजांना जिंकले की एकाच दिवशी तो त्या १०० राजांना देवापुढे बळी देईल. त्यामुळे राजसूय यज्ञासाठी सर्व राजांनी तुला सार्वभौम राजा ठरवावे लागते ते साध्य होईल असं वाटत नाही. म्हणून मी भीमसेन आणि अर्जुनाला घेऊन जातो आणि जरासंधाचा वध करून यज्ञाचा मार्ग मोकळा करतो.

''पण हे कसे साध्य होईल?'' युधिष्ठिराने विचारले.

धर्माच्या मार्गाने किंवा कपटाने. समोरच्याला धर्माचा योग्य मार्ग समजत नसेल आणि तो कपटाने वागत असेल तर आपणही त्याच मार्गाने वागणे हाच धर्म ठरतो.

श्रीकृष्णांचे म्हणणे पटल्याने दुसऱ्याच दिवशी श्रीकृष्ण, भीमसेन आणि अर्जुन यांनी ब्राह्मणवेष धारण करून इंद्रप्रस्थाहून मगध देश गाठला.

जरासंधाला श्रीकृष्णाने सांगितले, ''राजा आम्ही तुझ्या दाराशी याचक म्हणून आलो आहोत तेव्हा आम्हा तीन ब्राह्मणांची इच्छा तू पूर्ण कर.''

''काय आहेत तुमच्या मागण्या?'' जरासंध म्हणाला.

''आमच्या मागण्या फार नाहीत. तू बळी देण्यासाठी ठेवलेल्या ८६ राजांची सुटका कर किंवा आम्हा तिघांपैकी एकाशी मुष्टीयुद्ध कर.''

यावर जरासंध म्हणाला, ''राजांची सुटका मी कदापिही करणार नाही, पण तुमच्यापैकी कोणाला लवकर मरायची इच्छा असली तर त्याच्याशी मुष्टीयुद्ध करण्याची माझी तयारी आहे.''

जरासंध असे म्हणताच श्रीकृष्णाने केलेल्या खुणेनुसार भीमसेन पुढे झाला व जरासंधाशी मुष्टीयुद्ध सुरू झाले. युद्ध बराच काळ चालले. शेवटी श्रीकृष्णांनी खुणेने दाखविल्यानुसार भीमसेनाने जरासंधाच्या दोन तंगड्या दोन हाती घेऊन त्या विरूद्ध दिशेला फाकवल्या आणि त्याच्या देहाचे दोन तुकडे केले. अशाप्रकारे जरासंधाचा वध करत कारागृहातील सर्व राजांची मुक्तता केली.

**प्रश्न:**

१. जरासंधाच्या वागण्याचे तुम्ही समर्थन करता का?

होय ☐ नाही ☐

२. जरासंधासारख्या कपटी राजावर युक्तीने विजय मिळविणे तुम्हाला योग्य वाटते का?

होय ☐ नाही ☐

३. तुम्ही आयुष्यात खालीलपैकी कोणत्या गोष्टी कराल?

दुसऱ्यांना त्रास देणे, छळणे ☐ दुसऱ्यांना त्रासातून सोडविणे ☐

४. न्याय्य गोष्टीची रीतसर मागणी करूनही ती गोष्ट जेव्हा नाकारली जाते तेव्हा इतर मार्गांनी ती गोष्ट मिळविणे तुम्हाला पटते का?

होय ☐ नाही ☐

५. जरासंध हे नाव कसे पडले याची जाणून घेऊन तुमच्या शब्दात मांडा.

६. धर्माचा व अधर्माचा मार्ग कशावरून ठरतो असे तुम्हाला वाटते?

७. राजसूय यज्ञाप्रमाणे वेगवेगळ्या यज्ञांची नावे लिहा.

८. मल्लयुद्ध आणि मुष्टीयुद्धातील फरक लिहा.

९. महाभारतकालीन राज्यांची नावे लिहा.

१०. जरासंधवधाची कथा महाभारताच्या कोणत्या पर्वात येते.

सरळ मार्गाने जेव्हा कार्यसिद्धी होत नाही तेव्हा इतर मार्गांचा अवलंब करावा लागतो.

When things don't move thru proper channels you have to use byroads.

# श्रीकृष्ण अवतार

यमुना नदीच्या काठच्या मथुरेच्या राजाचे उग्रसेन नाव होते. त्याला अनेक मुले. त्यातील एका मुलाचे नाव कंस होते. कंस अतिशय दुष्ट होता. त्याला वाटले आपला म्हातारा बाप अजून किती वर्षे राज्य करणार? कंसाचा सासरा जरासंध याने कंसाला मदत केली. केशी आणि सुनामा या भावांनी देखील कंसालाच मदत केली. त्यांनी म्हाताऱ्या उग्रसेनाला कैदेत टाकले. मग कंस मथुरेचा राजा झाला. तो अतिशय बलवान व क्रूर होता. राज्यातले लोक त्याच्यापुढे चळवळा कापत असत. त्याच्याविरूद्ध बोलायला सगळेच भीत.

मथुरेत अनेक क्षत्रिय घराणी होती. त्यातलेच एक घराणे म्हणजे यादव घराणे. यादवांचे घराणे गोवर्धन पर्वताच्या पायथ्याशी होते. त्याचा मुख्य वसुदेव होता जो अतिशय शूर व गुणी होता. उग्रसेनाचा भाऊ देवक याची मुलगी देवकी, वसुदेवाची पत्नी होती.

तुरूंगात टाकलेल्या उग्रसेनाला हा वसुदेव सोडवणार तर नाही? ही शंका कंसाला आली. आपण प्रजेला त्रास देत असल्यामुळे श्रीविष्णु देवकीचा आठवा मुलगा म्हणून अवतार घेणार आहेत व आपल्याला मारणार आहेत हे कंसाला समजले. यावरचा उपाय म्हणून कंसाने वसुदेव–देवकीला तुरूंगात टाकले. कंसाने देवकीची सहा मुले जन्मल्याक्षणीच ठार मारली.

सातवा मुलगा बलराम आणि आठवा श्रीकृष्ण याला मात्र तो मारू शकला नाही. कंसाने खूप प्रयत्न केले. कुस्तीचा सामना ठेवून चाणूर व मुष्टीक या मल्लांकरवी श्रीकृष्णाला मारायचा कंसाचा डाव होता पण तोही असफल ठरला. उलट मुष्टिक आणि चाणूरास मारल्यावर श्रीकृष्णाने कंसाचाच वध केला.

अशा या श्रीकृष्णाचे चरित्र मोठे रंजक व खूप काही शिकवून जाणारे आहे. आपले कर्तव्य हाच आपला धर्म असतो हा श्रीकृष्णांचा खूप काही सांगून जाणारा संदेश आहे. पांडव पक्षाच्या बाजूने उभे राहत अर्जुनाला हाच उपदेश श्रीकृष्णांनी केला. कौरव हे कपटाने वागले त्यामुळे त्याला उत्तर देताना आपण कपट करणे काहीही चूक नाही. आपण आपणहून पहिल्यांदा कपट करत नाही हे पाहिले पाहिजे. खरे–खोटे बोलणे हे चूक की बरोबर, हे त्यामागील हेतूवर अवलंबून असते हे प्रथमतः श्रीकृष्णांनी जगून दाखवून दिले.

राक्षसांनी केलेली प्रत्येक कृती ही स्वार्थासाठीच होती. पण देव अवतार घेऊन हेच दाखवत असतो की त्याची प्रत्येक कृती अनाकलनीय असली तरी ती स्वतःसाठी नसून इतरांच्या हितासाठी, कल्याणासाठी आहे. हेच श्रीकृष्णाने दाखवून दिले.

**प्रश्न:**

१. स्वतःच्या वडिलांना तुरुंगात टाकणे या कंसाच्या कृत्याचे तुम्ही समर्थन करता का?
होय ☐ नाही ☐

२. कंसाने वसुदेव देवकीला तुरुंगात टाकले व त्यांची मुले मारली हे तुम्हाला पटते का?
होय ☐ नाही ☐

३. कंसाने वसुदेव देवकीला तुरुंगात टाकले व त्यांची मुले मारली याचाच अर्थ तो –
बुद्धीवान होता ☐ घाबरट होता ☐

४. आपले कर्तव्य हाच आपला धर्म आहे हे श्रीकृष्णाचे म्हणणे तुम्हाला पटते का?
होय ☐ नाही ☐

५. श्रीकृष्णांचे जशासतसे वागणे तुम्हाला पटते का?
होय ☐ नाही ☐

६. खरे–खोटे बोलणे चूक की बरोबर हे त्याच्या परिणामांवर अवलंबून असते हे तुम्हाला पटते का?
होय ☐ नाही ☐

७. श्रीकृष्ण शब्दाचा अर्थ लिहा.

८. श्रीकृष्णाची भारतातील प्रसिद्ध मंदिरे कोणती?

९. जन्मापासून अवतारसमाप्तीपर्यंत श्रीकृष्ण कोणकोणत्या प्रदेशामध्ये वास्तव्यास होता त्या प्रदेशांची नावे लिहा.

१०. श्रीकृष्णाने सांगितलेल्या एकूण गीता किती? त्यांची नावे सांगा.

सदैव कर्तव्यनिष्ठ राहा.

Always do your duty.

# सुग्रीव आणि वाली

सीतेचा शोध घेत असताना श्रीराम लक्ष्मण हे किष्किंधेजवळ पोहोचले. तिथे त्यांची हनुमंतांशी भेट झाली. सुग्रीवाचा सचिव असलेल्या हनुमंताने श्रीराम आणि लक्ष्मणाविषयी विचारपूस केली तेव्हा त्याला सीतेच्या अपहरणाविषयी कळले. काही दिवसांपूर्वी लंकाधीश रावण एका स्त्रीला घेऊन आकाशमार्गे चालला होता तेव्हा एका पुरचुंडीतून त्या स्त्रीने काही दागिने खाली पर्वताच्या दिशेने फेकल्याचे सुग्रीवास माहित आहे असे हनुमंताने सांगितले. तसेच किष्किंधेचा राजा वाली याने सुग्रीवाला एका गैरसमजामुळे राज्यातून हकलून दिले आहे व त्याची बायको बळकावली आहे हे देखील सांगितले. त्याप्रमाणे हनुमंताने सुग्रीव आणि राम-लक्ष्मणांची भेट घडवली. वालीचा वध करण्यासाठी जर रामाने सुग्रीवाला मदत केली तर सीता शोधार्थ सुग्रीव रामांना मदत करेल असे ठरले. यासाठी त्यांनी हनुमंतानी प्रज्वलित केलेल्या अग्नीला साक्षी मानले.

''पण सुग्रीवा तुझ्या आणि वालीत वैर उत्पन्न होण्याचे कारण काय?'' श्रीरामांनी विचारले.

त्यावर सुग्रीव म्हणाला, ''आम्हा दोन्ही भावात उत्कट बंधुप्रेम होते. पण एकदा मायावी नावाचा एक राक्षस राज्याच्या वेशीपाशी आला आणि त्याने वालीशी युद्ध करण्यास प्रारंभ केला. वालीबरोबरीने मीही त्या राक्षसावर हल्ला केला. आम्हा दोघांना घाबरून तो पळत सुटला आणि एका गुहेत शिरला. गुहेतून तो निसटू नये म्हणून वालीने मला गुहेबाहेर थांबायला सांगितले व तो स्वतः गुहेत गेला. बरेच दिवस झाले तरी गुहेतून वाली बाहेर आला नाही. एके दिवशी गुहेतून रक्ताचे पाट बाहेर आले. ते पाहून मायावीने वालीला मारले असा माझा समज झाला. आता तो मायावी गुहेतून बाहेर येऊ नये म्हणून मी गुहेबाहेर एक भली मोठी शिळा लावून ठेवली आणि दुःखी मनाने राज्यात परतलो. वालीच्या मंत्र्यांचाही वाली गेला म्हणूनच समज झाला. वालीचा पुत्र लहान असल्याने तो मोठा होईपर्यंत मी राज्यकारभार पहावा असे सर्वानुमते ठरत मला राज्याभिषेक करण्यात आला.

पण थोड्या दिवसांनी त्या गुहेच्या तोंडाशी मी ठेवलेली शिळा कशीबशी बाजूला काढत वाली गुहेतून परत आला. त्यानेच मायावी राक्षसाला मारले होते, तो मेला नव्हता. मला राजा झालेले बघून त्याला असे वाटले की सत्तेच्या मोहापायी वालीला मारण्यासाठी मी मुद्दाम गुहेच्या तोंडाशी शिळा लावून आलो. मी त्याची समजूत घालण्याचा भरपूर प्रयत्न केला पण उपयोग झाला नाही. त्याने माझ्या बायकोला बळकावले व मला मारझोड करत राज्यातून हकलून दिले. तेव्हा मी इथे पर्वतावर येऊन राहिलो आहे.''

''या पर्वतावर तो तुला मारण्याकरता येत नाही?'' श्रीरामानी विचारले.

''नाही. त्याने दुंदुभी नावाच्या राक्षसाचे मुंडके उडवून एका मातंग ऋषींच्या आश्रमात भिरकावले होते. त्या राक्षसाचे रक्त त्या आश्रमात पसरल्याने तो आश्रम अपवित्र झाला. याचा परिणाम म्हणून ऋषींनी वालीला तू या बाजूस आलास तर तुझा लगेच मृत्यू होईल असा शाप दिला. त्यामुळे तो या बाजूस फिरकत नाही.'' सुग्रीव म्हणाला.

सुग्रीवाची कहाणी ऐकून श्रीराम म्हणाले, ''मित्रा तू चिंता करू नकोस. तुझी बायको तुझ्यापासून

हिरावून तुला अपमानित वागणूक देणाऱ्या वालीला मी नक्की ठार करीन.''
हे ऐकून सुग्रीवाला आनंद झाला. रामाने सुग्रीवाला सांगितले की तू वालीला मुष्टीयुद्धाचे आव्हान दे. त्या युद्धात मी त्याला एका बाणाने मारीन. सुग्रीवाने तसेच केले. दोघांचे युद्ध सुरू झाले पण एकवेळ अशी आली की सुग्रीव थकला आणि मार खाऊ लागला तरी राम-लक्ष्मण काहीच करत नाहीत हे पाहून सुग्रीव घाबरला आणि तिथून पळून पुन्हा पर्वतावर आला. तेव्हा गैरसमज झालेल्या सुग्रीवाला श्रीराम म्हणाले, ''अरे सुग्रीवा तू आणि वाली इतके सारखे दिसता की मी तुला ओळखूच शकलो नाही. मग अशावेळी मी वाली समजून तुलाच बाण मारला असता तर केवढा मोठा अनर्थ झाला असता? तेव्हा तू एक काम कर. गळ्यात फुलांची एक माळ घालून युद्ध कर म्हणजे तुला ओळखणं सोपं होईल आणि मला वालीला मारता येईल.''

सुग्रीवाने तसेच केले व अखेरीस वालीला श्रीरामांनी मारले. आपल्या भावाकडून झालेल्या चुकीची शिक्षा म्हणून त्याची बायको हिसकावणे व त्याला मारझोड करणे हा न्याय नाही. त्यामुळे अशांसाठी न्याय मार्गच निवडला पाहिजे हा अट्टाहास नाही. म्हणूनच श्रीरामांनी वेगळ्या मार्गाने वालीचा वध केला.

**प्रश्नः**

१. सत्यपरिस्थिती न समजून घेता एखादा समज करून घेणे तुम्हाला योग्य वाटते का?
होय ☐ नाही ☐

२. वालीचे वागणे तुम्हाला पटते का?
होय ☐ नाही ☐

३. आपल्या जवळच्या व्यक्तीचे चुकले तर तुम्ही काय कराल?
समज देऊ ☐ शिक्षा देऊ ☐ मारून हाकलून देऊ ☐ समजून घेऊ ☐

४. वाली आणि सुग्रीवाला न ओळखताच श्रीरामांनी अंदाजाने बाण मारायला हवा होता असे तुम्हाला वाटते का?
होय ☐ नाही ☐

५. एकमेकांच्या उपयोगी पडणे हा गुण तुमच्यात असावा असे तुम्हाला वाटते का?
होय ☐ नाही ☐

६. सुग्रीव आणि वाली कोणाचे अंशावतार होते?

७. किष्किंधानगरी सध्या कोणत्या राज्यात आहे?

८. रामायणकालीन राज्यांची नावे लिहून ती सध्या भारतात कोठे आहेत ते भारताच्या नकाशावर शोधा.

९. दुसऱ्यांमधील भांडण आपण मिटवावे असे तुम्हाला वाटते का? आणि का?

१०. तुमच्याविषयी एखाद्याची गैरसमजूत झाल्यास तुम्ही काय कराल ते लिहा.

परिस्थिती नीट समजून न घेतल्याने समस्या निर्माण होतात.

Misconception of the situation creates trouble.

# नचिकेत

हजारो वर्षांपूर्वी, वाजश्रवस नावाचे एक ऋषी होते. त्यांना नचिकेत नावाचा पुत्र होता. वाजश्रवस म्हणजे दानधर्म करण्यासाठी प्रसिद्ध. ते मोठमोठे यज्ञ करीत. यज्ञाच्या शेवटी धन, गोधन, अन्न आणि इतर वस्तू गरीबांना दान करीत. नचिकेत अतिशय कुशाग्र बुद्धीचा, एकनिष्ठ मुलगा होता.

एकदा अशाच एका यज्ञप्रसंगी, त्याने पाहिले की, त्याचे वडील ज्या गायी दान म्हणून देत होते त्या सर्व म्हाताऱ्या आणि भाकड होत्या. नचिकेताने विचार केला की ही तर सरळ सरळ फसवेगिरी आहे. चांगल्या आणि उपयोगी वस्तू देणे हे खरे दान. त्याने विचार केला की जर मी माझ्या वडिलांना मलाच दान म्हणून कोणालातरी द्यायला लावले तर? मी तरुण आहे, बलवान आहे आणि उपयोगी सुद्धा! नक्कीच मला दान म्हणून दिल्याने माझ्या वडिलांकडून झालेल्या पातकांचे क्षालन होण्यास मदत होईल.

त्याने वडिलांकडे जाऊन मला दान म्हणून कोणाला तरी देऊन टाका अशी विनंती केली. वाजश्रवस कोणत्यातरी कामात व्यग्र होते त्यांनी त्याकडे लक्ष दिले नाही. नचिकेताने वारंवार अशी विनंती केल्यावर मात्र त्यांचा संयम सुटला आणि ते संतापले. संतापाच्या भरात ते ओरडले की मी तुला मृत्युदेवतेकडे दान म्हणून देतो. लगेच त्यांच्या लक्षात आले की आपण संतापाच्या भरात हे काय भलते बोलून गेलो. पण त्याकाळात तोंडातून निघालेला शब्द कोणत्याही परिस्थितीत खरा करण्याची रीत होती. नचिकेताने आपल्या वडिलांचे सांत्वन केले आणि तो यमलोकी जाण्यास घराबाहेर पडला.

नचिकेत यमलोकी पोहोचला. आपल्या वडिलांचा शब्द खरा व्हावा म्हणून यमराज परत येईपर्यंत, अन्न आणि पाणी न घेता, तीन दिवस आणि तीन रात्र, यमराजांची वाट पाहात उभा राहिला. यमराज परत आले, बघतात तर आपल्या घराबाहेर एक ब्राह्मण पुत्र उभा आहे. त्यांनी तत्काळ त्याला घरात घेतले आणि अन्न, पाणी देऊन त्याची क्षमा मागितली. त्याला झालेल्या त्रासाचे प्रायश्चित्त म्हणून यमराजाने नचिकेतला तीन वर मागण्यास सांगितले.

नचिकेत हा अलौकिक पुत्र होता. त्याने हात जोडून यमराजाकडे पहिला वर मागितला की, ''माझ्या वडिलांना मनःशांती प्रदान करा. त्यांना माझ्या वियोगाचे दुःख होऊ देऊ नका.'' यमराजांना ही मागणी ऐकून आश्चर्य वाटले आणि त्यांनी त्वरीत वर दिला आणि लवकरच तू तुझ्या वडिलांपाशी जाशील असे आश्वासन दिले.

मग नचिकेतने, दुसरा वर म्हणून यमराजांना यज्ञकर्म शिकविण्यास सांगितले. यमराजांना आश्चर्याबरोबरच आनंदही झाला. त्यांनी लगेच त्याला यज्ञकर्म शिकविले. नचिकेताची बुद्धीमत्ता आणि स्मरणशक्ती पाहून त्यांना अत्यानंद झाला.

शेवटचा वर म्हणून नचिकेत यमराजांना म्हणाला की, 'विष्णुलोक मला कसा प्राप्त होईल ते कृपया सांगा.' यमराज अवाक् झाले. ते म्हणाले, हा विषय देवतांनादेखील समजणे कठीण आहे.

तू दुसरे काहीही माग, दीर्घायुष्य माग, शक्ती माग, श्रीमंती माग, रथ, मित्र आणि मोठे कुटुंब माग काहीही माग, पण हा विषय सोडून काहीही माग.

पण नचिकेत विचलित झाला नाही. तो म्हणाला, ‘‘मला रथ, संगीत, नृत्य अशा गोष्टी काय उपयोगाच्या? मला माहिती आहे की या चिरकाल टिकणाऱ्या नाहीत. त्या तुमच्या जवळच ठेवा, मला नकोत.’’ यमराज आश्चर्यचकित झाले आणि नचिकेतच्या दृढते समोर नतमस्तक झाले.

ते म्हणाले, ‘‘नचिकेत! जीवनाचे दोन मार्ग आहेत – एक श्रेयस (हितकारक) आणि दुसरा प्रेयस (प्रिय). बहुतेक लोक प्रेयसच निवडतात कारण प्रिय सहजसाध्य असते आणि हितकारक कष्टसाध्य असते. पण जे हितासाठी प्रिय गोष्टींचा त्याग करतात ते खरे बुद्धीमान असतात.’’ ते ऐकून नचिकेतला ब्रह्मज्ञान झाले. तो वडिलांकडे परत आला. पृथ्वीवर अनेक वर्षे राहून नंतर ब्रह्मलोकी गेला.

## शोध-बोध गोष्टी क्र.:०३४

**प्रश्न:**

१. दानधर्म करणे तुम्हाला योग्य वाटते का?
होय ☐ नाही ☐ कधीकधी ☐

२. जे दान देतो त्याचा दुसऱ्याला उपयोग व्हायला हवा असे तुम्हाला वाटते का?
होय ☐ नाही ☐

३. आपण स्वत: दुसऱ्यांच्या उपयोगी पडलो पाहिजे ही भावना असणे तुम्हाला गरजेचे वाटते का?
होय ☐ नाही ☐

४. आपल्यापेक्षा वयाने लहान असणाऱ्यांचीसुद्धा माफी मागणे हा गुण तुमच्यात असावा असे तुम्हाला वाटते का?
होय ☐ नाही ☐

५. दुसऱ्यांच्या चांगल्यासाठी वर मागणे हे तुम्हाला पटते का?
होय ☐ नाही ☐

६. कोणतेही ज्ञान मिळवण्यासाठी बुद्धीमत्ता आणि स्मरणशक्ती हे गुण आवश्यक आहेत असे तुम्हाला वाटते का?
होय ☐ नाही ☐

७. नचिकेत त्याच्या ध्येयापासून मागे हटला नाही हा गुण तुमच्यात असावा असे तुम्हाला वाटते का?
होय ☐ नाही ☐

८. यम-नचिकेत संवाद कोणत्या उपनिषदामध्ये आहे?

९. श्रेयस आणि प्रेयस यातील तुम्ही काय निवडाल? आणि का?

१०. आपल्या हितासाठी प्रिय गोष्टींचा त्याग करण्याचे समर्थन तुम्ही करता का?

ध्येयापासून कधीही विचलित होऊ नये. One should always be focused.

# यक्ष

एकदा असुरांनी देवांवर आक्रमण केले. घनघोर युद्ध झाले. असुरांचा विजय होतोय असे दिसताच सर्व देव घाबरले आणि त्यांचा प्रमुख इंद्र याने, सर्वशक्तिमान, परमेश्वराकडे धाव घेतली. त्याची मनापासून स्तुती आणि प्रार्थना करण्यास सुरूवात केली.

दुसऱ्या दिवशी देवांचा विजय झाला. असुरगण पळून गेले. देवांना अतिशय आनंद झाला. आश्चर्याची गोष्ट अशी की त्यांना जय मिळण्यास कारणीभूत असलेल्या परमेश्वरालाच ते विसरले. त्याचे आभार मानायची आठवण देखील त्यांना राहिली नाही. दुसऱ्या दिवशी नगरात विजयोत्सव चालू असताना, तेथे अचानक एक काळाकभिन्न, आक्राळविक्राळ यक्ष उत्पन्न झाला. विजयोत्सवाच्या प्रसंगी त्याचे ते बिभत्स रूप पाहून देवांना घृणा वाटली.

ते आपापसात बोलू लागले, ‘‘कोण आहे हा?’’ पण त्याच्यापाशी जाऊन बोलायची कोणाचीही हिम्मत होत नव्हती.

तेव्हा देवांनी सर्वसामर्थ्यवान अग्नीदेवाला तो यक्ष कोण आहे ते जाणून घेण्यास सांगितले.

अग्नीदेव तयार झाला आणि यक्षाजवळ गेला. तो काही बोलायच्या आधीच यक्षाने विचारले, ‘‘तू कोण आहेस?’’ ‘‘मी अग्नीदेव आहे.’’ अग्नीदेवाने सांगितले. ‘‘तुझ्याकडे अशी कोणती विशेष शक्ती आहे?’’ यक्षाने विचारले. ‘‘मी पृथ्वीवरील काहीही जाळू शकतो.’’ अग्नीदेवाने उत्तर दिले.

यक्ष हसला आणि त्याने एक गवताचे पाते अग्नीदेवासमोर ठेवले आणि अग्नीदेवाला म्हणाला की, ‘‘मला हे जाळून दाखव.’’ अग्नीदेवाने आपली सर्व शक्ती पणाला लावली पण तो ते गवताचे पाते जाळू शकला नाही. निराश होऊन अग्नीदेव म्हणाला, ‘‘मला नाही जाळता येत हे.’’ तो देवांकडे परत गेला आणि म्हणाला, ‘‘हा यक्ष कोण आहे मला नाही समजत.’’

मग देव वायूदेवाकडे गेले आणि तो यक्ष कोण आहे ते शोधून काढायला सांगितले. वायूदेव तयार झाला आणि यक्षाजवळ गेला. यक्षाने विचारले, ‘‘तू कोण आहेस?’’ वायूदेव म्हणाला, ‘‘मी वायूदेव आहे.’’ ‘‘तुझ्याकडे कोणती विशेष शक्ती आहे?’’ यक्षाने विचारले. ‘‘मी माझ्या उच्छ्वासाने कोणतीही गोष्ट उडवू शकतो.’’ वायूदेव म्हणाला.

यक्ष हसला आणि त्याने आणखी एक गवताचे पाते वायूदेवासमोर ठेवले. तो म्हणाला, ‘‘हे उडवून दाखव.’’ वायुदेवाने सर्व शक्तीनिशी फुंकर मारली. ते गवताचे पाते जागेवरून हलेच ना. पुन्हा पुन्हा फुंकर मारली, पण काहीही परिणाम झाला नाही. शेवटी वायुदेव थकून गेला. खजील होऊन वायुदेव परत देवांकडे गेला.

भयभीत झालेले देव आपला सेनानी इंद्रदेव यांच्याकडे मदतीसाठी धावले. ‘‘घाबरू नका, मी शोधून काढतो हा यक्ष कोण आहे ते.’’ असे म्हणून इंद्रदेव यक्षाकडे जाऊ लागले. इंद्रदेव अतिशय वेगाने यक्षाकडे जाऊ लागताच तो यक्ष बघता बघता अदृश्य झाला. इंद्रदेव गोंधळले आणि घाबरले, त्यांचे पाय थरथरू लागले. हे काहीतरी अद्वितीय आहे हे त्यांना समजले. आणि अचानक जिथे यक्ष उभा होता तिथे सुवर्ण वर्णाची, उंची वस्त्रे आणि अलंकार परिधान केलेली एक लावण्यवती

उभी राहिली. इंद्रदेवांनी ही हिमालयाची कन्या उमा असल्याचे ओळखले आणि ते तिला म्हणाले, ''कृपया तू मला सांगशील का तो यक्ष कोण होता?''

उमा हसली आणि म्हणाली, ''तुम्ही ओळखले नाहीत त्यांना? अहो देवराज! ते स्वतः परमेश्वर होते. त्यांच्यामुळेच देवांना काल युद्धात जय मिळाला.''

हे ऐकल्यावर इंद्रदेवांना आपली चूक समजली आणि ते पश्चात्ताप करू लागले आणि परमेश्वराची क्षमायाचना करू लागले. सर्व देवदेखील, ''आपण सर्वोत्तम आहात, सर्वशक्तीमान आहात. आपल्याला आम्ही विसरलो हा आमचा घोर अपराध आहे क्षमा करा!'' अशी प्रार्थना करू लागले. ''काळजी करू नका. तुम्हाला हे समजावे इतकाच माझा हेतू होता.'' असे म्हणून त्यांना आशीर्वाद देऊन परमेश्वर अंतर्धान पावले.

# शोध-बोध गोष्टी क्र.:०३५

**प्रश्न:**

१. यश मिळाल्यानंतर त्या यशाची मस्ती-धुंदी चढणे तुम्हाला योग्य वाटते का?
होय ☐ नाही ☐

२. हारल्यानंतरही त्याबद्दल केवळ दु:ख करत बसणे तुम्हाला योग्य वाटते का?
होय ☐ नाही ☐

३. ज्याच्यामुळे आपल्याला यश मिळाले त्याला विसरणे तुम्हाला पटते का?
होय ☐ नाही ☐

४. एखाद्याचे आभार मानणे तुम्हाला गरजेचे वाटते का?
होय ☐ नाही ☐

५. आपल्यातील क्षमतेबद्दल तुम्हाला काय वाटते -
त्याचा गर्व असावा ☐ त्याबद्दल कृतज्ञ असावे ☐

६. चूक कळल्यावर पश्चाताप वाटून ती सुधारणे याचे समर्थन तुम्ही करता का?
होय ☐ नाही ☐

७. वरील कथा कोणत्या उपनिषदामध्ये आढळून येते?

८. यक्ष म्हणजे काय?

९. इंद्राची इतर नावे सांगा.

१०. पंचमहाभूतांची नावे आणि तुम्हाला त्यांचे आढळणारे गुण लिहा.

आपल्याला मदत करणाऱ्यांचा कधीही विसर पडून देऊ नका.
Always be grateful to your supporters.

# इंद्र–विरोचन

एकदा, ब्रह्मांडाचा निर्माता प्रजापतीने घोषणा केली की, आत्मा हा पापमुक्त, वय नसलेला आणि मृत्यू नसलेला आहे; त्याला दुःख नाही, भूक नाही, तहानही नाही. या आत्म्याचाच शोध घेऊन त्याला जाणले पाहिजे. याचा जो शोध घेतो आणि त्याला जाणून घेतो त्याला सर्व जग जिंकता येते आणि त्यानी इच्छिलेले त्याला प्राप्त होते. देव आणि दानव दोघांनीही ही घोषणा ऐकली आणि त्यांनी विचार केला की, आपण या आत्म्याचा शोध घेतला पाहिजे, ज्यामुळे सर्व जग जिंकता येते. म्हणून, देवांचा राजा इंद्र आणि दानवांचा राजा विरोचन प्रजापतीकडे आले आणि अतिशय नम्रपणे ते ज्ञान आम्हाला द्या अशी विनंती केली. प्रजापतीने त्यांचा शिष्य म्हणून स्वीकार केला आणि त्यांना ३२ वर्षांसाठी आपल्याकडे ठेवून घेतले.

शिक्षणाचा काळ संपल्यानंतर प्रजापतीने दोघांनाही बोलावले आणि त्यांना म्हणाला, ''जी व्यक्ती आपल्या डोळ्याच्या बुबुळात दिसते तोच आत्मा, म्हणजेच ब्रह्म, अविनाशी आणि निर्भय. जा, भांड्यातील पाण्यामध्ये स्वतः पाहा आणि काय दिसते ते मला येऊन सांगा.'' दुसरे दिवशी प्रजापतीने दोघांनाही विचारले की, ''तुमचा अनुभव काय होता?'' ते दोघेही म्हणाले की, ''आम्ही आम्हालाच नखशिखांत पाहिले.'' प्रजापती दोघांनाही म्हणाला की, ''आता दोघांनीही नटून सजून या आणि त्या भांड्यातील पाण्यात बघून तुमचा अनुभव मला सांगा.'' ते आनंदाने गेले आणि नटून सजून आले, त्या भांड्यातील पाण्यात पाहिले आणि प्रजापतीला सांगायला गेले की, आम्ही आम्हालाच नटलेले आणि सजलेले पाहिले. ''छान! हाच आत्मा, अविनाशी आणि निर्भय.'' ब्रह्माने सांगितले.

विरोचनाने दानवांना सांगितले की, ''हा देह म्हणजेच आत्मा आहे आपण त्याला जाणून घेऊन, त्याची सेवा करून त्याचा गौरव केला पाहिजे. हे सर्वोत्तम ज्ञान आहे ज्यामुळे त्रैलोक्याचे राज्य प्राप्त होते.'' विरोचनापेक्षा इंद्र वेगळा होता. त्याला लक्षात आले की आपण आत्म्याबद्दल आत्ता जे काही शिकलो आहोत त्यात काहीतरी चूक झाली आहे. तो बेचैन झाला. त्याने विचार केला की, जर नटून सजून आलेली व्यक्ती प्रतिबिंबात आहे तशीच दिसते तर देह नष्ट झाल्यावर कोणतेच प्रतिबिंब दिसणार नाही. मग तो देह किंवा देहाचे प्रतिबिंब अजरामर आत्मा कसा असू शकेल? तो परत प्रजापतीकडे गेला आणि म्हणाला, ''मला देहामध्ये अथवा त्याच्या प्रतिबिंबामध्ये काहीही विशेष दिसत नाही. कृपया मला आत्माविषयक सत्य ज्ञान प्रदान करा.'' प्रजापतीला आनंद झाला आणि त्यांनी इंद्राला आणखी ३२ वर्षे आपल्याजवळ ठेवून घेतले. काळ संपल्यावर प्रजापतीने त्याला बोलावून सांगितले की, ''स्वप्नामध्ये जो असतो तो आत्मा.'' इंद्राचे समाधान झाले आणि तो देवलोकात जाऊ लागला. जाता जाता त्याच्या मनात एक शंका आली की, स्वप्नात असणारा, आत्मा कसा असू शकेल? स्वप्नात आपल्याला दुःख होते, कष्ट होतात, जखम होते त्रास झाला की आपण रडतो. निर्भय आणि पापमुक्त आत्म्याच्या बाबतीत असे कसे होईल.

तो परत प्रजापतीकडे गेला आणि त्यांना नमस्कार करून आत्म्याचे सत्य समजवण्याची विनंती

केली. प्रजापतीने नेहमीप्रमाणे ३२ वर्षे त्याला ठेवून घेतले. काळ संपल्यावर प्रजापतीने इंद्राला बोलावून सांगितले की, ''जो पूर्ण सुखी असतो आणि गाढ झोपेतसुद्धा जो आनंदी असतो तो आत्मा आहे असे समज.'' इंद्राचे समाधान झाले आणि तो घरी जायला निघाला. घरी जाताना वाटेत त्याला पुन्हा शंका आली की, गाढ झोपेत आत्मा स्वतःला कसा जाणून घेणार? तो स्वतःच्या अस्तित्वाबद्दल जागृत नसतो. मग जागी नसलेली व्यक्ती आत्मा कसा असू शकेल?

तो पुन्हा प्रजापतीकडे परत गेला आणि आपली शंका सांगितली. यावेळी प्रजापती इंद्रावर जास्त खूश झाला आणि त्याला आणखी पाच वर्षे राहाण्यास सांगितले. काळ संपल्यावर प्रजापतीने इंद्राला बोलावले आणि सांगितले की, ''तुझ्या सततच्या प्रयत्नांनी आणि चौकस बुद्धीने तू परमसत्य जाणून घेण्यास पात्र ठरला आहेस.'' असे सांगून प्रजापतीने इंद्राला परम ज्ञान प्रदान केले. इंद्र देवांना हे ज्ञान प्रदान करण्यासाठी परत गेला, आता त्याच्या मनात कोणतीही शंका नव्हती. देवांना हे ज्ञान मिळाले आणि ते स्वतःविषयीच्या पूर्ण ज्ञानामध्ये राहू लागले. विरोचन हा देहविषयक ज्ञानाने समाधानी असल्यामुळे दानव अजूनही आपण म्हणजे देह या भ्रमातच जगत आहेत.

mensa india   tribal mensa nurturing program   ETSN | European Talent Support Network

**शोध–बोध गोष्टी क्र.:०३६**

**प्रश्न:**

१. ज्ञान मिळवण्यासाठी सतत प्रयत्नशील असणे तुम्हाला गरजेचे वाटते का?

होय ☐ नाही ☐

२. एखादी ज्ञान मिळाल्यावर त्यावर प्रश्न विचारणे तुम्हाला गरजेचे वाटते का?

होय ☐ नाही ☐

३. खालीलपैकी काय जास्त घात करणारे आहे असे तुम्हाला वाटते –

अर्धवट ज्ञान ☐ अज्ञान ☐ चूकीचे ज्ञान ☐

४. ज्ञान प्राप्तीसाठी कोणते गुण गरजेचे आहेत असे तुम्हाला वाटते

चौकस बुद्धीमत्ता ☐ सततचे प्रयत्न ☐

५. आपल्या शंकेचा परिहार होईपर्यंत प्रश्न विचारणे तुम्हाला गरजेचे वाटते का?

होय ☐ नाही ☐

६. वरवरचे ज्ञान कायमचे टिकणारे आहे हे म्हणणे तुम्हाला पटते का?

होय ☐ नाही ☐

७. वरील कथा कोणत्या उपनिषदातील आहे?

८. एकूण प्रजापती किती? त्यांची नावे लिहा.

९. देव व दानव कशावरून ठरते असे तुम्हाला वाटते?

१०. ज्ञान म्हणजे काय असे तुम्हाला वाटते?

आपल्या शंकांचे निरसन होईपर्यंत प्रश्न विचारत राहा.
Ask questions till your doubts are clarified.

# भृगु-वरुण संवाद

वरुणाचा पुत्र भृगु एकदा वडिलांकडे आला आणि म्हणाला, ‘‘तात, मला ब्रह्मज्ञान द्या.’’ त्यावर त्याचे वडील म्हणाले, ‘‘अन्न, प्राण, डोळे, कान, मन आणि बोलणे या ब्रह्म समजून घेण्याच्या पायऱ्या आहेत.’’ त्यांनी हेही सांगितले की, ‘‘या ब्रह्मापासूनच सर्व सृष्टीची निर्मिती होते, तिथेच सर्व सृष्टी नांदते आणि तिथेच सर्व सृष्टी विलय पावते.’’ वरुणाने हे ब्रह्म तपस्येच्या, ध्यानधारणेच्या मार्गाने मिळवायला सांगितले. वडिलांनी सांगितल्याप्रमाणे भृगुने तपश्चर्या केली आणि त्याला समजून आले की, अन्न (पदार्थ) हे ब्रह्म आहे. कारण अन्नामुळेच सर्व प्राणी जन्माला येतात, अन्नामुळेच जगतात आणि अन्नातच त्यांचे रुपांतर होते. भृगु लगेच आपल्या वडिलांकडे गेला आणि त्यांना त्याचा अनुभव सांगितला. वरुणाने भृगुला अजून तपश्चर्या करायला सांगितली.

भृगुने पुन्हा तपश्चर्या केली. यावेळेस त्याला समजून आले की, प्राण म्हणजेच ब्रह्म. कारण प्राणामुळेच सृष्टीची निर्मिती होते, प्राणामुळेच ती जिवंत असते आणि प्राण नाहिसा झाल्यावर ती प्राणातच विलीन होते. भृगु वडिलांकडे गेला. त्याला वाटले आता ब्रह्म म्हणजे काय ते समजले आहे. वडिलांनी परत तपश्चर्या करायला सांगितली आणि प्राणापेक्षा आणखी काही आहे का ते पाहायला सांगितले.

भृगु दृढनिश्चयाने तपश्चर्येला बसला. त्याच्या असे लक्षात आले की मन हेच ब्रह्म आहे. मनातूनच सर्व सृष्टीची उत्पत्ती होते, मनातच सृष्टी जगते आणि पुन्हा मनात त्याचा लय होतो. भृगु पहिल्यापेक्षा आनंदित होऊन आपल्या वडिलांकडे गेला. वडिलांनी त्याचे म्हणणे ऐकले आणि आणखी तपश्चर्या करायला सांगितले.

भृगुने वडिलांचे म्हणणे ऐकून पुन्हा तपश्चर्येला सुरूवात केली. यावेळी त्याच्या लक्षात आले की ज्ञान हेच ब्रह्म आहे. कारण ज्ञानामुळेच सृष्टीची निर्मिती होते, ज्ञान असेपर्यंत सृष्टी टिकते आणि शेवटी ज्ञानातच सृष्टी विलय पावते. तो पुन्हा वडिलांकडे गेला. परंतु वरुणाने याहीवेळी त्याला आणखी तपश्चर्या करण्याचा सल्ला दिला.

वरुणाने अजिबात निराश न होता, अधिक आत्मविश्वासाने तपश्चर्या करण्यास सुरूवात केली. यावेळी त्याला ब्रह्माचा अनुभवच आला. त्याला समजले की आनंद म्हणजेच ब्रह्म. कारण आनंदाम ुळेच सृष्टीची उत्पत्ती होते, आनंदातच सृष्टी नांदते आणि शेवटी आनंदातच विलय पावते. वरुणाला जेव्हा हे समजले तेव्हा त्याला खूप आनंद झाला.

त्याने आनंदाने आपल्या मुलाचे स्वागत केले आणि म्हणाला, ‘‘वत्सा! हेच परमसत्य आहे. आता तुला ब्रह्माविषयी आणखी काही शिकविण्याची गरज उरली नाही. तुला ते समजले आहे आणि त्याचा अनुभवही आला आहे.’’

**प्रश्न:**

१. ज्ञान प्राप्त करण्यासाठी खालीलपैकी कोणती गोष्ट गरजेची आहे असे तुम्हाला वाटते?

अन्न ☐ प्राण ☐ डोळे ☐ मन ☐ कान ☐ बोलणे ☐

२. अन्न, प्राण, डोळे, मन, कान, बोलणे यातली एकही गोष्ट आपल्याकडे नसली तर ज्ञान प्राप्त करता येईल असे तुम्हाला वाटते का?

होय ☐ नाही ☐

३. ज्ञान मिळवण्यासाठी सतत प्रयत्नशील असणे तुम्हाला गरजेचे वाटते का?

होय ☐ नाही ☐

४. ज्ञान मिळवण्यासाठी दृढनिश्चय असणे तुम्हाला गरजेचे वाटते का?

होय ☐ नाही ☐

५. उपनिषद शब्दाचा अर्थ काय?

६. एकूण उपनिषदे किती आहेत? त्यांची नावे लिहा.

७. वरील कथा कोणत्या उपनिषदामध्ये आहे?

८. तुमच्या मते, एखादी गोष्ट समजून घेण्याच्या पायऱ्या कोणत्या?

९. अन्न शब्दाचा अर्थ काय?

१०. आनंद म्हणजे काय असे तुम्हाला वाटते?

दृढनिश्चय आणि सततचे प्रयत्न यामुळे ज्ञान प्राप्त करता येते.
We can achieve wisdom through determination and consistent efforts.

# तीन 'द'

एकदा देव, मानव आणि असुर सगळे ब्रह्मदेवांकडे शिकण्यासाठी गेले. अशाप्रकारे काही काळानंतर त्यांना उपदेश ग्रहण करण्याची इच्छा झाली. सर्वप्रथम देवांनी ब्रह्मदेवांना प्रार्थना केली. उत्तरादाखल ब्रह्मदेवाने 'द' एवढेच म्हटले. स्वर्गात अनेक प्रकारचे भोग असतात, सर्व देवगण कधीही वृद्ध न होता सदैव इंद्रिय–भोग घेत असतात, तेव्हा देवांनी विचार केला की, 'द' चा अर्थ दमन म्हणजे इंद्रियसंयमन असावा आणि ब्रह्मदेवाचे आभार मानून परत जायला निघाले. ब्रह्मदेवाने विचारले, ''मी उपदेश केलेल्या अक्षराचा अर्थ तुम्हाला समजला ना?'' देव म्हणाले, ''हो, समजला, आपण आम्हाला इंद्रियदमन करण्याची आज्ञा केली आहे.'' ब्रह्मदेव म्हणाले, ''बरोबर, माझ्या 'द' चा अर्थ हाच आहे. जा, पण मी उपदेश केल्याप्रमाणे वर्तन करा तुमचे कल्याण होईल.''

त्यानंतर मानव ब्रह्मदेवाकडे गेले आणि उपदेश करण्याची प्रार्थना केली. ब्रह्मदेवाने त्यांनाही 'द' हेच अक्षर सांगितले. मानवांनी विचार केला की, आपण सदैव लोभाने कर्म करीत असतो आणि धन, वस्तु यांचा संग्रह करण्याच्या मागे असतो, म्हणून ब्रह्मदेवाने आपल्याला दान करण्याचा उपदेश केला आहे. आभार मानून ते जायला निघाले तेव्हा ब्रह्मदेवाने विचारले, ''मी जे म्हणालो त्याचा अर्थ तुम्हाला समजला ना?'' मानव म्हणाले, ''हो, समजला, आपण आम्हाला दान करण्याची आज्ञा केली आहे.'' ब्रह्मदेव म्हणाले, ''बरोबर, माझ्या म्हणण्याचा अर्थ तोच होता. तुम्ही त्याप्रमाणे वर्तन करा, तुमचे कल्याण होईल.''

नंतर असुर ब्रह्मदेवाकडे गेले आणि उपदेश करण्याची प्रार्थना केली. ब्रह्मदेवाने त्यांनादेखील 'द' हेच अक्षर दिले. असुरांनी विचार केला, आपण सदैव हिंसा करतो, आपल्याला क्रोध अधिक आहे तेव्हा यापासून आपल्याला दूर करण्यासाठी ब्रह्मदेवाने आपल्याला सर्वांवर दया करण्याचा उपदेश केला आहे. ब्रह्मदेवाने विचारले, ''मी जे म्हणालो त्याचा अर्थ तुम्हाला समजला ना?'' असुर म्हणाले, ''हो देवा! आपण आम्हाला सर्व प्राणीमात्रांवर दया करण्याची आज्ञा दिली आहे.'' ब्रह्मदेव म्हणाले, ''बरोबर, मला हेच सांगायचे होते. त्याप्रमाणे तुम्ही वागा, तुमचे कल्याण होईल.''

**शोध–बोध गोष्टी क्र.:०३८**

**प्रश्नः**

१. एखादी गोष्ट शिकण्यासाठी नियम पाळणे तुम्हाला आवश्यक वाटते का?

होय ☐ नाही ☐

२. मोठ्या व्यक्तीने केलेल्या उपदेशाप्रमाणे वागणे याचे तुम्ही समर्थन करता का?

होय ☐ नाही ☐

३. दमन म्हणजे संयम तुम्हाला गरजेचा वाटतो का?

होय ☐ नाही ☐

४. दान करणे याचे तुम्ही समर्थन करता का?

होय ☐ नाही ☐

५. माणसामध्ये दया असावी असे तुम्हाला वाटते का?

होय ☐ नाही ☐

६. गोष्ट एकच असली तरी ती प्रत्येकाला त्याच्या स्वभावाप्रमाणे लागू होते हे तुम्हाला पटले का?

होय ☐ नाही ☐

७. द अक्षराचा अर्थ शोधा.

८. दमन, दान, दया या शब्दांचे नेमके अर्थ शोधा.

९. ही कथा कोणत्या उपनिषदातील आहे ते लिहा.

१०. ब्रह्मदेवाची विविध नावे शोधा.

एकच गोष्ट प्रत्येकाला त्याच्या स्वभानुसार लागू होते.

The same thing applies to everybody by their very nature.

# इंद्रियांमध्ये सर्वश्रेष्ठ कोण?

एकदा इंद्रियांमध्ये आपल्यात सर्वश्रेष्ठ कोण यावरून वाद झाला. त्यातून काहीच निश्चित होईना तेव्हा त्यांनी ब्रह्मदेवाकडे जाण्याचे ठरविले. ब्रह्मदेवाकडे येऊन त्यांनी सांगितले की, ''हे देवा! आता आपणच आमच्यात श्रेष्ठ कोण आहे याचा निवाडा करावा.'' ब्रह्मदेवाने सांगितले की, ''तुमच्यापैकी जो कोणी शरीराबाहेर असताना शरीर निकामी होईल त्याला श्रेष्ठ समजले पाहिजे.''

सर्वात पहिल्यांदा वाणी (तोंड) एक वर्ष शरीराबाहेर राहिली. एक वर्षांनी परत आल्यावर इतर इंद्रियांना विचारू लागली की, ''मी नव्हते तर तुम्हाला काही फरक जाणवला का?'' इतर इंद्रिये म्हणाली की, ''नाही, जसा एखादा मुका आपली कामे करील त्याप्रमाणे शरीर प्राणामुळे श्वास घेत होते, डोळ्यांनी बघत होते, कानांनी ऐकत होते, मनाने विचार करीत होते. आपल्या अनुपस्थितीने त्याच्यावर काहीच परिणाम झाला नाही,'' हे ऐकल्यावर वाणीने शरीरात प्रवेश केला.

त्यानंतर दृष्टी (डोळे) एक वर्ष शरीराबाहेर राहिली. एक वर्षांनी परत आल्यावर इतर इंद्रियांना विचारू लागली की, ''मी नव्हते तर तुम्हाला काही फरक पडला का?'' इतर इंद्रिये म्हणाली की, ''नाही, जसा एखादा आंधळा आपली कामे करील त्याप्रमाणे शरीर प्राणामुळे श्वास घेत होते, वाणीने बोलत होते, कानांनी ऐकत होते, मनाने विचार करीत होते.'' आपल्या अनुपस्थितीने यांच्यावर काहीच परिणाम झाला नाही, हे ऐकल्यावर दृष्टीने शरीरात प्रवेश केला.

त्यानंतर श्रवण (कान) एक वर्ष शरीराबाहेर राहिले. एक वर्षांनी परत आल्यावर इतर इंद्रियांना विचारू लागले की, ''मी नव्हतो तर तुम्हाला काही फरक पडला का?'' इतर इंद्रिये म्हणाली की, ''नाही, जसा एखादा बहिरा आपली कामे करील त्याप्रमाणे शरीर प्राणामुळे श्वास घेत होते, वाणीने बोलत होते, डोळ्यांनी बघत होते, मनाने विचार करीत होते.'' आपल्या अनुपस्थितीने यांच्यावर काहीच परिणाम झाला नाही, हे ऐकल्यावर श्रवणाने शरीरात प्रवेश केला.

त्यानंतर विचार (मन) एक वर्ष शरीराबाहेर राहिले. एक वर्षांनी परत आल्यावर इतर इंद्रियांना विचारू लागले की, ''मी नव्हतो तर तुम्हाला काही फरक पडला का?'' इतर इंद्रिये म्हणाली की, ''नाही, जसा एखादा विचारहीन आपली कामे करील त्याप्रमाणे शरीर प्राणामुळे श्वास घेत होते, वाणीने बोलत होते, डोळ्यांनी बघत होते, कानाने ऐकत होते.'' आपल्या अनुपस्थितीने यांच्यावर काहीच परिणाम झाला नाही, हे ऐकल्यावर मनाने शरीरात प्रवेश केला.

शेवटी प्राण शरीराबाहेर जाऊ लागला. त्याबरोबर सर्व इंद्रियांच्या आपापल्या शक्तीदेखील त्याबरोबर जाऊ लागल्या. हे पाहिल्यावर सर्व इंद्रिये प्राणाला विनवू लागली की, ''बाबारे! तूच सर्वश्रेष्ठ आहेस, तुझ्याशिवाय आमच्या शक्ती राहाणे शक्य नाही. आम्ही मान्य करतो.''

''प्राणाशिवाय बोलता येत नाही, पाहाता येत नाही, ऐकता येत नाही आणि विचारही करता येत नाही. त्यामुळे प्राणच श्रेष्ठ आहे.''

# शोध-बोध गोष्टी क्र.:०३९

**प्रश्न:**

१. आपल्यातील कोणती गोष्ट महत्त्वाची आहे हे समजून घेणे तुम्हाला गरजेचे वाटते का?

होय ☐ नाही ☐

२. ती महत्त्वाची गोष्ट टिकवणे तुम्हाला गरजेचे वाटते का?

होय ☐ नाही ☐

३. कोणत्या गोष्टी महत्वाच्या नाहीत हे समजून घेणे तुम्हाला गरजेचे वाटते का?

होय ☐ नाही ☐

४. तुमच्यामते इंद्रियांमध्ये कोण श्रेष्ट आहे?

तोंड/वाणी ☐ डोळे/दृष्टी ☐ कान/श्रवण ☐

विचार/मन ☐ प्राण/श्वास ☐

५. उपनिषद म्हणजे काय?

६. वेदांचे चार भाग कोणते?

७. आपल्यात प्राण नसेल तर काय होईल असे तुम्हाला वाटते?

८. प्राण शब्दाचा अर्थ लिहा.

९. एखादी गोष्ट/श्रेष्ठ आहे हे ठरविण्यासाठी कोणते निकष तुम्ही लक्षात घ्याल?

१०. ही कथा कोणत्या उपनिषदातील आहे?

आपण कशावर अवलंबून आहोत हे नेहमी लक्षात ठेवले पाहिजे.

We must always remember what we are dependent upon.

# धर्मराज–यक्ष

पांडवांचा १२ वर्षांचा वनवास संपायला थोडेच दिवस बाकी होते. पुढील एक वर्षाचा अज्ञातवास सुरक्षितपणे कोणत्या नगरीत घालवता येईल याचा ते विचार करीत होते. एके दिवशी पाचही बंधु एका वनात फिरत असताना युधिष्ठिराला तहान लागली. त्याने सहदेवाला पाणी आणण्यासाठी पाठविले. सहदेव एका सरोवराकाठी गेला आणि त्याने आपल्या जवळील कमंडलूत पाणी घेण्यास सुरूवात केली. इतक्यात एका वृक्षावर बसलेला निसर्गरक्षक यक्ष त्याला म्हणाला, ‘‘थांब अगोदर माझ्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दे. आणि मगच पाणी घे. नाहीतर तुला प्राणांना मुकावे लागेल.’’ त्यावर सहदेव म्हणाला, ‘‘माझ्या दादाला तहान लागलेली असताना मी तुझ्या प्रश्नांची उत्तरे कुठे देत बसू?’’ असे म्हणून त्याने कमंडलू सरोवरात बुडवून पाणी घेतले आणि तो खाली कोसळला. बराच वेळ झाला तरी सहदेव परत येत नाही हे बघून त्याला पाहायला नकुल गेला. नकुलही येत नाही म्हटल्यावर त्याला पाहायला भीम गेला. आणि या तीघांना पाहण्यासाठी अर्जुन गेला. या सर्वांची सहदेवासारखीच गत झाली. शेवटी त्या चौघांना बघायला जेव्हा युधिष्ठिर गेला तेव्हाही यक्षाने युधिष्ठिराला आधी प्रश्नांची उत्तरे देण्यास सांगितले. त्यावर युधिष्ठिर म्हणाला, ‘‘तू मला प्रश्न विचार, मी माझ्यापरीने उत्तरे देण्याचा प्रयत्न करीन.’’ असे म्हणताच यक्षाने प्रश्न विचारायला सुरूवात केली.

यक्षः ‘‘सर्वात श्रेष्ठ लाभ कोणता?’’
युधिष्ठिरः ‘‘उत्तम आरोग्य.’’
यक्षः ‘‘सर्वात उत्तम धन कोणते?’’
युधिष्ठिरः ‘‘विद्या.’’
यक्षः ‘‘जगातील सर्वात श्रेष्ठ धर्म कोणता?’’
युधिष्ठिरः ‘‘दया.’’
यक्षः ‘‘जिंकण्यास कठीण असा शत्रू कोणता?’’
युधिष्ठिरः ‘‘आपला राग.’’

अशाप्रकारे यक्षाच्या सर्व प्रश्नांची युधिष्ठिराने तात्काळ उत्तरे दिली. ही उत्तरे ऐकून यक्षाला आनंद झाला आणि त्याने आणखीही काही प्रश्न विचारले. धर्मराजाने त्याचीही समाधानकारक उत्तरे दिली. तेव्हा प्रसन्न होऊन यक्षाने चारही पांडव पुन्हा जिवंत केले. धर्मराजाचे ते उदार, दूरदर्शी आणि चातुर्याचे भाषण ऐकून यक्षाला खूपच आनंद झाला.

**प्रश्न:**

१. प्रश्नांची उत्तरे देताना चातुर्य गरजेचे आहे असे तुम्हाला वाटते का?

होय ☐ नाही ☐

२. विद्या हे उत्तम धन आहे हे धर्मराजाचे उत्तर तुम्हाला पटते का?

होय ☐ नाही ☐

३. दया हा जगातील श्रेष्ठ धर्म आहे हे तुम्हाला पटते का?

होय ☐ नाही ☐

४. जिंकण्यास कठीण शत्रू आपला राग आहे हे तुम्हाला पटते का?

होय ☐ नाही ☐

५. आपले आरोग्य उत्तम असणे तुम्हाला आवश्यक वाटते का?

होय ☐ नाही ☐

६. वरील कथा महाभारतातील कोणत्या पर्वात आहे?

७. वरील कथेत यक्षाने धर्मराजाला विचारलेल्या सर्व प्रश्नांची मूळ कथेतून यादी करा.

८. उदार, दूरदर्शी, चातुर्याचे भाषण या गुणांनी काय साधले जाईल असे तुम्हाला वाटते?

९. विद्या हे धन कसे? यावर तुमचे मत मांडा.

१०. आपला राग हा आपला शत्रू कसा? यावर तुमचे विचार लिहा.

संकटातून बाहेर पडण्यासाठी काहीवेळा बळापेक्षा चातुर्याचा उपयोग होतो.

Sometimes to overcome a crises we have to use wit instead of force.

# सेतूबंधन

हनुमंताने जाळून विद्रुप केलेली लंका पूर्ववत होत असतानाच श्रीराम सागराच्या उत्तर किनाऱ्यावर कोट्यावधी वानर सेनेसह पोहोचल्याची बातमी रावणाच्या हेरांनी त्याला सांगितली. त्यानंतर ताबडतोब त्याने राजसभा बोलावून आपण याबाबतीत काय करावे अशी मंत्र्यांना विचारणा केली. त्यावर त्याचा सेनापती प्रहस्त म्हणाला, ''तुम्ही एवढे पराक्रमी असताना, तुमच्यापुढे या वनवास भोगलेल्या रामाचा व त्या वानरांचा काय पाडाव लागणार? एकतर त्यांना समुद्र ओलांडून येताच येणार नाही. त्यातून तसे झालेच तर त्यांच्या वाट्याला मृत्यूखेरीज दुसरे काही येणार नाही.'' प्रहस्ताच्या या बोलण्याला सर्वांनीच दुजोरा दिला. कुंभकर्ण म्हणाला, ''तू माझा भाऊ असल्याने मी तुझ्या बाजूने आहेच. पण तू सीतेला पळवून उगीच हा अनर्थ ओढवून घेतला आहेस. त्यापेक्षा तू तिला परत पाठवावीस हेच उचित वाटते. पण तरीही रामाविरुद्ध लढण्याची वेळ आली तर मी तुझ्याच बाजूने लढीन असे मी तुला वचन देतो.'' रावणाने प्रश्नार्थक नजरेने आपला भाऊ बिभीषण याकडे पाहिले. बिभीषण बोलू लागला, ''आत्ता राजसभेतील हे मंत्री तुझ्या पराक्रमाचे गोडवे गात आहेत. पण जेव्हा लंका जळत होती तेव्हा हे पराक्रमी वीर कोठे गेले होते? शत्रूला कमी लेखून आपण आपलेच नुकसान करीत आहोत. राम हा देखील एक पराक्रमी आणि बुद्धिमान योद्धा आहे. त्याबरोबरच त्याचा हाती सुग्रीवाचे निर्भय आणि जीवावर उदार होऊन लढणारे प्रचंड सैन्य आहे. हे लक्षात घेता, त्याच्याकडून होणारा आपला सर्वनाश टाळण्यासाठी तू सीतेला ताबडतोब परत पाठवून रामाची क्षमा मागावीस.'' बिभीषणाचे हे बोलणे झोंबल्याने रागाने संतापलेला रावण त्याला म्हणाला, ''कर्तृत्वाने एखादा पुढे जाऊ लागला की त्याला मागे खेचणारे तुझ्यासारखे लोक असतातच. तुला जर त्या रामाबद्दल एवढे प्रेम असेल तर तू त्याच्याकडेच का जात नाहीस? मला यापुढे एक क्षणभरही तुझे तोंड पाहायचे नाही.'' याप्रमाणे बोलून रावणाने बिभीषणाला लाथाडले व त्याचा मुकुटही भिरकावून देत त्याला राजसभेतून हाकलून दिले. दुःखी झालेला बिभीषण आपल्या चार सहकाऱ्यांसह श्रीरामांकडे जाण्याचा विचार करू लागला. तिकडे उत्तरकिनारी पोहोचलेली श्रीरामांची सेना समुद्र ओलांडून जायचे मार्ग शोधू लागली. सागराची देवता वरुण याने प्रगट होऊन श्रीरामांना सांगितले, ''श्रीरामा! ईश्वरी शक्तीने घालून दिलेल्या नियमांनुसार सागरालाही वागावे लागते. पण सुग्रीवसेनेतील नल व नील हे दोघे सेनानी सेतू बांधण्याच्या शास्त्रात प्रवीण आहेत. त्यांना एवढ्या मोठ्या सागरावर सेतू बांधणे सहज शक्य होईल. पण तसा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण कर.'' त्याप्रमाणे श्रीरामांनी त्या दोघांना बोलावून समुद्रावर सेतू बांधण्यास सांगितले. हे ऐकताच त्या दोघांमधील उत्साह व आत्मविश्वास वाढला व त्यांनी वानरसेनेच्या मदतीने कामास प्रारंभ केला.

**प्रश्नः**

१. आपले चुकते आहे असे आपल्याला एखाद्याने सांगितले तर आपण काय करावे?
त्याचे ऐकावे ☐ ते सुधारावे ☐ दुर्लक्ष करावे ☐
सांगाणाऱ्याला हकलवावे ☐

२. एखाद्याला कमी लेखणे तुम्हाला योग्य वाटते का?
होय ☐ नाही ☐

३. रावणाने विभिषणाला दिलेल्या वागणुकीचे तुम्ही समर्थन करता का?
होय ☐ नाही ☐

४. एखाद्या गोष्टीत प्रवीण, कुशल असण्याबरोबरीनेच त्यासाठी लागणारा आत्मविश्वास तुम्हाला गरजेचा वाटतो का?
होय ☐ नाही ☐

५. सेतू शब्दाचा अर्थ लिहा.

६. रावणाच्या भावांची, मुलांची, मंत्र्यांची नावे लिहा.

७. रावण व त्याच्या भावंडांच्या जन्माची कथा शोधून तुमच्या शब्दात लिहा.

८. सीतेला परत पाठविण्याचे कुंभकर्ण व विभिषणाचे बोलणे तुम्हाला पटते का? कारणे द्या.

९. रावणाचे म्हणणे व त्याची कृती तुम्हाला पटते का? कारणे द्या.

सांघिक कार्याने अशक्यप्राय गोष्टी साध्य करता येतात.

We can achieve impossible tasks with teamwork.

# शिवधनुष्य

मिथिलेच्या राजा जनकाने शंकरांची उपासना करून एक धनुष्य प्राप्त केले होते. ते उचलणे सोपे काम नव्हते. त्याला उचलण्याची पात्रता काही देवतांमध्ये देखील नव्हती. आपली मुलगी सीता हिच्या स्वयंबरासाठी जनक राजाने तेच शिव्य धनुष्य उचलून ते मोडण्याचा पण ठेवला होता. हे जो करू शकेल त्याच्याशीच सीता विवाह करेल अशी अट होती.

दिवस ठरला. देशोदेशीचे राजे-महाराजे येऊ लागले व धनुष्य उचलायचा प्रयत्न करू लागले पण कोणालाच जमेना. दशानन रावणाने देखील ते शिवधनुष्य उचलण्याचा प्रयत्न केला. त्याला ते थोडे उचलवले खरे पण त्याचे वजन सहन न झाल्याने ते त्याच्याच अंगावर पडले आणि त्याची मोठी फजिती झाली. मग अखेरीस ५-१० सेवकांच्या मदतीने ते उचलून पुन्हा ठेवण्यात आले.

त्याच सुमारास विश्वामित्रांबरोबर राम-लक्ष्मण देखील मिथिलेत आले होते. त्यांना या स्वयंबराबद्दल कळले. अनेक राजा हे धनुष्य उचलण्यात अपयशी ठरले आहेत हे पाहून जनकाला चिंता वाटली. 'या जगात एकही वीर धनुर्धर नाही जो हे धनुष्य उचलून मोडू शकेल? म्हणजे माझी कन्या कुमारीच राहणार तर?' हा विचार मनात येत असतानाच श्रीरामांनी विश्वामित्रांना वंदन करत यज्ञमंडप गाठला. तिथे ठेवलेल्या शिव धनुष्याजवळ जात भूमीला वंदन केले. सर्वांचे लक्ष रामचंद्रांकडे लागले होते. त्यांचे रूप, तेज, निर्भयता, वीरदृष्टी पाहून सारेजण स्तब्ध झाले होते.

डावा पाय पुढे ठेवून डाव्या हाताने त्या धनुष्याच्या टोकाला हात घातला आणि क्षणात त्यांनी ते शिव धनुष्य उभे केले. त्याला प्रत्यंचा(दोरी) लावण्यासाठी ते वाकवले. पण तेवढ्यातच ते धनुष्य भंग झाले. मी मी म्हणणाऱ्या मोठ्या वीरांनी आशचर्याने तोंडात बोटे घातली आणि तिथून धूम ठोकली.

**शोध–बोध गोष्टी क्र.:०४२**

**प्रश्नः**

१. कृती करण्यापूर्वी ते पेलण्याची क्षमता आपल्यात आहे का हे तपासणे तुम्हाला योग्य वाटते का?

होय ☐ नाही ☐

२. एखादी गोष्ट करण्याची क्षमता नसताना आपण काय केले पाहिजे असे तुम्हाला वाटते?

क्षमता वाढवावी ☐ क्षमता नाही हे मान्य करावे ☐

क्षमता असल्याचा आव आणावा ☐

३. ज्याचे काम त्यानेच करावे हे तुम्हाला पटते का?

होय ☐ नाही ☐

४. शिवधनुष्य पेलणे या म्हणीचा अर्थ लिहा.

५. स्वयंबर व स्वयंवर या शब्दातील फरक लिहा.

६. प्रत्यंचा म्हणजे काय?

७. शिवधनुष्याप्रमाणे अजून इतर धनुष्यांची नावे लिहा.

८. रामायणातील कोणत्या कांडात ही कथा येते?

९. सीता शब्दाचा अर्थ लिहा.

१०. सीतेची जन्मकथा समजून घेऊन लिहा.

आपली क्षमता ओळखूनच काम करावे.

Work as per your capacity.

# गोपाळकाला

श्रीकृष्णाचे सारे बालपण गोकुळात गेले. गोपाळांबरोबर त्याने गाईगुरे राखली. गोरसाचा आस्वाद घेतला. बालपणातले सारे खेळ तो येथेच खेळला. गोपांना त्याने दिलासा दिला. त्याने यमुनेच्या डोहातल्या कालियाला हुसकावून लावले. गोपांना समुदायाने एकजुटीने, चिकाटीने संकटांना तोंड द्यायला शिकवले.

श्रीकृष्ण आणि बलराम गोकुळात असताना दररोज गाई-वासरांना चरण्यासाठी घेऊन जात असत. त्यांच्याबरोबर गोपांची इतर मुलेही आपापल्या गाई-गुरे घेऊन कृष्णाबरोबर घेऊन जात असत. गाई-गुरांना चरायला सोडल्यावर गोपांच्या मुलांची आणि कृष्ण बलराम यांच्यात गप्प-गोष्टी, खेळ रंगत असे. कृष्णाच्या पावा ऐकूनही गोप आनंदून जात असत.

दुपारच्या वेळी पाणी पिऊन गुरे झाडांच्या सावलीत बसत. मग श्रीकृष्ण बलराम आणि गोपांची मुले खायला बरोबर आणलेली शिदोरी सोडत असत. कृष्ण सर्वांची शिदोरी एकत्र करत असे आणि ती सर्वांना वाटत असे. ते सर्वजण आनंदाने त्याचा स्वीकार करत. त्या एकत्र केलेल्या पदार्थाला गोपाळकाला म्हणत.

हा गोपाळकालाही खूप काही शिकवणारा आहे. हा गोपाळकाला या जगाची ओळख आपल्याला करून देतो. जगामध्ये जशी विविधता आहे तशीच या गोपाळकाल्यातही आहे. पण यांना एकत्र बांधून ठेवणारी शक्ती एकच आहे तो म्हणजे देव. तेच श्रीकृष्णाने यातून दाखवून दिले.

**प्रश्न:**

१. तुम्ही कृष्ण आणि गोपांप्रमाणे एकत्र बसून भोजन करता का?

होय ☐ नाही ☐ कधीकधी ☐

२. तुम्हाला कसे राहायला आवडते?

गोपांसारखे मिळून मिसळून ☐ एकटे एकटे ☐

३. जगातील विविधता संपली तर तुम्हाला आवडेल का?

होय ☐ नाही ☐

४. एकसारखे वागणाऱ्या बोलणाऱ्या माणसांच्या जगात राहायला तुम्हाला आवडेल का?

होय ☐ नाही ☐

५. 'जगातील विविधता संपली तर......' याविषयी तुमचे म्हणणे थोडक्यात लिहा.

६. गोपाळ शब्दाचा अर्थ लिहा.

७. श्रीकृष्ण गोकुळात आला व तिथून कोठे गेला?

८. श्रीकृष्णाने उचललेल्या पर्वताचे नाव काय?

९. श्रीकृष्णाच्या भावंडांची नावे लिहा.

१०. बलरामाविषयी माहिती लिहा.

# अघासुर

एके दिवशी नेहमीप्रमाणे आपल्याबरोबर गाय-वासरांना आणि सवंगड्यांना बरोबर घेत श्रीकृष्ण अरण्यात गेला. श्रीकृष्णाबरोबर जाणे हे सर्वांसाठीचे उल्हासाचे क्षण असत. त्यातले काही इकडे तिकडे बाडगत होते तर काही हास्यविनोद करत होते.

अघासुर नावाचा एक राक्षस पूतना आणि बकासुराचा भाऊ होता. श्रीकृष्णाला मारण्यासाठी त्याची नेमणूक करण्यात आली होती. श्रीकृष्णाला आणि त्याच्या सवंगडी गोपांना ठार मारण्यासाठी त्याने एका भल्यामोठ्या अजगराचे रूप घेऊन आपले शरीर त्या अरण्याभोवती पसरले. त्याने आपला जबडा उघडला. खालचा जबडा जमिनीवर होता तर वरचा आकाशाला भिडला होता. तो स्तब्धपणे पडून राहिला. गोप त्याच्या जवळ आले आणि इतक्या मोठ्या अजगराची त्यांना गंमत वाटली. कोणी म्हणे हा विशाल सर्प आहे तर कोणी म्हणे ही वृंदावनाची देवता आहे. पण बघुया तरी काय आहे म्हणून ते एकएक करत त्याच्या तोंडात शिरायला लागले. त्याच्या तोंडातील जीभ म्हणजे एक खाच-खळग्यांचा रस्ताच आहे असे समजून त्यावरून चालू लागली.

श्रीकृष्णाला हे काय चालू आहे ते लक्षात आले. प्रसंगावधान दाखवत लगेचच त्या अजगराच्या तोंडात तो शिरला. त्याने स्वतःला अजगराच्या गळ्यामध्ये अडकवले. त्यामुळे अजगराला श्वास घेणे अवघड झाले व तो गुदमरू लागला. त्याचा श्वास थांबला इतक्यातच श्रीकृष्णाने आपल्या सगळ्या सवंगड्यांना बाहेर काढले.

**शोध–बोध गोष्टी क्र.:०४४**

**प्रश्न:**

१. कोणत्याही गोष्टीमध्ये प्रसंगावधान राखणे गरजेचे वाटते का?

होय ☐ नाही ☐ कधीकधी ☐

२. प्रसंगावधान राखून त्याप्रमाणे कृती करणे हा श्रीकृष्णाचा गुण तुमच्यातही असावा असे तुम्हाला वाटते का?

होय ☐ नाही ☐

३. माणसाने नेहमी कसे असावे असे तुम्हाला वाटते?

सावध ☐ बेसावध ☐

४. खात्री नसताना एखाद्या अपरिचित ठिकाणी गोपांनी प्रवेश ते योग्य आहे का?

होय ☐ नाही ☐

५. श्रीकृष्णाने मारलेल्या असुरांची नावे लिहा.

६. जय-विजय कृष्णावतारात कोणत्या असुरांच्या रूपाने आले?

७. प्रसंगावधान राखल्याने काय होते असे तुम्हाला वाटते?

८. अजगर हे कशाचे प्रतिक आहे?

९. वृंदावन सध्या कोणत्या राज्यात येते?

१०. ही कथा कोणत्या ग्रंथात आढळते?

त्यामुळे मजा आणि मस्ती जरूर करावी पण तितकेच सावधही असावे

Presence of mind is most important

# जय-विजय

वैकुंठ हे श्रीविष्णूंचे निवासस्थान. एके दिवसी ब्रह्मदेवाचे पुत्र सनक-सनंदन-सनातन-सनत्कुमार या चार भावडांनी वैकुंठामध्ये भगवान विष्णूंचे दर्शन घ्यायचे ठरवले. ते जरी वयाने मोठे असले तरी दिसायला लहान मुलांप्रमाणे दिसत असत. त्यांनी केलेल्या तपश्चर्येमुळे हे त्यांना साध्य झाले होते. वैकुंठाच्या पहिल्या सहा द्वारांमध्ये कोणताही अटकाव न होता ही भावंडे आत गेली. सातव्या दरवाज्यापाशी दोन सारख्या वयाच्या व तेजस्वी शरीराच्या द्वारपालांनी त्यांना अडविले. या द्वारपालकांच्या डोक्यावर सोनेरी मुकुट होते. यांची नावे जय-विजय अशी होती. यांनी सनत्कुमारांना खरोखरीच लहान समजून त्यांच्यावर गदा रोखत त्यांना अडवले.

सनत्कुमारादि चार भावंडाना दुःख झाले व थोड्याशा रागात ते म्हणाले, ‘‘हे तुम्ही बरोबर केले नाही. भगवंताचे दर्शन घेण्यापासून असे अडविणे योग्य आहे का? कशाकरिता हा भेदभाव करता? इथे राहण्यास तुम्ही पात्र नाही. तुमची जागा भूलोकी म्हणजेच पृथ्वीवर आहे.’’

जय विजय यांना आपली चूक कळली. लगेचच त्यांनी सनत्कुमारांचे पाय धरले आणि त्यांची क्षमा मागितली व पृथ्वीवरील आमच्या वास्तव्यामध्येही आम्हाला भगवान विष्णूंचे स्मरण व सहवास राहावा असा उःशाप मागितला. इतक्यातच भगवान विष्णु त्या द्वारापाशी आले. ते आल्या बरोबर सनत्कुमारांनी त्यांच्या पायाशी लोटांगण घातले आणि म्हणाले, ‘‘हे भगवन् आपल्या सेवकांना शाप दिल्यामुळे तुम्ही आम्हाला क्षमा करा. आमचा शाप निष्फळ ठरो.’’

भगवान म्हणाले, ‘‘मीच तुमची क्षमा मागायला हवी. कारण माझ्या सेवकांकडून चूकच झाली. तुमचा शाप निश्चितच खरा ठरेल. जय आणि विजय तीनदा असुर म्हणून पृथ्वीवर जन्म घेतील. द्वारपालांनो तुम्ही घाबरू नका. तुमचे कल्याणच होईल. योग्य वेळ येताच मी तुमची मुक्तता करीन आणि पुन्हा माझ्या सेवेस प्राप्त व्हाल.’’

**प्रश्न:**

१. जय-विजयांनी सनत्कुमारांशी केलेले वर्तन तुम्हाला योग्य वाटते का?
होय ☐ नाही ☐

२. सेवकांना शाप दिल्याबद्दल पश्चात्ताप वाटून क्षमा मागणे हे सनत्कुमारांचे वागणे आचरणात आणण्यासारखे आहे का?
होय ☐ नाही ☐

३. एखाद्याकडे नुसते बघून त्याची परीक्षा करत त्याला नको ते बोलणे तुम्हाला पटते का?
होय ☐ नाही ☐

४. वैकुंठ शब्दाचा अर्थ लिहा.

५. वैकुंठाप्रमाणे इतर लोकांची नावे लिहा.

६. ब्रह्मदेवाच्या मुलांची नावे लिहा.

७. जय-विजय हे कशाचे प्रतिक आहे असे तुम्हाला वाटते?

८. जय-विजय कोणते दैत्य म्हणून जन्माला आले?

९. क्षमा मागणे हा चांगला गुण आहे असे तुम्हाला वाटते का? कारणे द्या.

१०. वैकुंठाचे वर्णन शोधून लिहा.

योग्य परीक्षा केल्याशिवाय कोणाचीही पात्रता ठरवू नये
Don't judge anyone from the appearance.

# भीष्मप्रतिज्ञा

हस्तिनापूरच्या राजा शंतनूला देवव्रत नावाचा मुलगा होता. देवव्रत अत्यंत गुणी, ज्ञानी उत्तम राजकारण जाणणारा, राज्यकारभार नीट चालवणारा होता. एकदा शंतनू यमुनाकाठी शिकारीसाठी गेला असताना तिथल्या एका युवतीला त्याने लग्नासाठी मागणी घातली. त्यावर तिने आपले वडील दाशराज यांची परवानगी घेण्यास सांगितली.

त्याप्रमाणे शंतनू दाशराज राजाला भेटला व त्याने तुमच्या मुलीशी लग्न करायचे आहे असे सांगितले. त्यावर दाशराज म्हणाला, ‘‘महाराज हिला जो मुलगा होईल तो आपल्यानंतर राज्याचा राजा होईल असे मला आपण वचन देत असाल तरच मी तुमचे हिच्याशी लग्न लावून देईन.’’ हे ऐकून शंतनू गंभीर झाला. आपला मुलगा देवव्रत हा राज्यकारभारासाठी निपुण असताना ही अट मान्य करणे राजाला भरवशाचे वाटले नाही. तो काहीही न बोलता तिथून निघून गेला. पण याचा त्याच्या मनावर परिणाम झाला. तो खूप उदास राहू लागला.

देवव्रताला हे वेगळे वाटले. त्याने याचे कारण शोधून काढले तेव्हा त्याला घडलेली सर्व हकीकत समजली. मग त्याने दाशराज आणि त्याच्या मुलीचा शोध काढला आणि त्यांना म्हणाला, ‘‘दाशराज तुम्ही तुमची मुलगी निःशंकपणे माझ्या पिताजींना द्यावी. त्यांच्यापासून तिला होणारा मुलगाच हस्तिनापुरचा राजा होईल असे मी तुम्हाला वचन देतो.’’

यावर दाशराज म्हणाला, ‘‘देवव्रता तू हे वचन पाळशील पण उद्या तुझे लग्न होऊन तुला मुले होतील त्यांचे काय? ते राजपदासाठी भांडणार नाहीत कशावरून?’’

हे ऐकून देवव्रत म्हणाला, ‘‘ठीक आहे. मी तुमच्यासमक्ष आजन्म ब्रह्मचारी राहण्याची प्रतिज्ञा घेतो.’’ ही भयंकर प्रतिज्ञा घेतल्यामुळे देवव्रताला भीष्म (भयंकर) हे नाव पडले. आपल्या वडीलांसाठी त्याने आपल्या सुखाचा कितीतरी मोठा त्याग केला होता.

**प्रश्नः**

१. देवव्रतासारख्या भयंकर प्रतिज्ञा तुम्ही घेता का?

होय ☐ नाही ☐ कधीकधी ☐

२. तुम्ही घेतलेल्या भयंकर प्रतिज्ञा तुम्ही पूर्ण करू शकला आहात का?

होय ☐ नाही ☐ काहीकाही ☐

३. अशा भयंकर प्रतिज्ञा कराव्या का?

होय ☐ नाही ☐

४. पूर्ण करता येतील अशाच प्रतिज्ञा कराव्या हे तुम्हाला पटते का?

होय ☐ नाही ☐

५. महाभारत ग्रंथ कोणी लिहिला?

६. भीष्म शब्दाचा अर्थ लिहा.

७. भीष्मांनी युधिष्ठीरास सांगितलेले स्तोत्र कोणते?

८. भीष्मांचे आयुष्य किती होते?

९. भीष्म कौरवांच्या सैन्यात कोण होते?

१०. वेदव्यासांच्या मुलांची नावे लिहा.

आपल्या कुवतीनुसारच प्रतिज्ञा करावी.
Make a promise according to your capacity.

# शंभर अपराध भरले!

शिशुपाल जेव्हा जन्माला आला तेव्हा तीन डोळे आणि चार हात होते. हे विद्रूप मूल त्याची आई टाकून द्यायला निघाली तेव्हा आकाशवाणी झाली की, ‘हा मुलगा मोठा पराक्रमी राजा होईल. मात्र ज्याची दृष्टी पडताच याचे जास्तीचे अवयव गळून पडतील त्याच्याच हातून याचा मृत्यू होईल.’

या शिशुपालाची आई ही श्रीकृष्णाची आतेबहीण होती. आपल्या आतेबहीणीच्या मुलाला पहायला जेव्हा श्रीकृष्ण गेला तेव्हा शिशुपालाचे जास्तीचे अवयव गळून पडले. तेव्हाच शिशुपालाच्या आईने ओळखले की याचा वध श्रीकृष्णाच्या हातून होणार आहे. तिने कृष्णाला विनंती केली की, ‘माझ्या मुलाला तू मारू नकोस.’ श्रीकृष्ण म्हणाले, ‘‘मी याचे शंभर अपराध माफ करीन. तोवर मी याला हात लावणार नाही पण त्यानंतर मात्र मी याचा वध करीन.’’

पांडवांनी राजसूय यज्ञ केला. मोठ्या माणसाचा प्रथम सत्कार करतात, त्याला अग्रपूजा म्हणतात. पांडवांचे मत श्रीकृष्णाची पूजा प्रथम करावी असे होते. पण शिशुपाल म्हणाला, ‘‘कृष्णाची कसली अग्रपूजा करता माझी करा. तो माझा मान आहे. कृष्ण साधा गवळी आहे. मी राजा आहे.’’ असे वाट्टेल ते बोलत त्याने कृष्णाचा सर्वांसमोर अपमान केला.

पांडव जेव्हा तलवारी काढून शिशुपालाकडे धावले तेव्हा श्रीकृष्णाने त्यांना थांबवले. श्रीकृष्णाच्या हातून दिव्य चक्र बाहेर पडले आणि त्याने शिशुपालाचे मस्तक धडावेगळे केले. आत्तापर्यंत अनेक राजांवर जुलूम करणे, द्वारका नगरी जाळून टाकण्याचा प्रयत्न करणे, यज्ञात विघ्न आणणे, अनेक स्त्रियांना पकडून नेणे असे शिशुपालाचे १०० अपराध श्रीकृष्णाने पोटात घेतले आणि शेवटी त्याचा वध केला.

**शोध-बोध गोष्टी क्र.:०४७**

**प्रश्नः**

१. अपराध माफ करणे तुम्हाला योग्य वाटते का?

होय ☐ नाही ☐ ते अपराधावर ठरेल ☐

२. शिशुपालाने कृष्णाचा केलेला अपमान तुम्हाला योग्य वाटतो का?

होय ☐ नाही ☐

३. शिशुपालाने केलेले शंभर अपराध हे वधास पात्र आहेत असे तुम्हाला वाटते का?

होय ☐ नाही ☐

४. अपराध केल्यास तुमच्या बाबतीत काय करावे असे तुम्हाला वाटते?

माफ करावे ☐ शिक्षा द्यावी ☐ समज देऊन सोडून द्यावे ☐

अपराधातून बोध घेऊन पुन्हा तसे न करणे ☐

५. शिशुपाल हा मूळ कोण होता?

६. शंभर अपराध भरणे या म्हणीचा अर्थ लिहा.

७. दुसऱ्याचा अपमान करणे योग्य वाटते का? कारणे द्या.

८. अपराध माफ करण्याबद्दल तुमचे मत काय?

९. राजसूय यज्ञ करण्यासाठी आवश्यक असलेला निकष कोणता?

१०. पूजा शब्दाचा अर्थ लिहा.

स्वतःच्या चुकांमधून जो शिकतो तोच शहाणा.

Wise is one who learns from his own mistakes.

# श्रीकृष्णार्जुन संवाद

श्रीकृष्णाने कौरव-पांडव भावंडांमध्ये लढाई होऊ नये म्हणून केलेल्या प्रयत्नाचा उपयोग झाला नाही. पांडवांना राज्याचा भाग द्यायला दुर्योधन तयार झाला नाही आणि त्यामुळे राज्य परत घेण्यासाठी लढाईशिवाय दुसरा उपाय राहिला नाही. पांडवांचे सैन्य १५ लाख होते तर कौरवांचे सैन्य २४ लाख सैनिकांचे होते. कौरव-पांडव दोन्ही पक्षांना इतर राज्यांची दले देखील येऊन मिळाली होती. हे महायुद्ध कुरूक्षेत्रावर लढले जाणार होते.

युद्धाचा पहिला दिवस उजाडला. कुरूक्षेत्रावर कौरव-पांडवांच्या सेना आल्या. भीष्माचार्य हे कौरवांचे पहिले सेनापती होते तर धृष्टद्युम्न हे पांडवांचे सेनापती होते. आता युद्धाला सुरूवात होणार इतक्यातच एक समस्या उद्भवली. पांडवांमधील एक वीर योद्धा अर्जुन हा युद्ध करायचे नाही म्हणून अडून बसला. समोर शत्रुपक्षात उभे असेलेले सैन्य हे आपल्याच बांधवांचे आहे त्यांना मी मारू शकत नाही असे म्हणून अर्जुनाने युद्ध न करण्याविषयी श्रीकृष्णाला सांगितले.

श्रीकृष्णाला अर्जुनाचे हे म्हणणे अजिबात पटले नाही. कौरवांनी, पांडव हे त्यांचे भाऊ असूनही त्यांचे राज्य ओरबाडून घेतले होते. पांडवांचा अतोनात छळ केला होता तरीही अर्जुनाकडून युद्ध नको हे उद्गार ऐकल्यावर श्रीकृष्णाने त्याला खूप समजावले. त्याच्या जबाबदारीची त्याला जाणीव करून दिली. अन्यायाच्या विरूद्ध आवाज उठवणे हे आपले कर्तव्यच आहे. प्रत्येकाने आपापली जबाबदारी ओळखली पाहिजे. त्या जबाबदारीपासून आपण पळता कामा नये. असा उपदेश श्रीकृष्णाने अर्जुनाला केला. तोच उपदेश ‘भगवद्गीता’ म्हणून ओळखला गेला.

mensa india · tribal mensa nurturing program · ETSN | European Talent Support Network

# शोध–बोध गोष्टी क्र.:०४८

**प्रश्न:**

१. तुम्हाला श्रीकृष्णाचे म्हणणे पटले का?

होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

२. अर्जुनाचे वागणे तुम्हाला योग्य वाटते का?

होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

३. युद्धाच्या वेळी जर तुम्ही उपस्थित असता तर तुम्ही कोणाच्या बाजूने युद्ध लढला असता?

कौरव ☐ पांडव ☐ तटस्थ ☐

४. औक्षहिणी सैन्य म्हणजे किती?

५. महाभारतात एकूण किती औक्षहिणी सैन्य होते?

६. आपल्या कर्तव्याप्रमाणे वागणे तुम्हाला योग्य वाटते का? कारणे द्या.

७. कर्तव्य न करणे काही वेळा योग्य असते का? कारणे द्या.

८. भगवद्गीतेत एकूण किती अध्याय आहेत?

९. कुरुक्षेत्र सध्या कोणत्या राज्यात आहे?

१०. भगवद्गीता महाभारतातील कोणत्या पर्वात येते?

आपण आपली जबाबदारी टाळता कामा नये.

You must not avoid your responsibilities.

# गजेंद्रमोक्ष

त्रिकूट पर्वतावरील अरण्यात गजेंद्र नावाचा हत्तींचा एक राजा होता. त्या अरण्यातील एका उपवनात अनेक तळी होती व सुंदर फळा-फुलांनी लगडलेली अनेक झाडे-झुडपे होती.

एके दिवशी, गजेंद्र आपल्या संपूर्ण परिवारासह या उद्यानात आला. सूर्यप्रकाश प्रखर असल्यामुळे त्याचे डोके गरगरू लागले. थकवा घालवण्यासाठी तो तेथील एका तलावात उतरला. त्याने आपली तहान भागवली पण तेवढ्यातच एका बलवान मगरीने त्याचा पाय पकडला. मगर त्याला पाण्यात खेचू लागली आणि तिच्या तावडीतून सुटण्यासाठी गजेंद्र धडपडू लागला. या सर्व प्रकारामुळे इतर सर्व हत्तीही चित्कारू लागले. गजेंद्रला पाण्याबाहेर काढण्याचा प्रयत्न करू लागले. पण त्याचा काहीच फायदा होत नव्हता. बराच काळ गजेंद्राने त्या मगरीशी झुंज दिली. तिच्या तावडीतून सुटण्याचे सर्व उपाय केले पण ते व्यर्थ ठरले. अखेरीस तो दमून-भागून गेला. आपला अंतकाळ जवळ आला आहे हे त्याच्या लक्षात आल्याने त्याने सुटकेसाठी मनापासून देवाचा धावा केला.

गजेंद्राचा धावा देवाच्या कानावर गेला आणि देव श्रीहरीरूपात गरुडावर आरूढ होऊन गजेंद्राच्या मदतीस आले. त्यांनी मगरीला पाण्याबाहेर खेचत आणले आणि हातातील चक्राने मगरीचे तोंड फोडून टाकले. अशाप्रकारे अनंत यातनांमधून गजेंद्राची सुटका झाली.

**प्रश्नः**

१. गजेंद्राने प्रयत्न न करताच देवाचा धावा करायला हवा होता का?

होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

२. तुम्ही संकटात सापडलात तर काय कराल?

प्रयत्न ☐ देवाचा धावा ☐ इतरांनी वाचवण्याची अपेक्षा ☐

काहीच नाही ☐

३. तुम्ही देवाचा धावा केल्यावर देव तुम्हाला वाचवेल असे तुम्हाला वाटते का?

होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

४. गजेंद्रमोक्ष कोणत्या ग्रंथात आढळून येतो?

५. गजेंद्रमोक्ष कथेतून काय शिकवण मिळते असे तुम्हाला वाटते?

६. मगर आणि हत्ती कशाचे प्रतिक आहे असे तुम्हाला वाटते?

७. गजेंद्र हत्ती कसा होतो याची कथा समजावून घेऊन लिहा.

८. मोक्ष शब्दाचा अर्थ काय.

९. अशा संकटात सापडले असताना तुम्ही काय कराल ते लिहा.

१०. गजेंद्राने सुटकेसाठी केलेल्या प्रार्थनेचा अर्थ समजून घेऊन त्याचा अर्थ लिहा.

सर्व प्रयत्न करूनही जेव्हा समस्या सुटत नाही तेव्हा देवाचा धावा करावा मार्ग मिळतोच.

Despite all the efforts if the problem persists, pray to God, you will get the solution.

# भगीरथाने गंगा आणली

अयोध्येत भगीरथ नावाचा राजा होता. त्याच्या पूर्वजांचा उद्धार करण्यासाठी त्याला स्वर्गातून गंगा पृथ्वीवर आणून, तिचा प्रवाह कपिलमुनींच्या आश्रमासमोर असलेल्या पूर्वजांच्या राखेवरून नेणे आवश्यक होते. त्याने अनेक वर्ष तपश्चर्या केली आणि भगवती गंगेला प्रसन्न करून घेतले. त्याने गंगेला स्वर्गातून पृथ्वीवर येण्याची विनंती केली. त्यावर गंगा म्हणाली, ''मी खाली उतरेन पण माझ्या प्रचंड वेगाने पृथ्वी खचून जाईल. माझा भार आधी भगवान शंकरांना घ्यावा लागेल.'' भगीरथाने आता भगवान शंकरांना प्रसन्न करून घेण्यासाठी तप आचरले. अन्न-पाण्याचा त्याग केला. दिवस-रात्र केवळ तपश्चर्येतच तो राहू लागला. अनेक वर्षांच्या साधनेनंतर त्याने शंकरांना प्रसन्न करून घेतले. ते गंगेचा भार मस्तकावर घ्यायला तयार झाले. पण गंगेला तिच्या प्रवाहाचा गर्व होता तिने शंकरांनाही दडपण्याचा प्रयत्न केला. पण शंकरांनी तिला आपल्या एका जटेमध्ये गुंडाळून ठेवले. भगीरथाने शंकरांकडे बघत पुन्हा त्यांची प्रार्थना केली. त्याच्या त्या केवीलवाण्या नजरेकडे पाहत शंकरांनी आपल्या जटेतील एका बट सोडून गंगेचा प्रवाह खाली सोडला. भगीरथाला आनंद झाला.

पण आता हा प्रवाह कपिल मुनींच्या आश्रमाकडे प्रवाहित करायचा होता. मंत्राचे काम झाले होते आता तंत्र गरजेचे होते. गंगेच्या उत्तरेकडे उतार होता तर दक्षिणेकडे टेकडी होती. कपिल मुनींच्या आश्रमाकडे वळवण्यासाठी तिचा प्रवाह दक्षिणेकडे आणणे गरजेचे होते.

त्याने टेकडी वरून खणत आणून एक चांगले खिंडार तयार केले व दक्षिण बाजूस उतार करत आणला. आता दोन्ही बाजूस उतार झाल्याने उत्तरेला बांध घालणे गरजेचे होते. तेही काम भगीरथाने पूर्ण केले. स्वतःच्या ताकदीने जमतील तशा शिळा, दगड रचत गेला. त्यावर मातीचे थर चढवू लागला. त्यामुळे उगमातील कुंडाचे पाणी वाढले आणि दक्षिण बाजूला निर्माण केलेल्या खिंडारातून प्रवाही झाले. गंगेचा प्रवाह आपल्याबरोबर जमेल ते घेऊन जात होता. भगीरथाने त्याला दिशा देऊन तो कपिल मुनींच्या आश्रमासमोरील पूर्वजांच्या राखेवरून प्रवाहित केला आणि मंत्र व तंत्राच्या अथक प्रयत्नांनी आपल्या पितरांचा उद्धार केला.

mensa india · tribal mensa nurturing program · ETSN European Talent Support Network

**शोध-बोध गोष्टी क्र.:०५०**

**प्रश्न:**

१. यश येण्यासाठी देवाचे पाठबळ आणि प्रयत्न हे गरजेचे आहेत असे तुम्हाला वाटते का?
होय ☐ नाही ☐ देवाचे पाठबळ पुरेसे आहे ☐ फक्त प्रयत्न हवेत ☐

२. भगीरथासारखा अथक प्रयत्न करायचा गुण तुमच्यात आहे असं तुम्हाला वाटतं का?
होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

३. गंगेसारखा आपल्या सामर्थ्याचा गर्व करणे योग्य आहे का?
होय ☐ नाही ☐ माहित नाही ☐

४. भगीरथाच्या वंशाचे नाव काय?

५. कपिल शब्दाचा अर्थ लिहा.

६. तप म्हणजे काय?

७. गंगा शब्दाचा अर्थ लिहा.

८. गंगा कशाचे प्रतिक आहे असे तुम्हाला वाटते?

९. मंत्र आणि तंत्र म्हणजे काय?

१०. भगीरथ प्रयत्न या उक्तीचा अर्थ लिहा.

इच्छा तिथे मार्ग. Where there is will there is way.

# वराह अवतार

कश्यप आणि दिती यांच्या पोटी दोन जुळ्या मुलांनी जन्म घेतला.  ही मुले नसून शापामुळे असुर निपजली होती. यांचा जन्म होताच पर्वत हादरू लागले. वादळाने झाडे व घरे कोसळू लागली. भयाने जनावरे सैरावैरा पळू लागली. सर्वत्र विध्वंसाची नांदी झाली.

या दोन असुरांची नावे हिरण्याक्ष आणि हिरण्यकश्यपू ठेवली. त्यांचे केवळ आकारमान आणि बळच नाही तर अहंकार आणि मस्ती–धुंदीही वाढत गेली. ते दोघे सर्वत्र दहशत पसरवत होते. अनेक लोकांना ठार मारणे, जनावरांना मारणे, ऋषींना त्रास देणे अशी कृत्ये करू लागले.

एके दिवशी हिरण्याक्षाने इंद्रलोकात प्रवेश केला. आणि मोठ्याने गर्जना करत अनेक देवतांना आव्हान दिले. तो पहाडासारखा आडदांड होता. त्याचे केस लांब असून त्याच्या जटा झाल्या होता. त्याच्या दातातून रक्त ठिबकत होते असे त्याचे ते आक्राळ–विक्राळ रूप बघून सर्व देवही लपून बसले होते. सर्वांनाच आपल्या दहशतीखाली ठेवण्यासाठी हिरण्याक्षाने पृथ्वी तिच्या कक्षेतूनच बाहेर काढली. गुरूत्वाकर्षण, पृथ्वीवरील सजीवांचे अस्तित्व सगळ्याचाच सर्वनाश होऊ लागला. तेव्हा भगवान विष्णूंनी वराह अवतार घेत पृथ्वीला पुन्हा तिच्या कक्षेत आणले व हिरण्याक्ष राक्षसाचा वध केला.

**प्रश्न:**

१. लोकांना ठार मारणे, जनावरांना मारणे, ऋषींना त्रास देणे अशाप्रकारची दहशत पसरवणे तुम्हाला योग्य वाटते का?

होय ☐ नाही ☐ थोडीफार दहशत असावी ☐

२. अहंकार व स्वतःच्या मस्तीत/धुंदीत असणे तुम्हाला योग्य वाटते का?

होय ☐ नाही ☐

३. संकट आल्यावर लपून बसणे तुम्हाला योग्य वाटते का?

होय ☐ नाही ☐

४. दशावतारांची नावे लिहा.

५. वराह म्हणजे काय?

६. हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपू शब्दांचे अर्थ लिहा.

७. हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपू कशाचे द्योतक होते?

८. वराह अवतारातून आपल्याला काय कळते ते लिहा.

९. वराह अवताराविषयी सांगणारे ग्रंथ कोणते?

१०. हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपू मूलतः कोण होते?

समस्येनुसार उपाय करावा लागतो.

Remedy depends on the problem.

# भक्त प्रह्लाद

हिरण्यकश्यपू नावाचा एक क्रूर दैत्य पृथ्वीवर राज्य करत होता. सगळीकडे आपलीच सत्ता असावी या अहंकाराने त्याने बरीच वर्ष तपश्चर्या करत काही वर प्राप्त केले होते. त्यामुळे तो सर्वाधिपती बनला आणि त्याच्या आदेशाप्रमाणे राज्यात देव नाही तर त्याचीच पूजा सर्वत्र होऊ लागली. लोक त्याच्या या दहशतीला घाबरत असत. त्याच्या चार मुलांपैकी सर्वात धाकट्या मुलाचे नाव प्रह्लाद होते. प्रह्लाद जन्मापासूनच सात्विक व शांत वृत्तीचा होता. त्याच्या मुखात कायमच देवाचे नाव असे. आपला मुलगा आपले नाव घ्यायचे सोडून, आपली पूजा करायची सोडून देवाचे नाव घेत बसतो ही गोष्ट हिरण्यकश्यपूला अजिबात आवडत नसे. प्रह्लादाच्या शिक्षकांनाही सांगून ठेवले होते की, या मुलावर लक्ष ठेवा, याने देवाचे, श्रीविष्णूचे नाव अजिबात घेता कामा नये. पण त्याचाही उपयोग झाला नाही. देवाचा महिमा गाणे, त्याचे कीर्तन करणे, त्याची सेवा करणे, पुजा-अर्चा करणे याचे आचरण सर्वांनी केले पाहिजे असे प्रह्लादाच्या तोंडून नेहमी ऐकू येऊ लागल्याने हिरण्यकश्यपू संतापला आणि रागाने लालबुंद होत त्याने प्रह्लादाला शिक्षा देण्याचे आदेश दिले.

हत्तीच्या पायदळी देणे, उंच कड्यावरून ढकलून देणे, विषारी सर्प अंगावर सोडणे, एकांत कोठडीत दिवसेंदिवस अन्न-पाण्याविना ठेवणे, समुद्रात फेकून देणे, आगीत ढकलणे अशा नानाविध प्रकारांमधून प्रह्लाद सुखरूप बाहेर आला. त्याच्या ध्येयापासून तो डगमगला नाही. हिरण्यकश्यपूचा यापुढे नाईलाज झाला व प्रह्लादाच्या निश्चयाचा विजय होत देवाने हिरण्यकश्यपूचा वध केला.

# शोध-बोध गोष्टी क्र.:०५२

**प्रश्न :**

१. खालीलपैकी कोणते गुण तुम्हाला प्रह्लादामध्ये आढळला?
सहनशक्ती ☐ दृढनिश्चय ☐ भक्ती ☐

२. तुमच्यामते कोण हट्टी आहे?
हिरण्यकश्यपू ☐ प्रह्लाद ☐

३. कोणाचा हट्ट योग्य आहे असे तुम्हाला वाटते?
हिरण्यकश्यपू ☐ प्रह्लाद ☐

४. प्रह्लादामधील कोणतातरी गुण तुमच्यात आहे असे तुम्हाला वाटते का?
होय ☐ नाही ☐

५. विश्वास, श्रद्धा, धैर्य यांचे आयुष्यातील महत्त्व सांगा.

६. प्रह्लाद शब्दाचा अर्थ काय?

७. वरील कथा कोणत्या ग्रंथात आढळते?

८. हिरण्यकश्यपूच्या वधासाठी देवाने कोणता अवतार घेतला?

९. आपली दहशत असणे तुम्हाला योग्य वाटते का? कारणे द्या.

१०. प्रह्लादाच्या आईचे नाव काय?

विश्वासाचे श्रद्धेत रूपांतर झाले की धैर्य प्राप्त होते.
When belief becomes conviction it gives courage.